



प. प.
श्रीवासुदेवानंदसरस्वती
(टेंबे) स्वामी विरचित
मार्गदर्शनपर

# सार्थ स्तोत्र रत्नमाला

प.प.श्रीवासुदेवानंदसरस्वती (टेंबे) स्वामी विरचित

मार्गदर्शनपर

# सार्थ स्तोत्र रत्नमाला

विवरणकार

**कै. ब्रह्मश्री पंडित आत्मारामशास्त्री जेरे**

**ठाणे**

मूल्य रु. : २०/-

# अनुक्रमणिका

१. दत्तात्रेयप्रार्थनास्तोत्रम् (१०१)............................१

२. श्रीदत्तस्तोत्रम् (१०३) ....................................१२

३. श्रीपादश्रीवल्लभ स्तोत्रम् (१०५)..........................२०

४. दत्तस्तवस्तोत्रम् (१२९) .................................३१

५. मंत्रात्मकश्लोकाः (१३३)...............................३६

६. श्रीदत्तात्रेयापराधक्षमापनस्तोत्रम् (१३७) ..................४८

७. श्रीदत्तात्रेयकवचम् (१४२) ...............................७०

✿ ✿ ✿

प्रकाशन दिनांक
१५ ऑगस्ट,२००४

प्रकाशक
श्रीवासुदेव निवास प्रकाशन
४२/१७, एरंडवणे, म.कर्वे पथ,
पुणे ४११ ००४.

मुद्रक :
के. जोशी ॲण्ड कं.
भिकारदास मारुती मंदिराजवळ,
सदाशिव पेठ, पुणे-३०.
फोन - २४४७१४०९.

# प. पू. नारायणकाका ढेकणे महाराजांचे मंगल आशीर्वाद

॥ श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः ॥

कलियुगातील प. प. श्रीपादश्रीवल्लभ व श्रीमन्नृसिंहसरस्वती या दोन अवतारांनंतर सुमारे ५०० वर्षांनंतर योगिराज अवताररूप परमपूज्य प्रातःस्मरणीय श्रीमद्वासुदेवानंदसरस्वती स्वामिमहाराजांनी उत्तमोत्तम प्रासादिक व दिव्यप्रभावशाली स्तोत्रे भक्तोद्धारार्थ लिहिली आहेत. या स्तोत्रांपैकी काहींचे मार्गदर्शक विवरणासह अर्थ पूर्वी सन १९७१-७३ मधील 'पंथराज' त्रैमासिकात दिले होते.

संपूर्ण भारतवर्षामध्ये सध्या प. प. श्रीस्वामिमहाराजांचे सार्धशताब्दी (२००३-२००४) जयन्तिवर्ष साजरे होत आहे. यानिमित्त भाविक, जिज्ञासू व आर्त भक्तांना खात्रीची मार्गप्रद असणारी ही स्तोत्ररत्ने पुनश्च त्याच सार्थ विवरणाद्वारे उपलब्ध करून देण्यान तो आनंद, ज्यांनी हा ठेवा उपलब्ध करून दिला त्या प. पू. श्रीगुळवणीमहाराजांना व त्यांना साह्यभूत प. पू. दत्तमहाराज कवीश्वर यांना होणार आहे; या सदिच्छेने पंडित श्री. शरदशास्त्री जोशी, बार्शी यांच्या सहकार्यातून ही स्तोत्र रत्नमाला उपलब्ध होत असताना आनंद होत आहे. या प्रकाशनास प. पू. स्वामिमहाराजांचे आशीर्वाद आहेत. आमच्याही शुभकामना !

दि. २२-७-२००४ आपला स्नेहाकांक्षी

पुणे ४. **ना. य. ढेकणे**

# १०१. दत्तात्रेयप्रार्थनास्तोत्रम् ॥

श्रीपाद श्रीवल्लभ त्वं सदैव । श्रीदत्तास्मान्पाहि देवाधिदेव ॥
भावग्राह्य क्लेशहारिन्सुकीर्ते । घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते ॥१॥

त्वं नो माता त्वं पिताऽऽप्तोऽधिपस्त्वम् । त्राता योगक्षेमकृत्सद्गुरुस्त्वं ।
त्वं सर्वस्वं नोऽप्रभो विश्वमूर्ते । घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते ॥२॥

पापं तापं व्याधिमाधिं च दैन्यं । भीतिं क्लेशं त्वं हराशु त्वदन्यम् ।
त्रातारं नो वीक्ष ईशास्तजूर्ते । घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते ॥३॥

नान्यस्त्राता नापि दाता न भर्ता । त्वत्तो देव त्वं शरण्योऽकहर्ता ।
कुर्वात्रेयानुग्रहं पूर्णराते । घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते ॥४॥

धर्मे प्रीति सन्मतिं देवभक्तिं । सत्संगाप्तिं देहि भुक्तिं च मुक्तिम् ।
भावासक्तिं चाखिलानंदमूर्ते । घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते ॥५॥

श्लोकपंचकमेतद्यो लोकमंगलवर्धनम् ॥
प्रपठेन्नियतो भक्त्या स श्रीदत्तप्रियो भवेत् ॥६॥

**इति श्री प.प. श्रीवासुदेवानंदसरस्वतीविरचितं**
**श्रीदत्तात्रेयप्रार्थनास्तोत्रं संपूर्णम् ॥**

# घोरसंकट निवारणपूर्वक श्रीदत्तप्रीतिकारकस्तोत्रम्

## लेखक - कै. ब्रह्मश्री पंडित आत्मारामशास्त्री जेरे, ठाणे

घोरसंकट निवारणपूर्वक श्रीदत्तप्रीतिकारक हे स्तोत्र स्तोत्रादि संग्रहातील क्र. १०१ वर आहे. प्रातःस्मरणीय, परमपूज्य, कलियुगातील चतुर्थ दत्तावतार परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमत् वासुदेवानंदसरस्वती स्वामिमहाराज यांचे वास्तव्य 'कुरुगड्डी' क्षेत्री असता हे स्तोत्र अन्तःप्रेरणेने निर्माण करून नरसोबावाडीस त्यांचे आज्ञेने वास्तव्य करून असणारे त्यांचे पट्टशिष्य श्रीमत् प.प. नृसिंहसरस्वतीस्वामिमहाराज म्हणजेच प्रसिद्ध दीक्षितस्वामी महाराज यांचेकडे पोस्टाने महाराजांनी पाठविले. महाराजांचे बहुतेक सर्व लिखाण, प.प.दीक्षितमहाराजांकडे असलेले मूळ लिखित ग्रंथ, दीक्षित महाराजांच्या समाधीनंतर अमरापूरचे ट्रस्टी श्री. कडेकर यांचेकडे कोल्हापुरात आहेत. मी नरसोबाच्या वाडीचाच राहणारा व तेथील पुजारी कुलातच जन्माला आलेला असल्याने व लहानपणापासूनच सहज भाग्योदयाने दीक्षित महाराजांचे सान्निध्य लाभल्याने शाळा सुटल्यानंतर सायंसंध्या झाल्यावर महाराजांच्या दिव्य मूर्तीचे दर्शन व त्यांची कृपा इतर मुलांप्रमाणे माझ्यावरही होती. महाराजांच्याजवळ बसावे, त्यांचे सान्निध्य असावे; असे, त्यांचे स्वरूप किंवा महत्त्व न जाणताच मला वाटत होते. त्यांचेजवळ असेच काही विलक्षण आकर्षण होते. अशा या सहवासात असतानाच हे स्तोत्र 'कुरुगड्डी'हून दीक्षितमहाराजांकडे आले व महाराजांनी लगेच रात्रीच्या भजनानंतर मलाही दिले व हे पाठ करून ये अशी आज्ञा केली. त्यांच्या आज्ञेप्रमाणे ते मी पाठ केले व इतर एकादोघांना ते लिहूनही दिले. हे स्तोत्र रोज म्हणण्याची त्यांची आज्ञाही मला झाली व त्याप्रमाणे ते मी म्हणतही असतो. हल्ली तर नरसोबाचेवाडीस रोजच वारंवार हे स्तोत्र म्हटले जाते. या स्तोत्राचा अनुभव अनेक लोकांना आला आहे व सर्व भाविक लोक याचा अपूर्व अनुभव घेत आहेत. काहीजण तर याचा १०८ वेळ पाठ रोज करणारे आहेत व त्यांचे ऐहलौकिक व पारलौकिक कल्याण झालेले दिसत आहे. हे स्तोत्र संस्कृत आहे व हल्ली मलाही काही थोडे संस्कृत काशीतील परमपूज्य पंडित न्यायाचार्य महामहोपाध्याय श्री. वामाचरण भट्टाचार्य गुरुमहाराजांच्या सान्निध्याने

'र' 'ट' 'फ' का होईना, येते. वाडीतील पुजारीकुलोत्पन्न शिवराम हरी पुजारी यांनी या स्तोत्राचे भाषांतर मराठीत करण्याविषयी शके १८५९ साली प्रेरणा केली. माझ्या बुद्धिमांद्यास अनुसरून महाराजांची सेवा म्हणून मी हे भाषांतर त्यावेळी करून ठेवले. **'यदेवविद्ययाकरोति'** या श्रुतीने अर्थ जाणून केलेल्या स्तोत्रपाठाचा अधिक उपयोग होतो असे आहे. **'योऽर्थज्ञइत्सकलंभद्रमश्नुते'** या निरुक्तकारांच्या उक्तीप्रमाणेही अर्थज्ञानाचे महत्त्व आहेच. या स्तोत्रपाठाचा अनुभव मला व इतरांनाही आलेला आहे असे सहर्ष लिहावेसे वाटते. परमपूज्य श्रीगुळवणीमहाराजांच्या वासुदेव निवासातून प्रसिद्ध होणाऱ्या 'पंथराज' त्रैमासिकात भाषान्तरासहित हे स्तोत्र प्रसिद्ध व्हावे अशी प्रेरणा (श्री. केशवराव जोशी) संपादक, पंथराज यांना श्रीने दिली व त्यांच्या आदेशाप्रमाणे मी हे भाषांतर, माझे परमभाग्य उदयाला आले, असे समजून त्यांना प्रसिद्ध करण्यास देत आहे.

या स्तोत्रातील दुसऱ्या श्लोकात **'नो प्रभो'** असे वाक्य आहे. वाडीतील एका शास्त्रीबोवांनी **'नःप्रभो'** असे येथे असते तर व्याकरणदृष्ट्या बरे झाले असते असा माझेजवळ प्रश्न उपस्थित केला. प.प. टेंबेमहाराज हे दत्तावतार आहेत. त्यांची वाणी वज्रलेपाप्रमाणे पक्की आहे. तेव्हा यात काही आणखी अर्थ गूढ असा असला पाहिजे असे मनात आणून मी विचार करू लागलो. तो 'अप्रभो' असे पद येथे काढले म्हणजे **नास्तिप्रभुर्यस्य सोऽप्रभुःतत्संबुद्धौ अप्रभो सर्वत्र इत्यर्थ नः अप्रभो नोऽप्रभो** असे वाक्य होऊन मला व त्यांना दोघांनाही आनंद झाला. पुढे काही दिवसांनी पूज्य गुळवणीमहाराजांच्या भेटीत सहज बोलता बोलता नोऽप्रभोबद्दल विषय निघाला असता गुळवणीमहाराजांनी असे सांगितले, प्रत्यक्ष महाराजांना एका संस्कृततज्ज्ञ भक्ताने हाच प्रश्न विचारला व महाराजांनी अप्रभो असे येथे पद काढावे; कारण याच श्लोकात प्रभु या अर्थी 'अधिप' असे पद आले आहे. **'त्वंपिताप्तोऽधिपः'** असे लिहून पुनः प्रभो लिहिण्यात पुनरुक्ती होईल म्हणून 'अप्रभो' असे येथे संबोधन आहे असे उत्तर दिले व ते पत्र आम्ही पाहिले आहे.' असे महाराजांचे वाक्य ऐकून मला परमानंद झाला. मला शंका विचारणारे शास्त्रीबुवा आधीच स्वर्गवासी झाल्याने त्यांना हे वृत्त कळविता आले नाही. एवढ्याबद्दल थोडा विषाद वाटला. असो. काही लोक आपल्या बुद्धीप्रमाणे या स्तोत्रात 'नःप्रभो' असे म्हणणारे आहेत. त्यांनी या सर्व गोष्टीचा विचार करावा म्हणून हे सर्व विस्ताराने येथे लिहिले आहे. आतां स्तोत्राच्या भाषान्तरास आरंभ करूं –

प्रथम या स्तोत्राचा श्लोक, त्याचा अन्वय व संक्षिप्त भाषांतर देऊन त्याचे विवरण नंतर केले आहे. यापासून भाविक भक्तांना आनंद झाला तर भक्ताहून अभिन्न असणारे दत्तमहाराज यांनाच तो आनंद झाला असे मला वाटेल. श्रीदत्तमहाराज सर्वांचे अखंड कल्याण करोत अशी त्यांच्या चरणी प्रार्थना आहे.

वास्तविक पाहता कोणत्याही ग्रंथाचा खरा अभिप्राय ग्रंथकर्त्यालाच समजत असतो. परंतु तो अर्थ आता मला महाराज कसे सांगणार ? म्हणून त्यांचे स्मरण करून 'अकरणान्मंदकरणंश्रेयः !' या न्यायाने यथामति स्तोत्राचा अर्थ देत आहे तो महाराजांनी मान्य करून घ्यावा.

## स्तोत्र श्लोक पहिला

**श्रीपादश्रीवल्लभ त्वं सदैव ।**
**श्रीदत्ताऽस्मान् पाहि देवाधिदेव ।।**
**भावग्राह्य क्लेशहारिन्सुकीर्ते ।**
**घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते ।।१।।**

अन्वय : भो देवाधिदेव श्रीदत्त श्रीपाद श्रीवल्लभ, भावग्राह्य, क्लेशहारिन् सुकीर्ते, त्वं सदैवाऽस्मान् पाहि, अस्मात्, घोरात्कष्टात् उद्धर ते नमः ।।१।।

## संक्षिप्तार्थ

हे देवाधिदेवा श्रीदत्ता, श्रीपादा, श्रीवल्लभा, भावग्राह्या-क्लेशहारका सुकीर्ते, तूं सर्वदा आमचे रक्षण कर. आमचा या घोर कष्टातून उद्धार कर. तुला नमस्कार असो ।।१।।

## विवरण

सकल ऐश्वर्यांनी संपन्न, सर्व सत्ताधीश असे जे ब्रह्मा, विष्णु, महेश व तदधीन इंद्र, वरुण, यम, वायु प्रभृती तेहतीस कोटी देव या सर्वांना आपल्यापासूनच हे महान् ऐश्वर्य प्राप्त झाले असल्यामुळे आपणच सर्व देवांचे अधिदेव आहात. म्हणून इतर सर्व देवांची स्तुती करण्याचे सोडून हे देवाधिदेवा, आम्ही आपल्या चरणाजवळच आपल्या श्रीचरणांची स्तुती करण्याकरिता आलो आहो.

सहस्रार्जुन, अलर्क, आयु, यदुराजा, विष्णुदत्त प्रभृती अनेक भक्तांना आपण ऐहलोकी साम्राज्यादि लक्ष्मी, स्वर्गादि पारलौकिक संपत्ती व परमनिःश्रेयसरूप मोक्षलक्ष्मीरूप श्री दिली आहे, म्हणून श्रीदत्त हे आपले अन्वर्थक नाम आहे. हे

ऐकून आम्ही आपले चरणाजवळ आलो आहे.

श्रुतिस्मृतिपुराणात आपले ''आप्तकाम'' असे ब्रीद आहे. सर्व सद्गुणांना मंडन करणारे असे आपले चरणकमल आहेत, असा विचार करून महामाया लक्ष्मी हिने आपल्या पायाचा आश्रय केला. जगात आपल्याहून श्रेष्ठ कोणीही नाही, असे पाहून श्रीविषयी आपण विरक्त असताही, श्रीनेच आपणास वरले आहे, म्हणून श्री आपले पायाचा आश्रय करीत आहे. अतएव आपणास श्रीपाद – श्री ज्यांचा पायाचा आश्रय करते- हे नाव आहे. भक्तांना श्री देण्यास आपणास कठीण पडणार नाही हे जाणून आम्ही आपल्या चरणाजवळ आलो आहे.

लक्ष्मी मातेने आपला विरह होऊ नये म्हणून आपल्या चरणाचा आश्रय केला. ती लक्ष्मीरूप श्री आम्हास दिल्यास आपल्या चरणाचा तिला वियोग होईल अशी शंका येऊ नये. कारण आम्हीही आपले अनन्य भक्त असल्याने आपल्या चरणाजवळच राहू. अर्थात् श्रीला आपल्या चरणाचा वियोग होणार नाही. शिवाय साध्वी स्त्रियांचे कर्तव्य पतिआज्ञापालन करणे हे आहे. महालक्ष्मी ही महासाध्वी असल्याने अस्मदनुग्रहरूप आपली आज्ञा ती मोडणार नाही, हे सर्व लक्षात आणून श्रीवल्लभ असे आपण आपले नाव ठेवून घेतले आहे. हे ऐकूनच आम्ही आपले चरणाजवळ याचनेकरिता आलो आहो.

**''आचाराच्छ्रियमाप्नोति''** आचारापासून लक्ष्मीची प्राप्ती होते, असे मनुस्मृतिकारांचे वचन आहे. कलिकालातील लोक अनाचारी असल्यामुळे त्यांना श्री देता येत नाही अशी शंका घेण्याचे कारण नाही. कारण कर्माचरण यथासांग घडणे फार कठीण आहे. समर्थांनी **''यथा सांग ते कर्म कांहीं घडेना''** असे उद्गार काढले आहेत. म्हणूनच त्यांनी व इतर साधुसंतांनी सोप्या अशा भक्तिमार्गाचाच प्रसार कलिकालात चहूकडे केला. आपणास जाती, आचार, वयरूप, कुलशील हे काहीच प्रिय नसून केवळ भक्ती हीच प्रिय आहे. **''भक्त्याहमेकयाग्राह्यः''** असे उद्धवास आपण वचन दिले आहे. अजामिल, गणिका, गृध्र, व्याध वगैरे अनाचारी व दुराचारी लोकांवरही आपण त्यांची भक्ती पाहूनच अनुग्रह केला व आपले भावग्राह्य म्हणजे भक्तिवश असे ब्रीद गाजविले. तरी आमचा दुराचार व अनाचार याकडे दुर्लक्ष करून आमच्या भोळ्या भावास आपण वश व्हाल या आशेने आम्ही आपल्या चरणी शरण आलो आहो.

देहादिकाचे ठिकाणी अहंपणा व पुत्रस्त्रियादिकांवर ममतारूप अज्ञान म्हणजे अविद्या, अस्मिता म्हणजे गर्व; विषयाचे ठिकाणी आसक्ति म्हणजे राग, शत्रुत्व अहितकर्ते जे लोक त्यांचेवर क्रोध म्हणजे द्वेष, जाती कुलशीलादिकांचा अभिमान म्हणजे अभिनिवेश हे अविद्याअस्मिताराग द्वेषाभिनिवेशरूप पांच क्लेश आमचे अंगी पूर्णपणे वास करीत असल्याने आम्ही कृपेस पात्र नाही; हे जरी खरे असले तरी या सर्व क्लेशांचे समूल उच्चाटन करणे हे आपले ब्रीद आहे, हे ऐकून भो क्लेशहारिन् आपल्या चरणास आम्ही शरण आहो. आपण शरणागताची उपेक्षा केलेली ऐकिवात नाही व ''मी शरणागताची उपेक्षा करणार नाही'' अशी आपली प्रतिज्ञा आहे. तरी आपण ती प्रतिज्ञा मोडणार नाही अशी आमची पूर्ण खात्री आहे.

देवा ! आपण मृत सतीपतीला उठविले, अंत्यजाचे मुखातून वेद वदविले, साठ वर्षांच्या वंध्येला कन्या पुत्र दिले, शिरोळग्रामस्थ द्विजस्त्रीला पुत्र देऊन तो मृत असता जीवविले, चोरहत वल्लभद्विजरूप उदिमास वाचविले, दीन कुष्ठ विप्राचे अंग सुवर्णमय केले, त्रिविक्रमभारतीला विश्वरूप दाखविले, किडल्या काष्ठाचा प्रफुल्लित तरू केला, दिपवाळीस अष्टरूप धारण करून स्वभक्तवांछा पुरविली, कुलवाडी शूद्र भक्तास हजारो खंडी धान्य दिले, अमरापुरस्थ द्विजाचे दारिद्य हरण करून सुवर्णकुंभ दिला. तंतुकाला एका क्षणात श्रीशैल्यास नेऊन आणले, नरकेसरीला सर्वदेवस्वरूप मीच आहे, असे प्रत्ययास आणले हे आपले गुणवर्णन करता करता शेषादिक सुद्धा थकले, अशी आपली सुकीर्ती आहे. तरी हे सुकीर्ते गुरुराया, या सर्व भक्तांप्रमाणे आमच्यावरही आपण कृपादृष्टी करा व आमची आध्यात्मिक, आधिभौतिक व आधिदैविक अशी जी सर्व दुःखे, या दुःखांपासून व घोर कष्टापासून आमचा उद्धार करा. आमच्याजवळ आपणास वश करण्याकरिता इतर भक्तांप्रमाणे काहीच साधने नाहीत. आमचा केवळ आपणाला नमस्कार आहे. आपण नमस्कारप्रिय आहा. त्यानेच आपण संतुष्ट व्हावे व आम्हा दीनावर अनुग्रह करावा अही आपल्या चरणकमलापाशी आमची अनन्यभावाने प्रार्थना आहे. ।।१।।

## श्लोक दुसरा

**त्वं नो माता त्वं पिताऽऽप्तोऽधिपस्त्वम् ।**
**त्राता योगक्षेमकृत्सद्गुरुस्त्वम् ।।**
**त्वं सर्वस्वं नोऽप्रभो विश्वमूर्ते ।**
**घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते ।।२।।**

हे अप्रभो विश्वमूर्ते, त्वं नो माता त्वं नः पिता त्वं नः आप्तः त्वं नो अधिपः त्वं नः योगक्षेमकृत् त्वं नः सद्गुरु त्वं नः सर्वस्वं अस्मान् घोरात्कष्टादुद्धर ते नमः ॥२॥

## संक्षिप्तार्थ

हे अप्रभो (नाही प्रभू ज्याला तो अप्रभु म्हणजे सर्वप्रभु) सर्वप्रभो विश्वमूर्ते तू आमची माता, पिता, मालक, योगक्षेम चालविणारा सद्गुरु व सर्वस्व आहेस; म्हणून आमचा या घोर कष्टातून उद्धार कर. तुला नमस्कार असो ॥२॥

## विवरण

ज्याला दुसरा प्रभु असतो त्याला सप्रभू म्हणतात. देवा, आपण सर्वांचे प्रभु असल्यामुळे नाही प्रभु ज्याला असे आपण 'अप्रभु' आहां. सर्वेश्वर आहां. सर्व चराचरविश्व ही आपली मूर्ती असल्यामुळे आपण विश्वमूर्ती आहां. भूत भविष्य वर्तमान सर्व विश्व हे आपले सगुणरूप आहे. आपले स्वरूप या विश्वाहून वेगळे असे जरी दिसत असले तरी 'सर्व खल्विदंब्रह्म' या श्रुतिवाक्याने ते आपले स्वरूपच आहे.

हे सर्वेश्वरा विश्वमूर्ते, मातापिता, आप्तेष्ट, राजा, रक्षक, योगक्षेम करणारे म्हणजे प्रपंचात व परमार्थात भक्तास अपेक्षित असेल ते देऊन त्याचे रक्षण करणारे सद्गुरु या सर्व स्वरुपाने आपणच नटलेले आहां व त्या त्या रूपाने सर्व प्रजांचे पालन आपणच करीत आहां. हे मातापितादि सर्व लोक निमित्तमात्र आहेत. आपल्या सत्तेशिवाय जगात कोणतेही कार्य होत नाही. आपण पर्जन्यवृष्टीच केली नाही तर प्रजांचे जीवन कोण करील ? मातेचे स्तनात दुग्धोत्पत्तीच केली नाही तर माता शिशूचे रक्षण कसे करील ? आपण सामर्थ्य व ज्ञान दिले नाही तर रक्षक लोक रक्षण कसे करतील ? व शिक्षक तरी शिक्षण कसे करतील ? तर देवा आपणच खरे मातापिता वगैरे आहां. विश्व हे आपले नाटक आहे. त्याचे सूत्रधार आपण आहां. हे सर्व लोक खांबसूत्री बाहुलीप्रमाणे परतंत्र, भवदधीन आहेत, असे आम्ही पूर्णपणे ओळखले असल्याने, आमच्या रक्षणाची किंवा योगक्षेमाची अथवा ज्ञानोपदेशाची याचना इतरांस न करता आमचे सर्वस्व आपण आहा असे जाणून आपल्या चरणास आम्ही शरण आलो आहो. तरी हे सर्वेश्वरा ! आम्हाला या घोर संकटातून पार करा. आपल्या चरणाला आमचा नमस्कार असो ॥२॥

## श्लोक तिसरा

**पापं तापं व्याधिमाधिं च दैन्यं ।**
**भीति क्लेशं । त्वं हराऽशुत्वदन्यम् ।।**
**त्रातारं नो वीक्ष ईशास्तजूर्ते । घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते ।।३।।**

हे ईश त्वं पापं तापं व्याधिं आधिं दैन्यं भीतिं क्लेशं च आशु हर, हे अस्तजूर्ते त्वदन्यं त्रातारं नो वीक्षे अस्मान् घोरात् कष्टात् उद्धर ते नमः ।।३।।

### संक्षिप्तार्थ

हे ईश्वरा ! तू आमचे पाप, ताप शारीरिक व्याधी, मानसिक आधी, दारिद्र्य, भीती व क्लेश यांचे सत्वर हरण कर. हे पीडानाशका, तुझ्यावाचून अन्य त्राता आम्हाला दिसत नाही. याकरिता आमचा या घोर संकटातून उद्धार कर. तुला नमस्कार असो. ।।३।।

### विवरण

हे ईश्वरा, आमच्याकडून या जन्मी पदोपदी घडत असलेल्या कायिक, वाचिक, मानसिक, सांसर्गिक, ज्ञात, अज्ञात अशा सर्व पापांचे हरण करा. तसेच पूर्वीच्या अनंत जन्मांमध्ये साठलेल्या कायिकादि सर्व पापांचे समूळ उच्चाटन करा. तसेच पांचभौतिकांपासून होणारे आधिभौतिक ताप, भूत, प्रेत, पिशाच, यक्षराक्षसादिकांपासून होणारे आधिदैविक ताप, शरीरास व्याधिरूपाने व मनास आधिरूपाने जे पीडा करतात त्यांचा समूळ उच्छेद करा. सर्व सद्गुणांवर आच्छादन घालणारी दरिद्रता, व्याघ्रादि हिंस्रप्राणी व शत्रू, यमधर्म इत्यादिकांपासून वाटणारी भीती व पूर्वी वर्णन केलेले व त्याहून इतर सर्व क्लेश आम्हास फार पीडा देतात. त्या सर्वांचा नायनाट करा. पूर्वी रोगांनी सर्व प्रजा व्याप्त झाल्या असता अत्रिऋषी व पतंजलीचा अवतार धारण करून औषध योजनेने सर्वांची शारीरिकपीडा आपण नष्ट केली. भूतप्रेतसमंधादिकांपासून होणारी मानसिक व शारीरिक आधिव्याधी आपण घालविली याबद्दल शिरोळ ग्रामीची द्विजस्त्री प्रभृतींची कथा ऐकिवात आहे व प्रत्यही आरतीसमयी शेकडो लोकांची बाधा दूर होत असलेले अनुभवात आहे. म्हणून ज्यांचेपासून (द्वारा) जूर्ती-पीडा नष्ट झाली आहे असे आपणच खरे अस्तजूर्ती आहात; हे जाणून आम्ही आपणास शरण आलो आहो. आमच्या शरीरात आजन्मवास करीत असलेले आधिव्याधी

व काम क्रोधादि समंध यांचा समूळ उच्छेद करा. आपल्यावाचून दुसरा कोणीही त्राता आम्हास दिसत नाही. 'भयनाशन' असे आपले ब्रीद आहे. तरी हे अस्तजूर्ते, आमचा या घोर संकटातून उद्धार करा. आपणाला आमचा नमस्कार असो. ।।३।।

## श्लोक चवथा

**नान्यस्त्राता नापि दाता न भर्ता ।**

**त्वत्तो देव त्वं शरण्योऽकहर्ता ।। कुर्वात्रेयानुग्रहं पूर्णराते ।**

**घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते ।।४।।**

हे देव त्वत्तोऽन्यस्त्राता न, दाता न, भर्ताऽपि न, त्वं शरण्यः, अकहर्ताऽसि, हे आत्रेय, अनुग्रहं कुरु हे पूर्णराते घोरात्कष्टादस्मानुद्धर ते नमः ।।४।।

## संक्षिप्तार्थ

हे देवा, आम्हास तुझ्याहून दुसरा त्राता नाही. दाता नाही. भर्ताही नाही. तू शरणागतरक्षक व दुःखहर्ता आहेस. हे आत्रेया, आमच्यावर अनुग्रह कर. हे पूर्णकामा, घोर संकटापासून आमचा उद्धार कर. तुला नमस्कार असो.।।४।।

## विवरण

हे देवा, आम्हास आपल्याशिवाय दुसरा त्राता कोणीही नाही. जगामध्ये आई, बाप, बंधू, बहीण वगैरे पुष्कळ त्राते आहेत, अशी समजूत आहे. परंतु खरा त्रातेपणा आपलेच ठिकाणी आहे. तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगात "काळाची ही उडी पडेल बा जेव्हां ।। सोडवी ना तेव्हां माय बाप ।। सोडविना बंधू पाठीची बहीण ।। शेजेची कामीन दूर राहे ।। सोडवीना राजा देशीचा चौधरी ।। आणीक सोयिरी भली भली ।। तुका म्हणे तूज सोडविना कोणी ।। एका चक्रपाणी वाचोनीया ।।" असे वर्णन करून आपल्याशिवाय दुसरा त्राता नाही असे दर्शविले आहे. अंती धन जागचे जागी राहाते. पशू गोठ्यात, भार्या गृहद्वारात, जन स्मशानापर्यंत व देह चितेपर्यंत येतो. सर्वदा बरोबर राहून रक्षण करणारे आपणच आहा. आपण धन-धान्यादिकांची समृद्धी व सद्बुद्धि दिल्यास इतर लोक दानशूर होतात. म्हणून आपल्यावाचून दाताही कोणी नाही. याप्रमाणे अन्नादिकाने दीन जनांचे पोषण करणारे लोक केवळ निमित्तमात्र आहेत. खरे पोषक, भर्ता आपणच आहा. भगवन् ! आपण शरणागतांचे रक्षक व आश्रय असे आहात. आजपर्यंत अनेक शरणागतांना आपण आश्रय देऊन त्यांचे रक्षण केले म्हणून आपले शरण्य हे ब्रीद

आहे. आपण पूर्णराती म्हणजे पूर्णकाम नित्यतृप्त आहा. आमच्यापासून आपल्यास कोणत्याही गोष्टीची अपेक्षा नाही, तरी हे अत्रिसुता ! अत्रिऋषी व अनसूया यांच्या भक्तिभावास भुलून जशी त्यांच्यावर कृपा केली तसाच अनुग्रह आमच्या ठिकाणी भक्ती वगैरे काही नसताही करावा व आम्हास या घोर कष्टातून उद्धरावे. आमचा आपल्याला नमस्कार असो. ॥४॥

## श्लोक पाचवा

**धर्मे प्रीतिं सन्मतिं देवभक्तिं ।**
**सत्संगाप्तिं देहि भुक्तिं च मुक्तिम् ॥**
**भावासक्तिं चाखिलान्दमूर्ते । घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते ॥५॥**

### अन्वय

हे अखिलानंदमूर्ते देव, धर्मे प्रीतिं सन्मतिं भक्तिं सत्संगाप्तिं भुक्तिं मुक्तिं भावासक्तिं च देही, अस्मान् घोरात्कष्टादुद्धर ते नमः ॥५॥

### संक्षिप्तार्थ

हे अखिलानंदकारकमूर्ते देवा ! आम्हाला धर्माचे ठिकाणी प्रीती, भुक्ती, मुक्ती व भक्तीचे ठिकाणी आसक्ती दे. सर्व घोर कष्टातून आमचा उद्धार कर. तुझे चरणारविंदी आमचे शतशः प्रणाम असो ॥५॥

### विवरण

हे देवा, अखिलांना आनंद देणारी आपली मूर्ती आहे. आपण धारण केलेल्या सगुणरूपाकडे पाहात बसले असता सर्वांना परमानंद होतो. सर्वानन्दाचा अंतर्भाव ज्यामध्ये होतो असा जो ब्रह्मानंद त्या ब्रह्मानंदाची आपण मूर्ती आहां. आपल्या मनोहर निर्गुण पादुकांकडे व वदनकमलाकडे पाहाणाऱ्यांची क्षुधा, तृषा हरून जाऊन ''ब्रह्मानंदी लागली टाळी । कोण देहाते सांभाळी ।'' अशी अवस्था होते. तेथून चित्तवृत्ती बाहेरच येत नाही. यदाकदाचित् प्रारब्धवशात् जर ती चित्तवृत्ती बाहेर आलीच तर, देवा पुनः ती आपल्या आनंदमयस्वरूपात लीन होण्याकरिता आपल्या भागवतधर्माचे ठिकाणी व तदनुकूल श्रुतिस्मृत्युदित धर्माचे ठिकाणी आमचे अंतःकरणात प्रीती असावी. दुर्बुद्धीचा लय होऊन सर्वदा सत्स्वरूपाचे ठिकाणी चित्तवृत्ती ठेवण्यास आम्हास चांगली बुद्धी असावी आणि ती बुद्धी सती म्हणजे पतिव्रतेसारखी एकनिष्ठ अव्यभिचारिणी अशी व्हावी. प्रारब्धकर्मवशात् कोणत्याही योनीत जरी वारंवार जन्म

आले, तरी आपल्या चरणारविन्दी आमची दृढभक्ती असावी. आपली अखंड सेवा आमचे हातून घडावी. आपल्या स्वरूपात अखंड लीन असणारे संत व सद्गुरु यांची अखंड संगती असावी. दारिद्र्यादिकांपासून संतसंगतीत विघ्न न यावे म्हणून भुक्ती म्हणजे पोटभर अन्न व वस्त्र मिळावे. अर्थात् प्रंपचातील कोणत्याही गोष्टीची उणीव नसावी. सर्व सांसारिक बंधांचा नाश होऊन अखंड, अद्वितीय, परिपूर्ण सच्चिदानंद अशा आपल्या स्वरूपाशी ऐक्यरूप जी मुक्ती तीही व्हावी व मुक्तीच्या नंतरची जी भक्ती तिच्या ठिकाणी सर्वात्मना अंतःकरणात आसक्ती असावी. आपल्या यशःकीर्तनाने व नामस्मरणाने ब्रह्मांड गाजविण्याचे सामर्थ्य जिच्या ठिकाणी आहे, अशी जी भावासक्ती--ज्ञानोत्तर भक्ती ती निरंतर हृदयात असावी. अशी आमची अखेरची व निर्वाणीची प्रार्थना आहे. तरी देवा, श्रीपादश्रीवल्लभा, श्रीनृसिंहसरस्वते, आमचा घोर संकटातून उद्धार करून आमच्या सर्व कामना परिपूर्ण कराव्या. आमच्याजवळ आपणास संतुष्ट करण्यास दुसरे काहीच नाही म्हणून आपल्या चरणकमलास आमचे अनंत प्रणाम असोत ।।५।।

## श्लोक सहावा

**श्लोकपंचकमेतद्यो लोकमङ्गलवर्धनम् ।।**
**प्रपठेन्नियतो भक्त्या स श्रीदत्तप्रियो भवेत् ।।६।।**

## अन्वय

**लोकमङ्गलवर्धनमेतच्छलोकपंचकं नियतः ।**
**यः भक्त्याप्रपठेत् स श्रीदत्तप्रियो भवेत् ।।**

## अर्थ

श्री सद्गुरुमहाराज म्हणतात –

''सर्वांचे कल्याण करणारे हे श्लोकपंचक नियमपूर्वक नित्यशः भक्तिभावाने जो पठण करील तो मनुष्य श्रीदत्ताला अत्यंत प्रिय होईल. व श्रीदत्तही उत्तरोत्तर या भक्ताला प्रिय होईल'' असा माझा आशीर्वाद आहे ।।६।।

श्रीगुरुदेवदत्त ॐतत्सत् श्रीगुरुदेवदत्त ।।

।। श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ।।

❖❖❖

## १०३. श्रीदत्तस्तोत्रम्

अनसूयात्रिसंभूत दत्तात्रेय महामते ।
सर्वदेवाधिदेव त्वं मम चित्तं स्थिरीकुरु ॥१॥

शरणागतदीनार्ततारकाऽखिलकारक ।
सर्वचालक देव त्वं मम चित्तं स्थिरीकुरु ॥२॥

सर्वमंगलमांगल्य सर्वाधिव्याधिभेषज ।
सर्वसंकटहारिन् त्वं मम चित्तं स्थिरीकुरु ॥३॥

स्मर्तृगामी स्वभक्तानां कामदो रिपुनाशनः
भुक्तिमुक्तिप्रदः स त्वं मम चित्तं स्थिरीकुरु ॥४॥

सर्वपापक्षयकरस्तापदैन्यनिवारणः ।
योऽभीष्टदः प्रभुः स त्वं मम चित्तं स्थिरीकुरु ॥५॥

य एतत्प्रयतः श्लोकपंचकं प्रपठेत्सुधीः ।
स्थिरचित्तः स भगवत्कृपापात्रं भविष्यति ॥६॥

**इति श्री प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वतीविरचितं**
**श्रीदत्तात्रेयस्तोत्रं संपूर्णम्**

✿ ✿ ✿

॥ श्रीगणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

# श्रीमद् वासुदेवानंदसरस्वतीविरचितं दत्तस्तोत्रम्

## लेखक - कै. ब्रह्मश्री पंडित आत्मारामशास्त्री जेरे, ठाणे

''मनसश्चेंद्रियाणांच त्वैकाग्र्यं परमं तपः'' या स्मृतिवाक्याने मनाचे व इंद्रियांचे ऐकाग्र्य करणे ही मोठी तपश्चर्या आहे; असे म्हटले आहे. मन हे सर्व इंद्रियांचा राजा आहे; असे श्रुती सांगते. ज्याप्रमाणे मधमाशांचा राजा जिकडे जाईल तिकडे सर्व मधमाशांचा समुदाय जातो असा दृष्टांत श्रुतीने देऊन मनाला इंद्रियांचा राजा अशी पदवी दिली आहे. 'राजा हाले आणि दळ चाले' अशी लौकिक म्हणही आहे. 'मनोदशेंद्रियाध्यक्षं' असे पंचदशीत विद्यारण्यस्वामीमहाराज म्हणतात. जसे कामगारांवर एक मुकादम नेमलेला असतो, त्याच्या अनुरोधाने व आज्ञेने सर्व चाकर लोक बिनबोभाट आपापली कामे करतात तसे मनाच्या अनुरोधाने व आज्ञेने सर्व इंद्रिये आपापली पाहाणे, ऐकणे इत्यादी कामे व्यवस्थित रीतीने करतात, एवढा मोठा मनाचा अधिकार आहे. 'परतंत्रं बहिर्मनः' म्हणजे शरीराच्या आतील आत्मादि विषयात मन जरी स्वतंत्र असले तरी रूपरसगंधादि शरीराबाहेरील विषयांत मन इंद्रियाधीन म्हणजेच परतंत्र आहे, असे न्यायशास्त्रकार म्हणत असले तरी मनाची प्रेरणा असल्याशिवाय इंद्रिये बाहेर प्रवृत्तच होऊ शकत नाहीत. म्हणजे मनाला इंद्रियांचे व इंद्रियांना मनाचे साहाय्य अगदी आवश्यक आहे. मन हे राजाप्रमाणे स्वतंत्र आहे व इंद्रिये ही नोकराप्रमाणे मनाच्या स्वाधीन आहेत; यात शंका नाही. म्हणूनच मनाचे व इंद्रियांचे ऐकाग्र्य करणे व एका विषयात दोघांचे वास्तव्य ठेवणे ही मोठी तपश्चर्या आहे. कर्ण व अर्जुन जर एकाच पक्षात सामील झाले असते तर भगवंताला भारतीय युद्धाचा प्रसंगच आला नसता; असे शहाणे लोक म्हणतात. रामदास, तुळसीदास प्रभृती मोठ्या संतांनीसुद्धा ''मना सज्जना भक्तिपंथेची जावे । तरी श्रीहरी पाविजे तो स्वभावे' इत्यादि वाक्यांनी मनालाच उपदेश केला आहे. यातील तरी रहस्य हेच आहे की, **''मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः। बंधाय**

**विषयासक्तं मुक्त्यै निर्विषयं स्मृतम् ।।**" असे उपनिषदात सुद्धा म्हटले आहे. यावरून मनाचा अधिकार केवढा मोठा आहे हे सहजच कळून येण्यासारखे आहे. बंध म्हणजे त्रिविध दुःख व त्याचे साधन आणि मोक्ष म्हणजे परमानंद व त्याचे साधन. हे दोन्हीही मनाच्या आधीन आहेत. त्रिविध दुःखं व त्यांची साधने पाहिजे असल्यास मनाने विषयात रमावे व परमानंद म्हणजे मुक्ती व श्रवणमनननिदिध्यासादि मुक्तीची साधने पाहिजे असल्यास मनाने निर्विषय व्हावे म्हणजे चित्तातील विषयाकार वृत्ती काढून टाकल्या की सहजच ते मन स्वतःच आत बाहेर भरून असलेल्या ईश्वराचा आकार घेईल. घागरीत भरलेले धान्य काढून टाकले म्हणजे घागरीतील स्वतःसिद्ध आकाश बाहेरून भरावे लागत नाही. त्याप्रमाणेच येथेही अनीश्वरगोचर वृत्ती मनातून काढून टाकल्या की स्वतःसिद्ध ईश्वराकार वृत्ती सहजच सिद्ध होते. बाहेरून ईश्वराला मनात भरावे लागत नाही. यालाच मनाचे व इंद्रियांचे ऐकाग्र्य असे म्हणतात, आणि सर्व तपांपेक्षा हे मोठे तप आहे, म्हणून '**परमंतपः**' असे स्मृतिकारांनी म्हटले आहे. निर्विषय वृत्ती व ईश्वरविषय वृत्ती या दोहोंचा अर्थ एकच आहे. ईश्वर हा विषय नसल्याने तद्विषयक वृत्ती ही निर्विषय वृत्तीच म्हटली जाते. '**नकिंचिदपिचिंतयेत्**' या ईश्वराकार वृत्तीकरिता व अनीश्वराकार वृत्ती नाहीशा करण्याकरिताच सगुण ईश्वराचे चिंतन सांगितले आहे. सगुणेश्वरभजनाने मन एकदा साधकाच्या ताब्यात आले, की उपाधिकल्पनारहित म्हणजे '**अपेतोपाधिकल्पनम्**' असे ईश्वराचे खरे रूप आपोआपच चित्तात प्रगट होते असे म्हटले आहे व हा उपाय फार उत्तम, सुलभ व क्लेशरहित आहे असे गीतेच्या बाराव्या अध्यायात '**मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते । श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्ततमा मताः ।।**' असे अनंतकोटी ब्रह्माण्डनायक भगवान् श्रीकृष्णपरमात्म्यांनी सांगितले आहे. त्यांच्याशिवाय त्यांच्या खऱ्या स्वरूपाच्या प्राप्तीचा सुलभसुखकर उपाय दुसरा कोण सांगू शकणार ? एकंदरीत मन निर्विषय करण्यास सुलभ उपाय सगुण-भजन करणे हाच आहे हे सिद्ध झाले.

मन हे इंद्रियांचा राजा आहे. परंतु प्राणापानव्यान इत्यादि भेद भिन्न जो प्राण त्याचा राजा मन नाही. कारण झोपेत मन लीन झाले असताही म्हणजे नष्ट झाले असताही प्राणापानादि प्राणाचे व्यापार चालू असतात. त्याचप्रमाणे इंद्रियेही पाहाणे, ऐकणे व वास घेणे यात एक तऱ्हेने स्वतंत्रच आहेत. इंद्रियांशिवाय केवळ मनाला रूपरसगंधादिकांचे ज्ञान होणे संभवनीय नाही. आंधळ्या माणसाला मन असूनही रूप दिसत नाही. बहिऱ्या मनुष्याला मन असूनही शब्द ऐकू येत नाहीत. यावरून

इंद्रियांची योग्यताही काही लहान नाही. म्हणजे मन जसा राजा तसा प्राणही राजा व इंद्रियेही राजा आहेत. कारण आपापल्या विषयात सर्वच राजे आहेत. म्हणजे मन-प्राण-इंद्रिये हे सार्वभौम राजे नव्हेत. हे मांडलिक राजे आहेत. सर्वांवर ज्याची सत्ता आहे तो खरा राजा व त्याला सार्वभौम राजा असे म्हणतात. सार्वभौम राजे दोन असत नाहीत. तो एकच असतो. त्याला नुसता भौम राजा वाटेल तर म्हणावे. सार्वभौम म्हणजे सर्व राजांवर सत्ता चालविणारा राजा अशी त्याची व्याख्या आहे. म्हणून सर्व मांडलिक राजांचा जो राजा तोच सार्वभौम राजा. म्हणजे इंद्रियांना आपापल्या विषयांचे प्रकाशन करण्याचे सामर्थ्य देणारा, प्राणांना आपल्या विषयात संचार करण्याचे सामर्थ्य देणारा व मनालाही आपल्या विषयात प्रकाश करण्याचे सामर्थ्य देणारा जो राजा तोच सार्वभौम राजा आहे व त्याच्या आधीन हे सर्व राजे आहेत. तो मात्र कोणाच्याही आधीन नाही. असा सर्वतंत्र स्वतंत्र राजा म्हणजेच ईश्वर हा सार्वभौम राजा आहे व तो एकमेवाद्वितीय असा राजा आहे. त्याला प्रसन्न केले म्हणजे इतर राजांपुढे कुत्र्याप्रमाणे शेपूट हालविण्याचे कारण नाही. महाराजाला प्रिय असणाऱ्या दासीचाही अधिकार मंत्री व मांडलिक राजे यांच्यावर चालतो हे सर्वांना नवीन आहे. केनोपनिषदात हे ईश्वराचे सार्वभौमत्व फार उत्कृष्ट रीतीने सांगितले आहे ते तेथेच अधिक जिज्ञासूने पाहावे. परमपूज्य प्रातःस्मरणीय श्रीमद्वासुदेवानंदसरस्वती स्वामिमहाराजांनी श्रीदत्तमहाराजांच्या एका प्राकृत पद्यात **''सर्व इंद्रिये आणि मन हे तुझे हाती आहे । यास्तव आता तूं लवलाहे स्वपदी मन रमवावे ।''** असे दत्तमहाराजांजवळ मागितले आहे. दत्तमहाराज हे अनंतकोटिब्रह्मांडनायक आहेत, असे **'नरा दत्तगुरु हे परब्रह्म आहे । होइ जागृत उगा फससि मोहे ।'** अशा पद्यात म्हटले आहे. प्राकृतस्थली महाराजांच्या ज्या संस्कृत स्तोत्राचे मराठी भाषांतर द्यायचे आहे, त्या स्तोत्रात साधकांनी आपल्या परम कल्याणाकरिता प्रभूजवळ काय मागावे ते दाखविले आहे. म्हणून हे स्तोत्र साधकांना फारच उपयोगी व उत्कृष्ट आहे. याचा आपण जितका जप मनःपूर्वक करू तितका आपला मार्ग दत्तगुरुजवळ जाण्याला सुलभ होईल व लवकरच संपेल. **'यद्गत्वा न निवर्तंते तद्धाम परमं मम ।'** असे जे धाम तेच आपण होऊं. मग चारी धामाला जाण्याची आवश्यकताच नाही. सर्व साधक आपल्याच धामाकडे येतील. आता आपण या स्तोत्राच्या अर्थाकडे पाहू.

## स्तोत्रादि संग्रहातील क्र. १०३ (चे)
## चंचलचित्त स्थिर करणारे श्रीदत्तस्तोत्र आहे.

**अनसूयात्रिसंभूत दत्तात्रेय महामते ।**
**सर्वदेवाधिदेव त्वं ममचित्तं स्थिरी कुरु ।।१।।**

**अन्वय :** हे अनसूयात्रिसंभूत, हे महामते, हे सर्वदेवाधिदेव (दत्तात्रेय) त्वं ममचित्तं स्थिरी कुरु ।।१।।

**अर्थ :** जगद्विख्यात पतिव्रता अनसूया व निस्त्रैगुण्य म्हणजे काममूलक त्रिगुणात्मक संसाराला उल्लंघून जाणारे - म्हणूनच 'अ' 'त्रि' म्हणजे त्रिगुणसंसाररहित - यांच्या तपश्चर्येला प्रसन्न होऊन त्यांच्या इच्छेप्रमाणे त्यांच्या पोटी जन्म घेणाऱ्या **'वसुधैव कुटुंबकम्'** म्हणजे सर्व आपलेच आहेत, अशी विशाल बुद्धी - महामती असणाऱ्या चंद्रसूर्यादि इंद्रियबुध्यादि जेवढे प्रकाशक पदार्थ आहेत ते 'दिवु' धातूचे अर्थ आहेत. त्या सर्वांना प्रकाशकत्वरूप सामर्थ्य देणाऱ्या म्हणूनच देवांच्याही श्रेष्ठ देवा, अत्रिऋषीला कोणीही कधीही न दिलेले आत्मदान करणाऱ्या म्हणूनच अत्रितनया दत्ता, दत्तात्रेया ज्याला स्थिर करणे आपल्या कृपेशिवाय इतर कोणत्याही साधनांनी अशक्य आहे, अशा माझ्या अनिवार्य चित्ताला आपण स्थिर करा, अचंचल करा ।।१।।

**शरणागतदीनार्ततारकाऽखिलकारक ।**
**सर्वचालक देव त्वं ममचित्तं स्थिरी कुरु ।।२।।**

**अन्वयः** हे शरणागत दीनार्ततारक, हे अखिलकारक, हे सर्व चालक, हे देव त्वं मम चित्तं स्थिरी कुरु ।।२।।

**अर्थ :** 'आपल्याशिवाय मला दुसरा कोणीही त्राता नाही, असा पक्का निश्चय करून देवा माझे रक्षण करा' असे म्हणून सर्वस्वी आपणाला जे शरण आले आहेत अशा लोकांना, अत्यंत दैन्यावस्थेला प्राप्त झालेल्यांना म्हणजे दीनांना आणि कायिक, वाचिक व मानसिक अशा सर्व प्रकारच्या पीडेने ग्रासलेल्या, गांजलेल्या त्या लोकांना, त्यांच्या सर्व आपत्ती दूर करून संसारातील सर्व आनंद देणाऱ्या व त्यांचा जन्ममरणादि संसार नाहीसा करून परमश्रेष्ठ मोक्षपदही देणाऱ्या देवा, तसेच जगाची उत्पत्ती, स्थिती व लयरूप अखिल कार्ये करणाऱ्या व कर्ता, कर्म, करण, संप्रदान, अपादान व अधिकरण अशा सहाकारकांचे रूप धरणाऱ्या देवा मन, इंद्रिये व प्राण

इत्यादि सर्वांना इच्छामात्रेकरून प्रवृत्त करणाऱ्या सर्वचालक देवा, अत्यंत चंचल असे माझे चित्त स्थिर करा. ।।२।।

**सर्वमंगलमांगल्य सर्वाधिव्याधिभेषज ।**

**सर्वसंकटहारिन् त्वं ममचित्तं स्थिरी कुरु ।।३।।**

**अन्वय :** हे सर्व मङ्गल-माङ्गल्य, हे सर्वाधिव्याधिभेषज, हे सर्वसंकटहारिन् (दत्त) ममचित्तं स्थिरी कुरु ।।३।।

**अर्थ :** सर्व वेद व वेदार्थ प्रकट करणारी जी सर्व शास्त्रे यांनी जगाच्या कल्याणाकरिता जी मङ्गल कार्ये म्हणजे आचार-व्यवहार व प्रायश्चित्तादि धर्मकार्ये या सर्वांना मांगल्य म्हणजे जगाचे कल्याणकारित्व, देवा ! दत्तराया, आपल्या योगानेच आहे. आपल्याला ही कर्मे समर्पण झाली म्हणजेच या कर्मांना मंगलत्व येते. नाहीतर ही मंगल असूनही अमंगल म्हणजे दुःखप्रदच संसारदायक होतात. असे मंगलांचे मंगलत्व संपादन करणाऱ्या देवा, तसेच सर्व 'आधी' म्हणजे मानसिक व्यथा व 'व्याधी' म्हणजे शारीरिक व्यथा या सर्वांना आपले स्वरूप, भेषज म्हणजे औषधरूप आहे. आपल्या स्वरूपाकडे पाहिले, आपले स्मरण केले, आपल्या शरीराला स्पर्श केला, आपल्या चरणांचे तीर्थ घेतले, अधिक काय सांगावे आपल्यावरून ओवाळलेल्या धूपाचा व दीपाचा स्पर्श, आपल्या अंगावरील चंदनाचा वस्त्रालंकाराचा स्पर्श व आपल्या नामाचा जपसुद्धा आधिव्याधी समूळ नाश करणारी जालीम मात्रा आहे, हे काय सांगावे. म्हणून हे सर्व आधिव्याधिभेषज असणाऱ्या श्रीदत्तराया, तसेच कोणत्याही भयंकर संकटाचे तत्काळ नाश करणाऱ्या देवा, याला उदाहरणे आपल्या चरित्रात शेकडो, हजारो व लाखो आहेत. ती ते चरित्र वाचूनच जाणली पाहिजेत. तरी सर्व संकट हरण करणाऱ्या दयासागर दत्ता माझे चित्त स्थिर करा. ।।३।।

**स्मर्तृगामी स्वभक्तानां कामदो रिपुनाशनः ।**

**भुक्तिमुक्तिप्रदः स त्वं ममचित्तं स्थिरी कुरु ।।४।।**

**अन्वय :** हे श्रीदत्त त्वं स्वभक्तानां स्मर्तृगामी कामदः रिपुनाशनः भुक्तिमुक्तिप्रदः (असि) स त्वं ममचित्तं स्थिरी कुरु ।।४।।

**अर्थ :** देवा तुमच्या भक्ताने तुमचे स्मरण करण्याचाच अवकाश, की तुम्ही लगेच त्याच्याजवळ जाता. म्हणूनच लोकातसुद्धा त्याच्याकडे अमुक मनुष्य दत्त म्हणून उभा राहिला अशी म्हण पडली आहे. इतके आपण भक्तांना सुलभ आहात.

असा देव जगात दुसरा नाही. आपले यासाठीच स्मर्तृगामी असे नाव पडले आहे. देवा ! आपण भक्तांच्या सर्व कामना म्हणजे ऐहलौकिक व पारलौकिक सर्व सुखांच्या इच्छा पूर्ण करणारे आहात. म्हणून आपले नाव भक्तकामकल्पद्रुम असे आहे. मनुष्याला कामक्रोधादि अंतःशत्रू व तन्मूलक व्यवहारातील बहिःशत्रू म्हणजेच 'रिपू' फार आहेत. भक्तांच्या सर्व रिपूंचा म्हणजे शत्रूंचा नाश करणारे आपण आहात. तसेच ऐहलौकिक पाहिजे असतील तेवढे भोग मिळतात. याला उदाहरण सहस्रार्जुनादि अनेक आहेत. मोक्षसाम्राज्यलक्ष्मीरूपमुक्ती मिळते. यालाही उदाहरण सहस्रार्जुनादि अनेक आहेत. ही भुक्ती व मुक्ती आपण परिपूर्ण रूपाने देणारे आहात. आपल्यासारखे श्रीमंत जगात आपणच आहात. दुसरा दृष्टांतच देता येणार नाही. म्हणून आपल्यासारखे श्रीमंत आपणच आहात. तरी सर्व श्रीमंतांचे श्रीमंत असे आपण माझ्या चित्ताला स्थिर करा अशी मी याचना करतो. ।।४।।

**सर्वपापक्षयकरस्तापदैन्यनिवारणः ।**

**योऽभीष्टदः प्रभुः स त्वं ममचित्तं स्थिरी कुरु ।।५।।**

**अन्वयः** सर्वपापक्षयकरः तापदैन्यनिवारणः अभीष्टदः यः प्रभुः स त्वं (अतः) ममचित्तं स्थिरी कुरु ।।५।।

**अर्थ** : देवा ! आध्यात्मिक म्हणजे शरीरातच होणारे ज्वर, रोगादि ताप, आधिभौतिक म्हणजे इतर प्राण्यांपासून होणारे नानाप्रकारचे ताप व भूतप्रेतपिशाच इत्यादिकांपासून होणारे ताप म्हणजे आधिदैविक ताप, असे त्रिविध ताप व सर्व गोष्टींत दारिद्य, दैन्य वगैरे नानाप्रकारची दुःखाची साधने, तसेच इष्ट असणाऱ्या वस्तूंचा लाभ न होणे व अनिष्ट वस्तूंचा संबंध होणे ही सर्व दुःखे आम्ही पूर्वी केलेल्या वाईट कर्मांचीच फळे आहेत यात शंका नाही. कारणाशिवाय कार्य होत नाही असा त्रिकालाबाधित सिद्धान्त आहे. नाहीतर गर्भश्रीमंत व गर्भदरिद्री असे जगात का असावे ? अर्थात् पूर्वजन्म व पुनर्जन्म अनादित्व हे सर्व त्याच्या पाठीमागे आलेच. त्याशिवाय काही संगती कोणालाच आजपर्यंत लावता आली नाही व पुढेही लावता येणार नाही. म्हणून त्रिकालाबाधित सिद्धांत असे येथे म्हटले आहे. आपले भजन करणाऱ्या भक्तांचे सर्व पाप आपण प्रथम नष्ट करता. आपल्या भजनाचा हा एक दिव्य प्रभाव आहे. "**मामेकंशरणंव्रज अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ।।**" असे आपण गीतेत म्हटलेले मला आठवते. म्हणून सर्व ताप दैन्य,

इष्टाची अप्राप्ती, अनिष्टाची प्राप्ती या सर्वांचे मूळ कारण जे सर्व पाप, ते आपण नाहीसे करणारे आहात. आपणाला सर्वपापक्षयकर अशी पदवी आहे. रोगाचे निदान पूर्ण जाणून ते नाहीसे करणारा वैद्य हा खरा वैद्य असतो. म्हणून आपणाला **'भवरोगवैद्यम्'** अशी पदवी शास्त्राने दिली आहे. अर्थातच सर्व पाप गेल्यावर पापापासून होणारे ताप, दैन्य, इष्टाप्राप्ती व अनिष्टप्राप्ती प्रभृती, असे पापांचे सर्व परिणाम सहजच नाहीसे आपण करता व मग सहजसिद्ध असणारे, परंतु पाप व तज्जन्य दुःखाने आच्छादित झालेले जे स्वयंसिद्ध, सच्चिदानंदरूप जे परम इष्ट, ते आपण आपल्या भक्तांच्या चित्तात प्रगट करता व प्रभू हे आपले नाम आपण सार्थ करता. तरी हे प्रभो, आपण माझे चित्त स्थिर करा अशी आपल्या चरणी माझी प्रार्थना आहे. ॥५॥

**य एतत्प्रयतः श्लोकपंचकं प्रपठेत्सुधीः ।**

**स्थिरचित्तः स भगवत्कृपापात्रं भविष्यति ॥६॥**

**अन्वयः** एतत् श्लोकपंचकं यः सुधीः प्रयतः प्रपठेत् सः स्थिरचित्तः भगवत्कृपा-पात्रं भविष्यति ॥६॥

**अर्थ :** जो शहाणा माणूस हे पाच श्लोक शुद्ध मनाने एकाग्र होऊन वारंवार पठण करील तो अवश्य भगवंताच्या कृपेला पात्र होईल व स्थिरचित्तही होईल. एकदा स्थिरचित्त होऊन भगवत्कृपेला मनुष्य पात्र झाला म्हणजे त्याला त्रैलोक्यात दुर्लभ असे काहीच नाही. तरी प.प. प्रातःस्मरणीय श्रीमद्वासुदेवानंदसरस्वती स्वामिमहाराजांच्या वचनावर दृढविश्वास ठेवून या श्रीदत्तस्तोत्राचा जप शुद्ध होऊन व पुढे येताजाताही केला तर सर्व फलप्राप्ती होईल. करणाऱ्याच्या श्रद्धेवर व अनुष्ठानावर फलसिद्धी अवलंबून आहे. याप्रमाणे यथामति हे भाषांतर करून श्रीचरणी अर्पण केले आहे. श्रीगुरुदेवदत्त ॥६॥

❖❖❖

# (१०५) श्रीपादश्रीवल्लभ स्तोत्रम्

ब्राह्मण्यै यो मंक्षु भिक्षान्नतोऽभूत्प्रीतस्तस्यायः कृपार्द्रः सुतो ऽ भूत् ।।
विस्मृत्यास्मान् किं स गाढं निदद्रौ श्रीपादद्रौ वाऽपदाहानिदद्रौ ।।१।।

आश्वास्यांबां प्रव्रजन्नग्रजान्यः कृत्वा स्वंगान् संचारार्यमान्यः ।
विस्मृत्यास्मान् किं स गाढं निदद्रौ श्रीपादद्रौ वाऽपदाहानिदद्रौ ।।२।।

सार्भा मर्तुं योद्यता स्त्रीसुतस्या दुःखं हर्तुं त्वं स्वयं तत्सुतः स्याः ।
विस्मृत्यास्मान् कि स गाढं निदद्रौ श्रीपादद्रौ वाऽपदाहानिदद्रौ ।।३।।

राज्यं योऽदादाशुनिर्णेजकाय प्रीतो नत्या लीलया यो नृकायः ।
विस्मृत्यास्मन् किं स गाढं निदद्रौ श्रीपदद्रौ वाऽपदाहानिदद्रौ ।।४।।

प्रेतं विप्रं जीवयित्वास्तजूर्तिं यश्चक्रे दिक्शालिनीं स्वीय कीर्तिम् ।
विस्मृत्यास्मान् किं स गाढं निदद्रौ श्रीपादद्रौ वाऽपदाहानिदद्रौ ।।५।।

**इति श्री प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वतीविरचितं**
**श्रीपाद-श्रीवल्लभ स्तोत्रम् संपूर्णम्**

# श्रीपादश्रीवल्लभ स्तोत्रम्

## लेखक - कै. ब्रह्मश्री पंडित आत्मारामशास्त्री जेरे, ठाणे

### श्लोक

**ब्राह्मण्यै यो मंक्षु भिक्षान्नतोऽभूत्प्रीतस्तस्यायः कृपार्द्रः सुतो ऽ भूत् ॥**
**विस्मृत्यास्मान् किं स गाढं निदद्रौ श्रीपादद्रौ वाऽपदाहानिदद्रौ ॥१॥**

**अन्वय :** मंक्षु (तत्काळ) निदद्रौ (निजलेत) द्रौ (झाडाखाली) अद्रौ (पर्वतावर) यः श्रीपात् ब्राह्मण्यै भिक्षान्नतो मंक्षुप्रीतः अभूत् । यः कृपार्द्रः तस्याः सुतो ऽ भूत् । सोऽस्मान् विस्मृत्य अद्रौ वा आपदाहानिदद्रौ वा गाढं निदद्रौ किम् ॥१॥

**अर्थ :** परमपूज्य प्रातःस्मरणीय, कलियुगातील श्रीपादश्रीवल्लभ व श्रीमन्नृसिंहसरस्वती या दोन श्रीदत्तावतारांनंतर सुमारे पाचशे वर्षांनंतर झालेल्या, 'योगिराज' रूप श्रीमद्वासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराज म्हणून प्रसिद्ध असलेल्या दत्तावताररूप महाराजांनी केलेल्या श्री महाराजांच्या अनेक दिव्य स्तोत्रांपैकी 'श्रीपादश्रीवल्लभस्तोत्र' नावाचे स्तोत्रादि संग्रहांतील १०५ वे हे एक स्तोत्र आहे. कुरुगड्डीस महाराजांचा मुक्काम असताना 'श्रीपादश्रीवल्लभत्वंसदैव' या घोरसंकटोद्धारक स्तोत्राप्रमाणे हेही झाले असावे अशी कल्पना आहे. 'अंदरकी बात राम जाने ।' कसेही असो. इतर स्तोत्रांप्रमाणे हेही स्तोत्र महाराजांनी आपल्या ओघवती प्रासादिक दिव्य वाणीने केले आहे, हे सत्य आहे. महाराजांचे पट्टशिष्य श्रीमन्नृसिंहसरस्वती दीक्षित महाराजांच्या नित्य भजनात हे स्तोत्र म्हटले जात होते व त्यांच्यापासून हे मलाही मिळाले. या स्तोत्रात महाराजांनी लवकर व स्वल्प सेवेने प्रसन्न होणारे श्रीपादश्रीवल्लभ निर्जन, अत्यंत एकांतयुक्त पर्वतावर किंवा सर्व आपत्तींचा समूळ नाश करणाऱ्या अशा घनदाट औदुंबराच्या किंवा अश्वत्थाच्या झाडाखाली गाढ निजलेत काय ? असा प्रश्न आपल्या मनालाच बहुतेक केला असावा. महाराजांना सर्वदा व सर्व ठिकाणीच भगवंताचे सान्निध्य व भगवंताची जागृतीच आहे. परंतु आम्हांसारख्या स्वाध्यायहीन अज्ञजनांकरिता असा प्रश्न आपल्या मनाला केला असेल.

साधक देवाच्या दर्शनाकरिता अत्यंत कष्ट करीत असता, स्वप्नात किंवा जागृतीत केव्हाही भगवान् श्रीपाद श्रीवल्लभांचे ओझरतेही दर्शन न झाल्याने अत्यंत खिन्न होऊन असाच प्रश्न आपल्या मनाला करील किंवा साधकांनी तसाच प्रश्न तळमळीने आपल्या मनाला करावा, म्हणजे हृदयस्थित परमात्म्याला तो त्याचा आर्त नाद ऐकू येऊन त्याचे चित्त दयार्द्र होईल; म्हणूनच हे स्तोत्र महाराजांनी केले असेल. तरी भगवद्दर्शनाकरिता भक्तिभावाने भगवद्दर्शनेच्छू साधकाने या स्तोत्राचा पाठ शक्य तितका अधिक करावा अशी महाराजांची इच्छा या स्तोत्रावरून व्यक्त होत आहे. महाराजांच्या पंचपदी भजनात अशाच तऱ्हेचा अभिप्राय व्यक्त होत आहे.

पीठापुरात राहणाऱ्या कर्मनिष्ठ राजा नावाच्या ब्राह्मणाच्या घरी अमावस्येच्या दिवशी प्रत्यक्ष दत्तमहाराज अतिथिरूपाने भिक्षेस आले व 'माई भिक्षा' वाढा असे म्हणाले, ते ऐकून घरात श्राद्ध असतानाही श्राद्धास निमंत्रिलेल्या ब्राह्मणांच्या भोजनापूर्वी पतीला न विचारताच ज्या सुमती ब्राह्मणीने, शास्त्रतात्पर्य लक्षात घेऊन अतिथी सर्व देव व पितृस्वरूप आहेत असे जाणून, त्या अतिथिरूप दत्तमहाराजांना त्या सुमती ब्राह्मणीने भिक्षा घातली. ही तिची निष्ठा पाहून श्रीदत्तमहाराज तात्काळ तिच्यावर प्रसन्न होऊन त्रैमूर्तिरूपाने तिच्या समोर प्रगट झाले व ''माई ! तुझी काय इच्छा आहे ती सांग.'' असे म्हणाले. ते दिव्य रूप पाहून सुमती ब्राह्मणी म्हणाली, ''महाराज ! मला आपण माई म्हणता, तरी आपल्या मातृपदाची योग्यता मला आपल्या कृपेने प्राप्त व्हावी. मला पुष्कळ मुले झाली व मेली. त्यांतून दोन वाचली त्यात एक मुलगा आंधळा व दुसरा पांगळा असा आहे. आपण माझ्या उदरी अवतार घेऊन माझ्या पितृकुळाचा, मातृकुळाचा व पतिकुळाचा उद्धार करावा, अशी आपल्या चरणी प्रार्थना आहे.'' ती प्रार्थना ऐकून श्रीदत्तमहाराजांचे हृदय द्रवले व त्या सुमती ब्राह्मणीचे ते पुत्र झाले व 'श्रीपादश्रीवल्लभ' या नावाने जगात प्रसिद्ध झाले. तेच दयार्द्र श्रीपाद आमच्यासारख्या अनाथ, दीन व दुबळ्या लोकांना विसरून कुठे तरी दूर असलेल्या पर्वतावर किंवा घनदाट छायेने युक्त असणाऱ्या सर्व पीडाहारक अशा औदुंबर किंवा अश्वत्थाच्या वृक्षाखाली गाढ निजलेत काय ? नाहीतर आमची आर्द्रवाणी ऐकून सुमती ब्राह्मणीप्रमाणे आमच्यावरही त्यांनी कृपाच केली असती व आमच्या आपत्तींचा परिहार त्यांनी केला असता. ज्या अर्थी आमची आपत्ती प्रार्थना करूनही दूर होत नाही त्या अर्थी ते श्रीपाद गाढ निजले असावे असे आम्हास वाटते. ॥१॥

## श्लोक

**आश्वास्यांबां प्रव्रजन्नग्रजान्यः कृत्वा स्वंगान् संचारार्यमान्यः ।**
**विस्मृत्यास्मान् किं स गाढं निदद्रौ श्रीपादद्रौ वाऽपदाहानिदद्रौ ।।२।।**

**अन्वय :** यः श्रीपात् प्रव्रजन् अंबां आश्वास्य अग्रजान् स्वंगान् कृत्वा आर्यमान्यः (सन्) संचचार सः श्रीपात् अस्मान् विस्मृत्य अद्रौ वा आपदाहानिदद्रौ वा गाढं निदद्रौकिम् ।।२।। प्रव्रजन् (जगत्संचारेच्छू) अग्रजान् (वडीलबंधूंना) स्वंगान् (दिव्यरूपी) आर्यमान्यः (श्रेष्ठांनी पूज्य)

**अर्थ :** श्रीपादश्रीवल्लभ या रूपाने श्रीदत्तमहाराजांनी सुमती ब्राह्मणीच्या उदरी अवतार घेऊन पीठापुरात सोळा वर्षेपर्यंत वास्तव्य केले. मौजीबन्धनानंतर स्वयंप्रतिभात अशा सर्व वेदांचे व शास्त्रांचे अध्यापन विद्वान् ब्राह्मणांना करून आपल्या 'अमृताला जिंकणाऱ्या' दिव्य वाणीने आचार, व्यवहार व प्रायश्चित्त यांचा अमृततुल्य उपदेश सर्वांना करून पीठापूर व तत्समीप असणाऱ्या सर्व प्रांतात सद्धर्मप्रतिष्ठारूप जे आपले अवतारकार्य ते यथासांग आटोपले. आता सर्व जगातील मोहांधकार दूर करून सर्वांचे परमकल्याण करावे असे त्यांनी मनात आणले. पीठापूर व तत्समीपवर्ती सर्व भागात अनंतदैवीलीला महाराजांनी केल्या. सरस्वती गंगाधरांनी त्या जर प्रकट केल्या असत्या तर किती बहार झाली असती ! परंतु ग्रंथविस्तारभयास्तव व आमच्या दुर्दैवामुळे त्या त्यांनी संपूर्ण प्रकट केल्या नाहीत. जाता जाता संक्षेपतः त्या लीला सांगितल्या. असो. अशा ह्या दिव्य मुलाचा विवाह करून त्याने आपला गृहस्थाश्रम धन्य कराव,असे राजाविप्र व सुमती ब्राह्मणी या उभय मातापित्यांना वाटून आपला अभिप्राय श्रीपादश्रीवल्लभरूप आपल्या पुत्राजवळ त्यांनी व्यक्त केला. श्रीपादश्रीवल्लभांनी आपल्या अवताराचे प्रयोजन सांगून त्यांचे समाधान केले व योगश्रीयेचा अवलंब करून मी आता घरातून जगदुद्धाराकरिता बाहेर जाणार असे त्यांना सांगितले. ते ऐकून आता आमचा वंशवृक्ष उच्छिन्न होणार, आंधळा व पांगळा अशी दोन मोठी मुले वंशवृद्धीला अयोग्य आहेत इत्यादी दुःख मातापितरांनी प्रकट केलेले पाहून श्रीपादश्रीवल्लभांनी आपल्या दिव्यदयार्द्र दृष्टीने आपल्या दोन्ही वडीलबंधूंकडे पाहिल्याबरोबर त्यांचे अंधत्व व पंगुत्व जाऊन त्यांना दिव्यरूप प्राप्त झाले व श्रीपादश्रीवल्लभांच्या दिव्य हस्तस्पर्शाने ते वेदशास्त्रसंपन्न झाले. मातापितरांची सेवा करीत व सर्व लोकांचे कल्याण करीत तुम्ही पीठापुरातच गृहस्थाश्रमात राहा, तुम्हाला

संतती व संपत्ती अखंड लाभो, असा आशीर्वाद श्रीपादश्रीवल्लभांनी त्यांना दिला. असे कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम् समर्थ असलेले श्रीपाद आम्हा दीनदुर्बलांना विसरून आमच्या पीडेने त्रस्त होऊन कोठे तरी दूर पर्वतावर किंवा घोर जंगलात असलेल्या त्या घनदाट छायायुक्त औदुंबराच्या किंवा अश्वत्थाच्या छायेखाली गाढ निजले काय ? खरोखरच ते तसे निजले असावेत, नाहीतर आम्ही प्रार्थना करून सुद्धा आमची अशी दुर्दशा का झाली असती ? ।।२।।

### श्लोक

**सार्भा मर्तुं योद्यता स्त्रीसुतस्या दुःखं हर्तुं त्वं स्वयं तत्सुतः स्याः ।**
**विस्मृत्यास्मान् कि स गाढं निदद्रौ श्रीपादद्रौ वाऽपदाहानिदद्रौ ।।३।।**

**अन्वय :** या सुतस्या स्त्री सार्भा मर्तुं उद्यता (तस्याः) दुःखं हर्तुं त्वं स्वयं तत्सुतः स्याः । विस्मृत्यास्मान् किं स गाढं निदद्रौ श्रीपादद्रौ वाऽपदाहानिदद्रौ ।।३।।

सार्भा (मंदपुत्रासहित) सुतस्या (विधवा) सुतःस्याः (सुत झालास)

**अर्थ :** श्रीपादश्रीवल्लभस्वरूप दत्तमहाराज आईवडिलांचे समाधान करून आपल्या दोन वडील बंधूंना दिव्य शरीर व दिव्य ज्ञान देऊन घरातून बाहेर पडले. तीन वर्षे श्रीगोकर्ण क्षेत्रात गुप्तरूपाने राहून, श्रीशैल्यपर्वतावर काही दिवस राहून आपल्या दीक्षाप्रभावाने योग्य सज्जनांना आपल्या दिव्य उपदेशाने कृतार्थ करीत महानदी श्रीकृष्णानदीच्या पवित्र तीरावर असलेल्या कुरवपूर किंवा कुरुगड्डीक्षेत्रात एकांतवास करण्याच्या इच्छेने प्राप्त झाले. महाराजांनी तेथे प्रगटरूपाने बरीच वर्षे वास्तव्य केले. त्या प्रशान्त व एकान्तस्थली त्यांचे मन रंगून गेले. त्यांनी आपल्या पवित्र वास्तव्याने पवित्र असलेले कृष्णातीर परमपवित्र केले. प्रकटरूपाने महाराजांचे वास्तव्य तेथे असता वेदशास्त्रसंपन्न व स्ववर्णाश्रमतत्पर एक सात्त्विक ब्राह्मण आपल्या अंबा नामक पतिव्रता स्त्रीसहित तेथे राहात होता. या दांपत्याला बरीच मुले झाली व पूर्वीच्या दूरदृष्टाने ती सर्व मेली. पुढे दीर्घायु परंतु मंदमती असा मुलगा त्यांना झाला. आपल्याप्रमाणे आपल्या या मुलाने सुद्धा वेदशास्त्रसंपन्न व स्ववर्ण धर्मनिष्ठ असावे अशा इच्छेने त्या ब्राह्मणाने त्याला विद्या शिकविण्याचा प्रयत्न केला, परंतु तो सर्व व्यर्थ झाला. ताडन करूनही त्याला काही येईना. परंतु दंड हा चतुर्थ उपाय विद्येला साधन आहे अशा भ्रान्तीने त्याने पुत्रताडनाचे काम जारीने सुरू ठेवले. एकुलत्या एका मुलाला केलेले ताडन पाहून अंबामातेचे अन्तकरण कळवळून आले

व तिने धैर्य धरून आपल्या पतीजवळ येऊन दीनवाणीने प्रार्थना केली. परंतु काही उपयोग होत नाही असे तिने पाहिले व एक दिवस पतीला निक्षून असे सांगितले की, ''नाथ! आता या मुलाला जर आपण ताडण कराल तर मी आत्महत्या करीन.'' हे आपल्या पत्नीचे शब्द ऐकून त्या ब्राह्मणाने मुलाला शिकविण्याचे व ताडण करण्याचेही सोडून दिले. काही दिवसांनी अकृतार्थ अशा अवस्थेत तो ब्राह्मण निधन पावला. अंबामातेच्या मुलाची विद्वान् - अविद्वान् सर्वच लोक निन्दा करू लागले. प्रयत्न करूनही आपणाला विद्या प्राप्त होत नाही असे समजून व आपले जिणे व्यर्थ आहे असे जाणून एक दिवस अंबामातेला विप्रसुत म्हणाला, ''आई ! या जगात लोकांची निंदा ऐकत आता मला राहावे असे वाटत नाही. तुझे पोषणही माझ्या हातून होत नाही. तरी आता या कृष्णाप्रवाहात मी आपल्या शरीराचे विसर्जन करण्याचे मनात आणले आहे. विद्वद्रत्न असलेल्या वडिलांपासून तुझ्यासारख्या पतिव्रता स्त्रीच्या उदरातून निर्माण होऊन माझा जन्म फुकट गेला. आता मला शरीरत्यागाशिवाय दुसरा काहीच उपाय नाही.'' हे ऐकून अंबामातेला फारच दुःख झाले. ''बाळा ! माझी म्हातारपणाची काठीच तू आहेस. तुझ्याकरिताच मी आजपर्यंत जगले. तूच जर शरीरत्याग करण्यास तयार झालास तर मला तरी या जगात राहून काय करायचे आहे ? आता आपण दोघेही पवित्र कृष्णाप्रवाहात भगवंताचे स्मरण करीत देहत्याग करू. जन्मान्तरात तरी कृष्णाप्रवाहात शरीरत्यागाच्या पुण्यबळाने आमचे मनोरथ पूर्ण होवोत.'' असा विचार करून मुलाला घेऊन अंबाब्राह्मणी देहत्यागार्थ कृष्णातीरावर आली. अनंतकोटिब्रह्मांडनायक श्रीपादश्रीवल्लभस्वामिमहाराज स्नानाकरिता तेथे आलेले माता पुत्राने पाहिले. ब्राह्मणाने आत्महत्या केल्यास आत्महत्या व ब्रह्महत्या अशी दोन्ही पातके लागतात. तरी या साधुमहाराजांची आज्ञा घेऊन देहत्याग केला असता, आम्हाला सद्‌गती प्राप्त होऊन आमचे मनोरथ पुढील जन्मात तरी पूर्ण होतील अशा इच्छेने सपुत्र अंबामातेने महाराजांना साष्टांग नमस्कार घातला. आपल्या परमदुःखाचे निवेदन त्यांच्याजवळ केले व जन्मांतरात तरी आपल्यासारखा जगदुद्धार करणारा मुलगा मला हवा व लहानपणापासूनच तो आपल्यासारखा दिव्य असावा अशी प्रार्थना अंबामातेने श्रीचरणी केली. श्रींनीही संन्यासमार्गाची स्थापना आता पुन्हा करून जगाचा उद्धार केला पाहिजे व अंबाब्राह्मणीचेही मनोरथ पूर्ण केले पाहिजेत असे मनात आणून पुढच्या जन्मी तुला

माझ्यासारखा मुलगा होईल असा अंबेला आशीर्वाद दिला; व शनिप्रदोष व्रत करण्यास सांगितले. मंद मुलाच्या मस्तकावर दिव्य हस्त ठेवून त्याला विद्वच्छ्रेष्ठ केले. अशा प्रकारे उभयतांचेही मनोरथ पूर्ण करून त्याचे अखंड कल्याण केले. पुढच्या जन्मी करंज नगरात अंबेच्या उदरी अवतार धारण करून श्रीमन्नृसिंहसरस्वती या रूपाने श्रीपादश्रीवल्लभ प्रसिद्ध झाले. असे दयासागर श्रीपादश्रीवल्लभ खरोखरच कोठे तरी दूर पर्वतावर किंवा दाट निर्मनुष्य जंगलात औदुंबराच्या किंवा अश्वत्थाच्या झाडाखाली गाढ झोप घेतात काय ? नाहीतर अशी आमची चाललेली दुर्दशा कदापि झाली नसती. त्यांना आमची आरडाओरड ऐकूच येत नाही, हेच खरे. आता आम्ही काय करावे ? ।।३।।

## श्लोक

**राज्यं योऽदादाशुनिर्णेजकाय प्रीतो नत्या लीलया यो नृकायः ।**
**विस्मृत्यास्मन् किं स गाढं निदद्रौ श्रीपदद्रौ वाऽपदाहानिदद्रौ ।।४।।**

**अन्वय :** यः श्रीपात् निर्णेजकाय नत्या प्रीतः (सन्) राज्यं अदात् यः लीलया नृकायः अभूत स श्रीपात् अस्मान् विस्मृत्य किं अद्रौ वा आपदाहानिदद्रौ निदद्रौ किम् ।।४।। निर्णेजकाय (परिटाला) नत्या (नमस्कारमात्राने) आशु (तत्काळ) अदात् (देता झाला)

**अर्थ :** श्रीदत्तमहाराज श्रीपादश्रीवल्लभ अवताररूपाने परमपवित्र अशा कुरुगड्डी किंवा कुरवपूर क्षेत्रात एकान्तात श्रीकृष्णातीरी वास्तव्य करीत असताना तेथील एक निर्णेजक म्हणजे परीट महाराजांचा सेवक झाला. अनेक जन्मांच्या पुण्याईने त्याला महाराजांचे परमपवित्र असे दर्शन व सहवास लाभला. गरिबीचा संसार असूनही त्यातच समाधान मानून यथालाभसंतुष्ट अशी त्याची वृत्ती होती. रोज महाराजांचे दर्शन घ्यावे, महाराजांच्या झोपडीच्या भोवतालचे अंगण झाडून स्वच्छ करावे, त्यावर सडा घालावा व आपल्या (वस्त्र साफ करण्याच्या) कामासाठी कृष्णातीरावर जावे. आपले काम आटोपून परत येताना महाराजांची दिव्यमूर्ती पाहून पुनः वंदन करावे व घरी यावे. असा नित्यक्रम त्याचा चालला होता. एके दिवशी हा वस्त्रे धूत असता वाद्यांचा मनोहर आवाज त्याला ऐकू आला. वर मान करून जो पाहातो तोच एक यवनराजा आपल्या स्त्रियापुत्रादि परिवारासह मोठ्या सुंदर नौकेत बसून प्रवाहातून चालला आहे. दोन्ही तीरांवरून त्याचे अफाट सैन्यही चालले आहे. नाना प्रकारची

वाद्ये वाजतात, नौकेत वस्त्रालंकारभूषित अनेक स्त्रिया राजाच्या चित्ताला संतुष्ट करतात, इत्यादी प्रकाराने त्या नौकेत आनंदीआनंद प्रकट झालेला त्याने पाहिला व त्याला वाटले की, धन्य याचा जन्म ! जन्माला यावे तर असे सौख्य असावे, नाहीतर आमचाही जन्मच. एक आहे, एक नाही. रोज काबाडकष्ट करावे व कसा तरी आलेला दिवस ढकलावा. या राजाने काय पुण्य केले असेल, कोणत्या देवाची किंवा सत्पुरुषाची याने अनन्य भावाने सेवा केली असेल म्हणून असे अत्युत्तम सुख या जन्मात हा भोगीत आहे ? इत्यादी अनंत विचार त्याच्या चित्तात आले. राजा नौकेतून पुढे गेला. हा परीट आपले काम आटोपून वस्त्रांचे ओझे गाढवावर घालून या विचाराच्या धुंदीतच महाराजांच्या आश्रमाजवळ आला. नित्याप्रमाणे महाराजांच्या चरणाला साष्टांग नमस्कार करून आता तो घरी जाणार तोच महाराज म्हणाले, ''अरे रजका ! आज तुझ्या मनात काय विचार चालले आहेत ?'' हा महाराजांचा प्रश्न ऐकून रजक म्हणाला, ''मी वस्त्रे धूत असता एका यवन राजाचे ऐश्वर्य पाहून मला धन्यता वाटली. जन्म असावा तर असा असावा असे वाटले. परंतु या वासनांची तृप्ती कुणालाच करता आली नाही. अग्नीत इंधन टाकले म्हणजे तो विझत नाही, पुनः पुन्हा वाढत असतो. त्याप्रमाणे वासनांचेही आहे. त्यांचा निग्रहच केला पाहिजे व सुज्ञ माणसाने अकामहत म्हणजे निरिच्छ होण्याचाच प्रयत्न केला पाहिजे व त्यातच खरा आनंद आहे असे मी ऐकले आहे. अकामहत म्हणजे निरिच्छ होण्याला आपल्या चरणांची सेवा हीच कारण आहे. ही माझ्याकडून निरंतर घडावी अशी प्रार्थना आहे. आपल्या चरणांजवळच उत्युत्तम सुख आहे.'' काही दिवसांपूर्वी महाराज रजकाची एकनिष्ठ सेवा पाहून 'तू सुखाने राज्य कर' असे त्याला म्हणाले होते. त्याचीही रजकाला पक्की आठवण होती. या प्रसंगाने पुनः त्याला यावेळी महाराजांच्या या वचनाचे स्मरणही झाले होते. वस्तुतः मुक्तीला अधिकारी झालेल्या रजकाला मुक्ती देण्यासही महाराज सिद्धच होते. परंतु त्याची भोगवासना ही दृढ आहे असे जाणून महाराज रजकाला म्हणाले, ''अरे रजका ! तू आता राजा होऊनं राज्यसुख भोगून वासना नष्ट झाल्यावर माझ्याकडे ये. मग तुझा उद्धार करू. या जन्मातच राज्यभोग पाहिजे असतील तर तसे सांग. बालपणापासून राज्य भोगाची इच्छा असेल तर तसे सांग. तुझ्या सेवेला संतुष्ट होऊन काहीही तुला देऊ.'' हे महाराजांचे वचन ऐकून रजक म्हणाला, ''महाराज ! माझ्या चित्तात भोगवासनारूप चांडाळी प्रविष्ट झाली

आहे. या वृद्धावस्थेत भोग भोगता येणार नाहीत. तरी बालपणापासून भोग भोगून भोगवासना पूर्ण व्हावी याकरिता दुसऱ्या जन्मातच हे भोग आपण मला मिळतील असे करावे. मात्र या भोगाच्या धुंदीत आपली विस्मृती होऊ नये. आपले दर्शन मला व्हावे व माझा उद्धार व्हावा. अशी कृपा आपण करावी.'' हे ऐकून, ''तुझ्या मनाप्रमाणे सर्व गोष्टी होतील, आम्ही नृसिंहसरस्वती नामक अवतार धारण करणार आहो, भोगांती तुला आमचे दर्शन होईल.'' असे महाराजांनी रजकास सांगितले. ते ऐकून रजकाने त्यांना साष्टांग नमस्कार घातला व कृष्णावेणीप्रवाहात त्याने आपल्या देहाचे विसर्जन केले. पुढे तो यवनजातीत बेदरच्या बादशहाचा मुलगा झाला. लीलेने मनुष्यदेह धारण करणाऱ्या ज्या श्रीपादश्रीवल्लभमहाराजांनी रजकाला केवळ एका नमस्काराने तत्काळ त्याच्या इच्छेप्रमाणे राज्य दिले तो दयाघन श्रीपाद आम्हाला विसरून कोठे तरी पर्वतावर किंवा घनदाट अशा अश्वत्थाच्या किंवा औदुंबराच्या छायेत गाढ निजला आहे काय ? ।।४।।

**श्लोक**

**प्रेतं विप्रं जीवयित्वास्तजूर्तिं यश्चक्रे दिक्शालिनीं स्वीय कीर्तिम् ।**
**विस्मृत्यास्मान् किं स गाढं निदद्रौ श्रीपादद्रौ वाऽपदाहानिदद्रौ ।।५।।**

**अन्वय :** यः श्रीपात् प्रेतंविप्रं जीवयित्वा अस्तजूर्तिं चक्रे स्वीयकीर्तिं दिक्शालिनीं चक्रे स श्रीपात् अस्मान् विस्मृत्य अद्रौ आपदाहानिदद्रौ वा गाढं निदद्रौ किम् ।।५।।

जूर्तिः (पीडा) अस्तजूर्तिंचक्रे (पीडारहित करता झाला) दिक्शालिनीं (दाही दिशामध्ये शोभून राहणारी)

**अर्थ :** श्रीपादश्रीवल्लभांचा एक परमभक्त - व्यापारधंदा करून प्रपंचाचा गाडा हाकणारा - वल्लभ नावाचा ब्राह्मण कुरुगड्डीच्या जवळच राहात असे. महाराजांच्या कृपेने त्याचा व्यापारधंदा चांगला चालत असे. प्रतिवर्षी कुरुगड्डीस यावे, श्रीपादुकांची पूजाअर्चा करावी व ब्राह्मणभोजनही घालावे असा त्याचा क्रम बरीच वर्षे चालला होता. एकदा त्याने महाराजांचे स्मरण करून मनात संकल्प केला व तो ब्राह्मण म्हणाला, '' महाराज ! यंदाच्या व्यापारात जर मला अत्युत्कृष्ट फायदा झाला तर मी आपल्या चरणांची उत्तम प्रकारची पूजा करून चार हजार ब्राह्मणांना इच्छाभोजन देईन.'' महाराजांनी त्याच्या मनोरथाची पूर्ती करण्याचे मनात आणले. ब्राह्मण संकल्प करून व्यापाराकरिता बाहेर पडला. ज्या ज्या गावी तो जाईल तेथे त्याच्या कल्पनेपेक्षा शंभर पटीने त्याला व्यापारात फायदा झाला. ब्राह्मणाला फारच आनंद

झाला. समाराधनेकरिता पुष्कळच द्रव्य घेऊन तो कुरवपुरास यात्रेकरिता निघाला. चोरांना या गोष्टीचा पत्ता लागून याला लुटण्याच्या इच्छेने दोन चोर शस्त्रास्त्रांनी सज्ज होऊन वाटेतच त्यांनी त्याला गाठले व म्हणाले, 'विप्रश्रेष्ठा ! आपण कुरवपुरास यात्रेला चालला आहात असे दिसते. आम्हासही कुरवपुरास यात्रेकरिता जावयाचे आहे. आपली संगती आम्हास मिळाली; फारच चांगले झाले.'' इत्यादि गोड बोलून त्याचा विश्वास चोरांनी संपादन केला. निष्कपटी ब्राह्मणाला त्यांचे ते भाषण खरे वाटून त्यांची व ब्राह्मणाची मैत्री जडली. चोर व थोर ब्राह्मण उभयता कुरवपुरास जात असता एके दिवशी रात्री चोरांनी ब्राह्मणावर हल्ला करून त्याचे सर्व द्रव्य लुटले व त्याला जिवंत ठेवले असता, कदाचित हा सरकारी मदतीने आम्हास पकडेल, अशी शंका चोरांना येऊन त्यांनी त्याला जंगलात ठार मारले. मारतेवेळी श्रींचे स्मरण वल्लभाने केले. स्मर्तृगामी श्रीपादश्रीवल्लभमहाराज तत्काळ तेथे प्रगट झाले व त्या चोरांना त्यांनी ठार केले. त्यांतील एक चोर महाराजांना म्हणाला, ''महाराज ! मी यांच्या संगतीने चोरी करण्याच्या इच्छेने यांच्याबरोबर आलो. त्याला हे मारतील याची मला कल्पना नाही व नव्हती. आपण सर्वज्ञ आहा. माझे अंतःकरण आपण जाणत आहात. योग्य वाटल्यास मला आपण यांच्याप्रमाणे शिक्षा द्यावी.'' हे ऐकून त्याचे अंतःकरण जाणून महाराज म्हणाले, ''इकडे ये. या ब्राह्मणाला आपल्या मांडीवर घे. त्याच्या धडाला त्याची मान लाव.'' हे वचन ऐकून त्या चोराने त्याप्रमाणे केले. दयासागर महाराजांनी अभिमंत्रित विभूती त्याला लावून कृपादृष्टीने त्याच्याकडे पाहिल्याबरोबर ब्राह्मण जिवंत होऊन उठून बसला व श्रीपादश्रीवल्लभमहाराजही तेथेच गुप्त झाले. ब्राह्मण त्या चोराला म्हणाला, ''अरे! तू मला मांडीवर का घेतलेस ? या चोरांना कोणी मारले ?'' हे ब्राह्मणाचे वचन ऐकून शिल्लक राहिलेल्या चोराने झालेला सर्व वृत्तांत ब्राह्मणाला निवेदन केला. तो ऐकून ब्राह्मणाला गहिवरून आले. त्या चोरांच्या पुण्याईची त्याला धन्यता वाटली. महाराजांचे दर्शन आपल्याला झाले नाही याबद्दल त्याला अत्यंत खेद वाटला. परंतु महाराजांची कृपा माझ्यावर आहे असे जाणून धन्यताही वाटली. चोराजवळील आपले सर्व द्रव्य घेऊन त्या चोरासह तो कुरवपुरास आला. काही दिवस तेथे राहून संकल्पाप्रमाणे सर्व ब्राह्मणभोजनकृत्य आटोपून तो आपल्या गावी गेला व अखेर श्रीपादश्रीवल्लभस्वरूप तो झाला. तो चोरही महाराजांचा भक्त होऊन सद्गतीला गेला. महाराजांची पावन कीर्ती दाही

दिशांमध्ये फाकली व त्यामुळे पुढे महाराजांचे अनेक भक्त झाले व ते कृतार्थ झाले. याप्रमाणे केवळ स्मरणमात्राने भक्तांची सर्व संकटे दूर करून त्याचे परमकल्याण करणारे महाराज आता आम्हाला कंटाळून कुठे तरी दूर पर्वतावर किंवा घोर जंगलातील घनदाट अश्वत्थाच्या वा औदुंबराच्या झाडाखाली गाढ झोप घेतात काय ? बहुतेक असेच असावे. नाहीतर आमची ही दैन्ययुक्त आर्द्र वाणी ऐकून ते तात्काळ प्रकट होऊन या सर्व भक्तांप्रमाणे आमचीही संकटे व क्लेश त्यांनी दूर केले असते. तरी महाराजांनी निद्रा टाकून जागृत व्हावे व प्रेमार्द्र नयनाने आमच्याकडे पाहावे व आमचे परमकल्याण करावे अशी त्यांच्या चरणकमली आमची अनन्यभावाने प्रार्थना आहे. ती ऐकून महाराजांनी आमचे सर्व मनोरथ पूर्ण करावे असे परमपूज्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वतीस्वामीमहाराज हे श्रीपादश्रीवल्लभ श्रीमन्नृसिंहसरस्वती दत्तमहाराजरूप श्रीचरणी आमच्याकरिता निवेदन करतात. त्यांच्या निवेदनाकडे लक्ष देऊन तरी महाराजांनी आमच्यावर कृपा करावी व आम्हास कृतार्थ करावे अशी नम्र विनंती आहे. श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ||५||

❖❖❖

# (१२९) दत्तस्तवस्तोत्रम्

भूतप्रेतपिशाचाद्या यस्य स्मरणमात्रतः ॥
दूरादेव पलायंते दत्तात्रेयं नमामि तम् ॥१॥

यन्नामस्मरणाद्दैन्यं पापं तापश्च नश्यति ॥
भीतिग्रहार्तिदुःस्वप्नं दत्तात्रेयं नमामि तम् ॥२॥

दद्रुस्फोटककुष्ठादि महामारी विषूचिका ॥
नश्यंत्यन्येऽपि रोगाश्च दत्तात्रेयं नमामि तम् ॥३॥

संगजा देशकालोत्था अपि सांक्रमिका गदाः ॥
शाम्यंति यत्स्मरणतो दत्तात्रेयं नमामि तम् ॥४॥

सर्पवृश्चिकदष्टानां विषार्तानां शरीरिणाम् ॥
यन्नाम शांतिदं शीघ्रं दत्तात्रेयं नमामि तम् ॥५॥

त्रिविधोत्पातशमनं विविधारिष्टनाशनम् ॥
यन्नाम क्रूरभीतिघ्नं दत्तात्रेयं नमामि तम् ॥६॥

वैर्यादिकृतमंत्रादिप्रयोगा यस्य कीर्तनात् ॥
नश्यंति देवबाधाश्च दत्तात्रेयं नमामि तम् ॥७॥

यच्छिष्यस्मरणात्सद्यो गतनष्टादि लभ्यते ॥
य ईशः सर्वतस्त्राता दत्तात्रेयं नमामि तम् ॥८॥

जयलाभयशःकामदातुर्दत्तस्य यः स्तवं ॥
भोगमोक्षप्रदस्येमं पठेद्दत्तप्रियो भवेत् ॥९॥

**इति श्री प.प. श्रीवासुदेवानंदसरस्वतीविरचितं**
**दत्तस्तवस्तोत्रं संपूर्णम् ।**

# श्रीमद् वासुदेवानंदसरस्वतीविरचितं दत्तस्तव स्तोत्रम्

## लेखक - कै. ब्रह्मश्री पंडित आत्मारामशास्त्री जेरे, ठाणे

श्रीमद् दत्तात्रेयांच्या कलीयुगातील अवतारांपैकी श्रीपादश्रीवल्लभ श्रीनृसिंहसरस्वती याच्यानंतर झालेल्या तिसऱ्या अवताररूप योगीराज श्रीमद् वासुदेवानंदसरस्वती स्वामीमहाराजांनी केलेले हे 'दत्तस्तवन' रूप 'स्तोत्रादि संग्रहा' तील १२९ वे अत्युत्तम स्तोत्र आहे. याचे ९श्लोक आहेत. याच्या नित्यपाठाने किंवा जपाने ऐहिक व पारलौकिक सर्व कामना पूर्ण होऊन तो भक्त श्रीदत्तमहाराजांना अत्यंत प्रिय होतो. दत्तमहाराज आपणास प्रिय वाटणे व आपण दत्तमहाराजांस प्रिय होणे या दोन गोष्टीच मनुष्यजन्माचे सार्थक करणाऱ्या आहेत. याच्यासाठीच परब्रह्मपरमात्मा श्रीदत्तांनी आपणास अत्यंत दुर्लभ असा मनुष्यजन्म दिला आहे.

या दोन गोष्टी या स्तोत्रपाठाने व निरंतर जपाने सिद्ध होतात असे स्वतः महाराजच म्हणतात. म्हणजे याबद्दल अधिक विचार करण्याचे कारण नाही. येता-जाता बसता उठता सोवळ्यात ओवळ्यात केव्हाही या स्तोत्राचा जप करता येतो व काळाचे सार्थक होते. नाहीतर काळ हा सूर्यरूपाने आपले आयुष्य घेऊन चाललाच आहे. तरी आपले आयुष्य फुकट न जाता आपले सर्वतोपरी कल्याण व्हावे या करता विचारी माणसाने या स्तोत्राचा शक्य तितका जप करून आपला उद्धार करून घ्यावा.

### श्लोक पहिला

**भूत-प्रेत पिशाचाद्या यस्य स्मरणमात्रतः ।**
**दूरादेव पलायन्ते दत्तात्रेयं नमामि तम् ॥१॥**

**अर्थ :** भूत प्रेत-पिशाच वगैरे अनेक दुर्गतीला गेलेले जीव आपल्या कर्मांची फळे भोगत असतात व त्यांचे सामर्थ्यही मोठे असते. त्यांच्याशी काहीतरी संबंध असल्याशिवाय ते सहसा पीडा देत नाहीत. भूतप्रेतादिपीडा अतिशय घातक असते. त्यामुळे मनुष्याचा जन्म फुकट, वाया जातो. अशी अनेक उदाहरणे पाहण्यात आली

आहेत. नरसोबावाडी, गाणगापूर, औदुंबर वगैरे दत्तमहाराजांच्या स्थानात हे पाहावयास मिळते. भूतप्रेतादिजीव दत्तमहाराजांच्या गणांपैकी आहेत. मालकाच्या ताब्यात असलेल्या कुत्र्याला दुसऱ्याच्या अंगावर सोडणे अथवा आवरणे हे जसे मालक सहज करतो तसे भूतादिगणांना दुसऱ्यावर सोडणे अथवा आवरणे दत्तमहाराजांच्या हाती आहे. भूतप्रेतपिशाचसमंधादि काढणारा दत्तमहाराजांहून दुसरा देव जगात नाही; अशी प्रसिद्धी आहे. कारण हे सर्व गण दत्तमहाराजांचे सैनिक आहेत. गुरुचरित्रादिकावरून हे सर्व स्पष्ट कळून येते. भूतप्रेतपिशाचादिगण ज्या दत्तमहाराजांच्या स्मरणमात्राने त्या स्मरणकर्त्यापासून अतिशय दूर पळून जातात व पुनः त्यांच्याकडे येत नाहीत अशा दत्तमहाराजांना मी नमस्कार करतो. ॥१॥

## श्लोक दुसरा

**यन्नामस्मरणाद्दैन्यं पापं तापश्च नश्यति ।**
**भीतिग्राहार्तिदुःस्वप्नं दत्तात्रेयं नमामि तम् ॥२॥**

**अर्थ :** ज्या दत्तमहाराजांच्या नामस्मरणाने दीनपणा व त्याला कारण असणारे दारिद्र्य व त्याला म्हणजे दारिद्र्याला कारण असणारे पाप व या सर्वांचे फळ जो ताप म्हणजे त्रास समूळ नष्ट होतो. तसेच ज्यांच्यामुळे सर्व प्रकारची भीती, शनी वगैरे नवग्रहापासून होणारी पीडा तसेच वाईट स्वप्ने व त्यांची फळे नष्ट होतात त्या दत्तात्रेयाला मी नमस्कार करतो. ॥२॥

## श्लोक तिसरा

**दद्रुस्फोटककुष्ठादि महामारी विषूचिका ।**
**नश्यंत्यन्येऽपि रोगाश्च दत्तात्रेयं नमामि तम् ॥३॥**

**अर्थ :** ज्यांच्या नामस्मरणाने खरूज फोड, कुष्ठादि त्वचारोग, महामारी, कॉलरा, विषूचिका- प्लेग इत्यादी प्राणघातक रोग व अन्यही रोग नष्ट होतात त्या दत्तात्रेयांना मी नमस्कार करतो. ॥३॥

## श्लोक चौथा

**संगजा देशकालोत्था अपि सांक्रमिका गदाः ।**
**शाम्यंति यत्स्मरणतो दत्तात्रेयं नमामि तम् ॥४॥**

**अर्थ :** ज्यांच्या स्मरणाने संसर्गाने दूषितदेशातून व दूषितकालातून आलेले संक्रमणशील रोगही नष्ट होतात, त्या दत्तात्रेयाला मी नमस्कार करतो. ॥४॥

### श्लोक पाचवा

**सर्पवृश्चिकदष्टानां विषार्तानां शरीरिणाम् ।**

**यन्नाम शांतिदं शीघ्रं दत्तात्रेयं नमामि तम् ।।५।।**

**अर्थ :** साप, विंचू चावून पीडित झालेल्या किंवा इतर विषांनी त्रस्त झालेल्या माणसांना ज्यांचे नाम शीघ्र शांती देणारे आहे त्या दत्तात्रेयाला माझा नमस्कार असो. ।।५।।

### श्लोक सहावा

**त्रिविधोत्पातशमनं विविधारिष्टनाशनम् ।**

**यन्नाम क्रूरभीतिघ्नं दत्तात्रेयं नमामि तम् ।।६।।**

**अर्थ :** ज्यांचे नाम भूमीवर, अंतरिक्षांवर व स्वर्लोकावर होणाऱ्या नानाप्रकारच्या उत्पाताला व नाना प्रकारच्या संकटांना नाशक आहे व क्रूर प्राण्यापासून होणाऱ्या भीतीलाही नाशक आहे त्या दत्तात्रेयाला मी नमस्कार करतो. ।।६।।

### श्लोक सातवा

**वैर्यादिकृतमंत्रादिप्रयोगा यस्य कीर्तनात् ।**

**नश्यन्ति देवबाधाश्च दत्तात्रेयं नमामि तम् ।।७।।**

**अर्थ :** आपल्या शत्रूंनी आपल्यावर केलेले जारणमारणमोहनादि सर्व मंत्रप्रयोग ज्याच्या नामसंकीर्तनाने नष्ट होतात व देवादिकांनी केलेल्या बाधाही नष्ट होतात त्या दत्तात्रेयाला मी नमस्कार करतो. ।।७।।

### श्लोक आठवा

**यच्छिष्यस्मरणात् सद्यो गतनष्टादि लभ्यते ।**

**य ईशः सर्वतस्त्राता दत्तात्रेयं नमामि तम् ।।८।।**

**अर्थ :** सहस्रार्जुन किंवा कार्तवीर्य या नावाने प्रसिद्ध असलेल्या ज्याच्या शिष्याच्या स्मरणाने हरवलेली किंवा न सापडणारी वस्तू मिळते व जो ईश्वर सर्व संकटांतून आपल्या भक्तांचे रक्षण करतो त्या दत्तात्रेयाला माझा नमस्कार असो. 'कार्तवीयार्जुनोनाम राजाबाहुसहस्रवान् । तस्य स्मरणमात्रेण गतं नष्टंच लभ्यते' ।।१।। हा कार्तवीर्याचा मंत्र आहे. वस्तू हरवल्यास या मंत्राचा जप केला म्हणजे ती वस्तू सापडते, असे हजारो लोकांचे अनुभव आहेत. लेखकालाही हा अनुभव आलेला आहे. भाविकांनी अनुभव घ्यावा. एखादी वस्तु हरवली असल्यास त्या वस्तूच्या जागी

हा मंत्र लिहून ठेवावा व जपही चालू ठेवावा म्हणजे ती वस्तू अवश्य मिळते ।।८।।

## श्लोक नववा

**जयलाभयशःकामदातुर्दत्तस्य यः स्तवम् ।**
**भोगमोक्षप्रदस्येमं पठेच्छ्रीदत्तप्रियो भवेत् ।।९।।**

**अर्थ :** जय, लाभ, यश वगैरे इच्छित वस्तू देणाऱ्या, जास्ती काय सांगावे, या लोकातील प्रापंचिक सर्व सुखे व दत्तस्वरूप व प्राप्तीरूप मोक्ष देणाऱ्या दत्तात्रेयाची स्तुती पठण करणारा मानव दत्तमहाराजांना अत्यंत प्रिय होतो. असे दत्तस्वरूप असणारे श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंदसरस्वती स्वामिमहाराज अत्यंत कळकळीने सांगतात.।।२।। फक्त माणसांचा त्यांच्या वचनावर दृढ विश्वास पाहिजे. जितका विश्वास दृढ असेल तितकी कार्यसिद्धी लवकर होईल. दृढ विश्वास नसतो म्हणूनच मनुष्य संकट भोगत असतो. महाराजांनी सांगितलेल्या या स्तवावर अत्यंत दृढ विश्वास उत्पन्न होऊन या स्तवपाठाने सर्वांचे कल्याण ऐहिक व पारत्रिक होवो अशी महाराजांच्या चरणी प्रार्थना.

❖❖❖

# (१३३) मंत्रात्मकश्लोकाः

अनसूयात्रिसंभूतो दत्तात्रेयो दिगंबरः ।।
स्मर्तृगामी स्वभक्तानामुद्धर्ता भव संकटात् ।।१।।

दरिद्रविप्रगेहे यः शाकं भुक्त्वोत्तमश्रियं ।।
ददौ श्रीदत्तदेवः स दारिद्र्याच्छ्रीप्रदोऽवतु ।।२।।

दूरीकृत्य पिशाचार्तिं जीवयित्वा मृतं सुतम् ।।
योऽभूदभीष्टदः पातु स नः संतानवृद्धिकृत् ।।३।।

जीवयामास भर्तारं मृतं सत्या हि मृत्युहा ।।
मृत्युंजयः स योगींद्रः सौभाग्यं मे प्रयच्छतु ।।४।।

अत्रेरात्मप्रदानेन यो मुक्तो भगवानृणात् ।।
दत्तात्रेयं तमीशानं नमामि ऋणमुक्तये ।।५।।

जपेच्छ्लोकमिमं देवपित्रर्षिपुंनृणापहं ।।
सोऽनृणो दत्तकृपया परंब्रह्माधिगच्छति ।।६।।

अत्रिपुत्रो महातेजा दत्तात्रेयो महामुनिः ।।
तस्य स्मरणमात्रेण सर्वपापैः प्रमुच्यते ।।७।।

नमस्ते भगवन्देव दत्तात्रेय जगत्प्रभो
सर्वबाधाप्रशमनं कुरु शांतिं प्रयच्छ मे ।।८।।

अनसूयासुत श्रीश जनपातकनाशन ।।
दिगंबर नमो नित्यं तुभ्यं मे वरदो भव ।।९।।

श्रीविष्णोरवतारोऽयं दत्तात्रेयो दिगंबरः ।।
मालाकमंडलूच्छूलडमरूशङ्खचक्रधृक् ।।१०।।

नमस्ते शारदे देवि सरस्वति मातिप्रदे ।।
वस त्वं मम जिह्वाग्रे सर्वविद्याप्रदा भव ।।११।।

दत्तात्रेयं प्रपद्ये शरणमनुदिनं दीनबंधुं मुकुंदम्
नैर्गुण्ये संनिविष्टं पथि परमपदं बोधयंतं मुनीनाम् ।।
भस्माभ्यङ्गं जटाभिः सुललितमुकुटं दिक्पटं दिव्यरूपं
सह्याद्रौ नित्यवासं प्रमुदितममलं सद्गुरुं चारुशीलम् ।।१२।।

✿ ✿ ✿

## मंत्रात्मकश्लोकाः ।

**परिचायक - (कै.) ब्रह्मश्री पंडित आत्मारामशास्त्री जेरे, ठाणे**

**अनसूयात्रिसंभूतो दत्तात्रेयो दिगंबरः ।**
**स्मर्तृगामी स्वभक्तानामुद्धर्ता भवसंकटात् ।।१।।**

परमपूज्य प्रातःस्मरणीय कलियुगातील 'योगीराज' स्वरूप श्रीदत्तात्रेयांचा चतुर्थावतार, 'श्रीपादश्रीवल्लभ' श्रीनृसिंहसरस्वती यांच्यानंतर 'श्रीवासुदेवानंदसरस्वती' या नावाने प्रसिद्ध असणारे महाराज यांनी रचलेल्या व परमपूज्य गुळवणीमहाराजांनी छापलेल्या स्तोत्रादिसंग्रहातील 'मन्त्रात्मकश्लोकाः' अशा शीर्षकाखालील एकशे तेहतिसावे (१३३वे) हे स्तोत्र आहे.

महाराजांनी काही 'मंत्रगर्भ' म्हणजे नियतक्रमाने वाचल्यास एक किंवा अनेक मंत्र ज्यात येतात, अशी स्तोत्रे केली आहेत. उदाहरणार्थ - स्तोत्रादिसंग्रहात पहिले विनायक स्तोत्र व तिसरे गणपतिस्तोत्र ही स्तोत्रे मंत्रगर्भ आहेत. 'मंत्रात्मकश्लोकाः' हे स्तोत्र मंत्रगर्भ नसून प्रत्येक श्लोक संपूर्णच मंत्ररूप आहे. म्हणून या स्तोत्राला 'मंत्रात्मकश्लोकाः' असे नाव दिले आहे.

मंत्र शब्दाचा अर्थ मंत्रार्थाचे ध्यानपूर्वक जप करणाऱ्या साधकाचे रक्षण करणारा असा आहे. 'मननात्त्रायतेयस्मात्तस्मान्मंत्रःप्रकीर्तितः ।' असे प्रमाण याविषयी आहे. वाणीने मोठ्याने म्हणून केलेल्या जपाला 'वाचिक' जप म्हणतात. दुसऱ्याला ऐकू 'न' येईल अशा उच्चाराने केलेल्या जपाला 'उपांशु' जप म्हणतात. ओठ व कंठ

न हालता केवळ मनातच केलेल्या जपाला 'मानसिक' जप म्हणतात. 'मानसिक' जप उत्तम, 'उपांशु' मध्यम व 'वाचिक' कनिष्ठ असे तीन प्रकार जपाचे आहेत. जपाच्या प्रकाराप्रमाणे फलातही फरक आहे. उत्तमाचे उत्तम, मध्यमाचे मध्यम व कनिष्ठाचे कनिष्ठ असे फळ आहे. जपाने साध्य होत नाही असे या जगात काहीही नाही. जप करणारा श्रद्धावान् व दृढनिश्चयी असला पाहिजे. शंकाखोर व डळमळीत उपयोगी नाही. शास्त्राने सांगितलेले निश्चयाने मिळेलच असा दृढविश्वास जपी माणसाजवळ पाहिजे. या जन्मात झाले नाही तरी दुसऱ्या जन्मात होईलच. देह पडला तरी 'मी' काही मरत नाही असे त्याला पक्के ठाऊक असले पाहिजे. याच जन्मात फळ पाहिजे असल्यास तितक्या नेटाने प्रयत्नही केला पाहिजे. म्हणजे या जन्मातही फळ मिळेल. कदाचित् या जन्मात फळ न मिळाल्यास पुढच्या जन्मात अवश्य मिळेलच. केलेला जप फुकट कधीच जात नाही. याच जन्मात, फळ मिळाले पाहिजे असे काही जप आहेत. उदाहरणार्थ पाऊस न पडल्याने पिके वाळून चालली आहेत अशा वेळी याच जन्मात फळाची म्हणजे पावसाची आवश्यकता आहे तरी तितक्या नेटाने जोरदार जप झाला पाहिजे. पुढच्या जन्मात पाऊस पडून त्याचा काही या जन्मातील पिकास उपयोग नाही व यावेळी पाऊस पडला नाही, येथे प्रतिबंधक पाप मोठे आहे व जपाने झालेले पुण्य कमी दर्जाचे असल्याने तो जप पापनाश करू शकला नाही; तरी पण केलेला जप फुकट गेला नाही. त्यांना झालेले पुण्य मुख्य फळ देण्यास समर्थ नसले तरी त्या पुण्याचा अन्यत्र उपयोग होईलच. जपाने पुण्य होते व पुण्य चांगले फळ देते हा शास्त्रप्रमाणसिद्ध कार्यकारणभाव असल्याने जपी माणसांचे त्यात कल्याणच आहे. या जपाने न जाण्यासारखे पाप किंवा मोठे पाप आड आले आहे असे समजून शास्त्रप्रामाण्यवादी माणसाने आपले समाधान मानले पाहिजे. शास्त्रात काही अर्थ नाही अशा दुर्विचाराकडे शास्त्रप्रामाण्यवादी मनुष्य कधीच वळत नाही व अशा माणसालाच 'श्रद्धावान्' असे म्हटले आहे. पाप फार मोठे आहे किंवा या जपाने न जाण्यासारखे आहे असे सांगणारे अतींद्रिय द्रष्टेही या जगात आहेत परंतु त्यांची भेट सर्वांना कशी होणार ? भेट झाल्यास ते नक्की सांगू शकतील. मग साधकाची बुद्धी नास्तिक विचाराकडे वळणारच नाही. परंतु अशांची भेट महद्भाग्यानेच होणार. तरी श्रद्धेने शास्त्रसिद्ध उपाय करीत राहाणे हे समंजस माणसाचे कर्तव्य आहे ''नहि कल्याणकृत्कश्चिद्दुर्गतिं तात गच्छति' असे भगवंतांनी

अर्जुनाला गीतेच्या सहाव्या अध्यायात निश्चयाने सांगितले आहे. अर्जुनाला भगवंतानी, युद्धात मेलास तर स्वर्गास जाशील नाहीतर येथेच जय झाल्यास येथील राज्य मिळेल, असे सांगितले आहे. त्याप्रमाणे पावसाच्या अनुष्ठानाने फळ मिळाले तर पाऊस पडेलच, नाहीतर अनुष्ठानाचे पुण्य आहेच. म्हणजे काम्य अनुष्ठानही केले तरी फळ मिळाले तर ठीकच न मिळाले तरी पुण्य मिळत असल्याने ठीकच आहे. नास्तिकपणात काहीच फायदा नाही. एकंदरीत शास्त्रप्रमाण मानून निष्काम किंवा सकाम कोणताही जप करीत राहाणे हेच समंजस माणसाचे कर्तव्य आहे हे सिद्ध झाले. आता मंत्रात्मक श्लोकरूप स्तोत्राचा विचार करू. पहिल्या श्लोकाचा जप भवसंकटातून म्हणजे संसारसागरातून उद्धरून जाण्याकरिता आहे. याचे अधिकारी फार विरळा. सर्व संसार त्याग करून, संसार हे मोठे संकट आहे, असा निश्चय करून माझा उद्धार, म्हणजे मी परब्रह्मरूप आहे असे तत्त्वज्ञान होऊन अविद्या व तत्कार्य सर्व प्रपंच लयाला जाऊन एकमेव ब्रह्मरूप होऊन अखंड आनंदात राहाणे; हे या प्रथम श्लोकजपाचे फळ आहे. अशा माणसाचे वर्णन ''मनुष्याणांसहस्त्रेषुकश्चिद्यततिसिद्धये'' या शब्दाने भगवंतांनी केले आहे. या श्लोकाचा अर्थ :- आपले स्मरण करणाऱ्या साधकाजवळ सतत राहाणारा, परमपतिव्रतासती अनसूया व तपस्व्यांमध्ये श्रेष्ठ अत्रिऋषी यांच्यापासून त्यांच्या तपश्चर्येचे फल देण्याकरिता व जगाच्या उद्धाराकरता अजन्मा असून ज्यांनी शरीरधारणरूप जन्म घेतला. अत्रिऋषीला ज्यांनी आत्मदान म्हणजे आपल्या सगुणनिर्गुण स्वरूपाचे दान दिले म्हणून ज्याचे नाव दत्त असे पडले व अत्रीचा मुलगा म्हणून 'आत्रेय' असे ज्यांचे नाव पडले म्हणजे दत्तरूप जो आत्रेय तो दत्तात्रेय. दशदिशा हेच ज्यांचे वस्त्र आहे म्हणजे लंगोटीसुद्धा परिधान न करणारे अवधूत स्वरूप म्हणजे दिगंबर जातरूपधर म्हणजे जन्मल्याबरोबर जसे रूप आहे तसेच रूप नेहमी धरणारे, आपल्या भक्तांचा 'भवसंकटा' तून उद्धार करणारे, दत्तमहाराज माझा भवसंकटातून उद्धार करोत, संसाररूप संकट व संसारातील संकट या दोन्ही संकटांतून माझा उद्धार म्हणजे मला मुक्त करोत, असा हा मंत्रार्थ आहे. याचा जप संसारातील संकटाच्या उद्धारार्थही करण्यास हरकत नाही. भवातील संकटे असा अर्थ केला म्हणजे संसारातील संकटापासूनही मुक्त होण्यास हरकत नाही. संसार गेल्यास संसारातील संकटेही सहजच जातील. घरच जळाले तर घरातील वस्तु सहजच जळून जाणार. म्हणून मुख्यार्थ 'भव' म्हणजे संसाररूप संकट असाच अर्थ करणे फार

चांगले. संसारातील संकटे असा अर्थ प्रापंचिक माणसांनी गृहीत धरून जप केल्यास संसारातील संकटेही नाहीशी होतील. या मंत्राचा जप करणारा साधक कीर्तन किंवा स्मरणरूप भक्ती करीत असल्याने तो दत्तात्रेयांचा भक्तच आहे. म्हणून त्याची स्वभक्तांत म्हणजे दत्तभक्तांत गणना होत असल्याने त्याचा उद्धार करणे दत्तमहाराजांचे एक अवतारकार्यच आहे. तेव्हा साधकाला निश्चिंत होऊन जप करण्यास काहीच हरकत नाही. पहिला संपूर्ण श्लोक –

**अनसूयात्रिसंभूतो दत्तात्रेयो दिगंबरः ।**
**स्मर्तृगामी स्वभक्तानामुद्धर्ता भवसंकटात् ॥१॥**

असा आहे. या अकरा मंत्रात्मक श्लोकांत पाचवा व सहावा असे दोन श्लोक मिळून एक मंत्र होतो. 'दत्तात्रेयं प्रपद्ये' हा बारावा श्लोक मी दत्तात्रेयाला शरण आलो आहे असे वर्णन करणारा व शरण जाण्याकरता म्हटला जाणारा असा मंत्र आहे. दुसरा मंत्रात्मक श्लोक दारिद्र्याचा नाश करून उत्तम संपत्ती देण्याकरिता आहे. तिसरा मंत्र पिशाचपीडेने मरत असलेली प्रजा वाचवून संतानवृद्धी करणारा असा आहे. चौथा मंत्र मरणोन्मुख पतीला पूर्ण आयुष्य घालून पत्नीचे अखंड सौभाग्य राखणारा असा आहे. याचा जप पत्नीने स्वतः करावा. तसे शक्य नसल्यास इतरांकडून करवावा. पाचवा व सहावा श्लोक मिळून एक मंत्र आहे. त्याचे फळ देव, पितर-ऋषी व व्यवहारातील मनुष्य ऋण म्हणजे 'कर्ज' नाहीसे करून परब्रह्म पदवी प्राप्त करून देणारा असे आहे. सातवा मंत्र सर्व पापांपासून मुक्त करणारा असा आहे. आठवा मंत्र सर्व प्रकारची बाधा, पीडा नाहीशी करून शांती देणारा असा आहे. नववा व दहावा मिळून एक मंत्र आहे. हा मंत्र सर्व पातक नाहीसे करून इष्टवर देणारा असा आहे. अकरावा मंत्र सद्बुद्धी व सर्व विद्या देऊन जिभेवर सरस्वतीचे वास्तव्य करविणारा असा आहे. ज्याची जी कामना असेल त्यांनी त्या मंत्राचा जप करावा. मंत्र जपाचेपूर्वी बारावा मंत्र म्हणून श्रीदत्तमहाराजांना शरण जावे. बारा श्लोकांचे स्तोत्र म्हणावे व नंतर इष्ट मंत्राचा शक्य होईल तेवढा जप करावा व शेवटी पुनः बारा श्लोकांचा पाठ करावा व जप दत्तात्रेयास समर्पण करून अनुष्ठान संपवावे. जप किती करावा हे स्तोत्रात किंवा अन्यत्र सांगितले नाही. जेथे संख्या सांगितली नाही तेथे 'मंडल' म्हणजे चाळीस हजार संख्या घ्यावी. जेवण किती करावे असे कोणी विचारल्यास पोट भरेपर्यंत असे उत्तर दिले जाते. तद्वतच जप किती करावा याचे

उत्तर 'फळ मिळेपर्यंत' असेच आहे. दत्तावतारस्वरूप महाराजांच्या वचनावर दृढ विश्वास ठेवून कामनासिध्यर्थ जप करीत राहाणे हे साधकाचे लक्षण आहे व कर्तव्यही आहे. येथे प्रथम श्लोक संपूर्ण झाला. आता इतर अकरा श्लोक व त्यांचा त्रोटक अर्थ देणे एवढेच शिल्लक राहिले. पहिल्या श्लोकाच्या विवरणात बाकी सर्व विचार आलेच आहेत असे वाटते.

## श्लोक दुसरा

**दरिद्रविप्रगेहे यः शाकं भुक्त्वोत्तमश्रियम् ।**
**ददौ श्रीदत्तदेवः स दारिद्र्याच्छ्रीप्रदोऽवतु ।।२।।**

**अर्थ :** श्रीदत्तमहाराजांचा तृतीय अवताररूप श्रीमन्नृसिंह सरस्वतीस्वामीमहाराज सुमारे पाचशे वर्षांपूर्वी श्रीकृष्णापंचगंगा संगमावर कल्पवृक्षरूप औदुंबराच्या वृक्षाखाली बारा वर्षे प्रकटरूपाने, हल्लीच्या नरसोबावाडीत वास्तव्य करीत असता, एके दिवशी नृसिंहवाडीच्या परतीरावर असणाऱ्या अमरापुरात-म्हणजे हल्ली 'औरवाड' म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या गावात-राहणाऱ्या अत्यंत दरिद्री परंतु ईश्वरभक्त व कर्मठ अशा ब्राह्मणाच्या घरी, त्या ब्राह्मणाचा भाग्योदयकाळ समीप आल्यामुळे भिक्षेस गेले. त्या ब्राह्मणाच्या अंगणात एक घेवड्याचा वेल अंगणभर पसरलेला असा होता. ज्या दिवशी गावात भिक्षा न मिळेल त्या दिवशी वेलाच्या शेंगा काढून त्याची भाजी करून सकुटुंब सपरिवार त्या भाजीवरच दिवस काढणे असा त्या ब्राह्मणाचा क्रम होता. महाराज ज्या दिवशी भिक्षेस त्याचे घरी गेले त्या दिवशी त्याला भिक्षा मिळाली नव्हती. शेगांची भाजीच फक्त त्याचे घरी होती. महाराजांनी मोठ्या आनंदाने 'दैवाल्लब्धेन संतोषः' या न्यायाने त्याचे घरी केवळ भाजीचीच भिक्षा घेतली. विदुराच्या कण्या कृष्णावतारामध्ये जशा महाराजांनी मिटक्या मारत खाल्ल्या, तशीच ही भाजीची भिक्षा मिटक्या मारत खाल्ली व त्याच्या कर्मठपणावर, अतिथिसत्कारावर व ईश्वरभक्तीवर संतुष्ट होऊन त्याच्यावर अत्यंत प्रसन्न होऊन भिक्षा करून जाताना तो दारिद्र्यरूप घेवड्याचा वेल महाराजांनी तोडून टाकला व औदुंबराखाली असलेल्या आपल्या स्थानावर आले. इकडे त्या ब्राह्मणाचे स्त्रीपुत्रादि आपली जीविका स्वामींनी नाहीशी केली म्हणून दुःख करू लागले व स्वामींना भलभलते बोलू लागले. ईश्वरनिष्ठ तत्त्वज्ञानी ब्राह्मणाने सर्वांचे समाधान करून महाराजांनी आमच्या कल्याणाकरताच हा वेल तोडला आहे, ईश्वर दुःखही भक्तांच्या कल्याणाकरताच देत

असतो, इत्यादी विचार सांगून ते मूळ उपटून टाकण्याकरता तो जमीन खोदू लागला, तो द्रव्याने भरलेला हंडा त्या मुळाखाली सापडला. मग मात्र सर्वांचे समाधान झाले व महाराजांच्या दर्शनास सर्व आले व झालेल्या अपराधांची सर्वांनी क्षमा मागितली व ते सर्वच अत्यंत ईश्वरनिष्ठ झाले. इत्यादि कथा गुरुचरित्रात आहे,ती संक्षेपाने येथे दिली आहे. मूळकथा सविस्तर कळण्यासाठी गुरुचरित्रातील नृसिंहवाडी वर्णनाचा १८ वा अध्याय पाहावा.

दरिद्री ब्राह्मणाच्या घरात घेवड्याच्या भाजीची भिक्षा भक्षण करून त्याला उत्तम लक्ष्मी म्हणजे मोठी श्रीमंती ज्या श्रीदत्तदेवाने दिली तो लक्ष्मी देणारा श्रीदत्त दारिद्र्यापासून आमचे रक्षण करो - म्हणजे आमचे सर्व प्रकारचे दारिद्र्य नष्ट करो.

### श्लोक तिसरा

**दूरीकृत्य पिशाचार्तिं जीवयित्वा मृतं सुतम् ।**
**योऽभूदभीष्टदः पातु स नः संतानवृद्धिकृत् ॥३॥**

**अर्थ :** नृसिंहवाडीजवळ असलेल्या शिरोळ नावाच्या गावातील ब्राह्मण स्त्रीला होत असलेली पिशाचाची पीडा दूर करून तिला आवळी-जावळी दोन मुले ज्यांनी दिली, त्यांतील थोरला मुलगा धनुर्वाताने मेला असता तिने बराच शोक केल्यावर, ज्यांनी ब्रह्मचारी रूपाने शिरोळास जाऊन तिला ज्ञानोपदेश केला व जिथे तुला पुत्रप्राप्तीचा वर मिळाला तिथे या मुलाला म्हणजे प्रेताला घेऊन जा असे सांगितले व तिथे ती गेली असता तिच्या स्वप्नात जाऊन त्या मुलाला जिवंत केले व तिच्या वंशवृक्षाची वाढ ज्यांनी केली तो भक्ताभीष्टप्रद दत्तदेव आमचे रक्षण करो, ही कथा विस्ताराने गुरुचरित्रात २०-२१ अध्यायात आली आहे ती अधिक जिज्ञासूंनी पाहावी ॥३॥

### श्लोक चौथा

**जीवयामास भर्तारं मृतं सत्या हि मृत्युहा ।**
**मृत्युंजयः स योगींद्रः सौभाग्यं मे प्रयच्छतु ॥४॥**

**अर्थ :** माहुरपुरातील पतिव्रता सती सावित्री, सर्व वैद्यांनी आमच्या हातात याला वाचविण्याचे सामर्थ्य नाही असे सांगितल्यावर आपल्या क्षयरोगी पतीला घेऊन गाणगापुरात असलेल्या श्रीमन्नृसिंहसरस्वती स्वामीमहाराजांच्या चरणावर भरवसा ठेऊन गाणगापुरास आली. तेथे आल्यावर त्रिदोष क्रुद्ध होऊन तो तिचा पती मरण पावला

असता, जटाधाऱ्याचे रूप घेऊन तिला सहगमनाचा व विधवाधर्माचा उपदेश करून, संगमावर महाराज आहेत त्यांचे दर्शन घेऊन तिच्या इच्छेप्रमाणे सहगमन करण्यास त्यांनी आज्ञा दिली. सहगमनाची तयारी करून पतिव्रता सावित्री संगमावर महाराजांच्या दर्शनास गेली असता त्यांनी 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भव' असा आशीर्वाद तिला दिला. लोकांनी सहगमनाचे वृत्त महाराजांना सांगितल्यावर ते प्रेत जवळ आणवून कृपादृष्टीने पाहून आपल्या चरणोदकाने त्यावर प्रोक्षण करून त्याला जिवंत करून आरोग्य व सती सावित्रीला सौभाग्य दिले. तो मृत्युंजय - मृत्युनाश करणारा - योगींद्र दत्तदेव मृत्यूचा नाश करून आम्हालाही सतीसावित्रीप्रमाणे अखंड सौभाग्य देवो. या मंत्राचा जप मृत्युशय्येवर पडलेल्या पतीच्या स्त्रीने स्वतः किंवा अन्यद्वारा करावयाचा आहे. निष्ठेने केल्यास फलप्राप्ती आहेच. सावित्रीचरित्राचा विस्तार गुरुचरित्र ३०-३१-३२ अध्यायांत पाहावा ॥४॥

## श्लोक पाचवा व सहावा

**अत्रेरात्मप्रदानेन यो मुक्तो भगवानृणात् ।**
**दत्तात्रेयं तमीशानं नमामि ऋणमुक्तये ॥५॥**
**जपेच्छ्लोकमिमं देवपित्रर्षिपुंनृणापहम् ।**
**सोऽनृणी दत्तकृपया परंब्रह्माधिगच्छति ॥६॥**

**अर्थ :** पाचवा व सहावा श्लोक मिळून एक मंत्र होतो; असे पूर्वी सांगितले आहेच. प्रत्येक मनुष्याला जन्माला आल्याबरोबर देवाचे, पितरांचे व ऋषींचे अशी तीन ऋणे म्हणजे कर्जे आहेतच. दुसऱ्यांचे पैसे कर्ज म्हणून घेतल्यास हे चौथे ऋण 'कर्ज' काही लोकांना म्हणजे कर्ज घेणाराला आहे. सर्वांना नाही. आपापल्या अधिकारांप्रमाणे सांगितलेले यज्ञ करून देवाचे ऋण फेडावे लागते. यज्ञ बारा प्रकारचे आहेत, असे गीतेत चौथ्या अध्यायात सांगितले आहे. प्रजा निर्माण करून पितरांचे ऋण फेडावे लागते व ब्रह्मचर्याने ऋषींचे ऋण फेडावे लागते. ब्रह्मचर्य याचा अर्थ विधिपूर्वक स्वाध्यायाध्ययन. ते करून ऋषींचे ऋण फिटते. स्वाध्याय शब्दाचा अर्थ स्वतःचा अध्याय म्हणजे 'मंत्र' असा आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य यांना मौंजीचा अधिकार असल्याने वेदाध्ययन करणे हा त्यांचा स्वाध्याय आहे. शूद्रादि इतर सर्व माणसांना गुरूंनी दिलेला स्वाधिकारानुरूप मंत्र म्हणजे नाममंत्र हाच त्यांचा 'स्वाध्याय' आहे. अर्थात् स्वाध्यायाशिवाय एकही मनुष्य राहू शकत नाही. परंतु

आपापल्या अधिकाराप्रमाणे आपापला स्वाध्याय आहे हे पूर्ण लक्षात ठेवले पाहिजे. प्रत्येकाला स्वाध्याय म्हणजे स्वतःच्या मंत्रजपाचा अधिकार आहे. त्या स्वाध्यायाध्ययनाने ऋषींचे ऋण फिटते. व्यवहारातील धन-धान्यादि ऋण ज्याचे त्याला ते द्रव्य देऊन फिटते हे प्रसिद्धच आहे. या चार ऋणांतून मुक्त झाल्याशिवाय मनुष्य ब्रह्मस्वरूप असूनही ब्रह्म पदवीला प्राप्त होत नाही. याकरता चार ऋणातून प्रथम माणसांनी मुक्त झाले पाहिजे; म्हणजे मनुष्यमात्राला ब्रह्मपद प्राप्त होते. चार ऋणातून मुक्त होण्याचा सुलभ उपाय म्हणजे पाचवा व सहावा या दोन श्लोकात्मक मंत्रांचा जप ऋणमुक्तीकरता केला असता चारी ऋणांतून मनुष्य मुक्त होतो व परब्रह्म पदवीला तो पोचतो. या मंत्राचा जप केला असता देव, पितर व ऋषी यांची ऋणे जशी फिटतात तसेच लोकांचे काढलेले ऋण म्हणजे 'कर्ज' ही जपीमाणसाला द्रव्याचा लाभ होऊन फेडता येते. असे या ऋणमोचक मंत्राचे सामर्थ्य आहे.

अत्रीला आपल्या सगुण व निर्गुण रूपाचे दान करून जो भगवान् दत्तात्रेय सर्व ऋणांतून मुक्त झाला व स्वतः ब्रह्म असूनही लोकशिक्षणार्थ ऋणमुक्त होऊन ब्रह्मपदवीला प्राप्त झाल्यासारखे लोकांना दाखविता झाला. अशा सर्वेश्वर दत्तात्रेयाला माझ्या ऋणमुक्तीकरता मी नमस्कार करतो. महाराज म्हणतात - हा श्लोक देव-पितर-ऋषी व मनुष्य यांचे ऋण नाहीसा करणारा असल्याने या श्लोकांचा जप जो जपी-साधक करतो तो भगवान् दत्तात्रेयांच्या कृपेने सर्व ऋणांतून मुक्त होऊन ऋणरूप प्रतिबंध गेल्याने परब्रह्मपदवीला प्राप्त होऊन सच्चिदानंदस्वरूप साक्षात्काराने कृतकृत्य होतो. ॥५॥६॥

## श्लोक सातवा व मंत्र सहावा

**अत्रिपुत्रो महातेजा दत्तात्रेयो महामुनिः ।**
**तस्य स्मरणमात्रेण सर्वपापैः प्रमुच्यते ॥७॥ मंत्र ६॥**

**अर्थ :** अत्रिपुत्र दत्तात्रेय सर्वमुनी म्हणजे मनन करणाऱ्यांमध्ये श्रेष्ठ आहे. दत्तात्रेयांसारखे मनन आजपर्यंत कोणी केलेले नाही व पुढेही कोणी करू शकणार नाही, हे दत्तात्रेयांच्या २४ चोवीस गुरूंच्या कथेवरून प्रसिद्धच आहे. म्हणून दत्तात्रेय हे महामुनी आहेत. ते जसे महामुनी आहेत तसे महातेजस्वीही आहेत. जगात जेवढे प्रकाश करणारे विद्युत सूर्य, चंद्र, नक्षत्रादि तेजस्वी पदार्थ आहेत त्या सर्वांची तेजस्विता दत्तमहाराजांच्या तेजामुळे आहे. "यदादित्यगतं तेजो जगद्भासयतेऽखिलं।

यच्चंद्रमसि यच्चाग्नौ तत्तेजो विद्धि मामकम् '' असे भगवद्गीतेतील १५ व्या अध्यायात कृष्णरूप धारण करून दत्तात्रेयांनीच अर्जुनाला सांगितले आहे. दत्तात्रेय हा परब्रह्माचा सगुण अवतार प्रथमचा आहे व तो ब्रह्म-विष्णू-शिवात्मक त्रैमूर्ती अवतार आहे. अन्य सर्व अवतार त्यानंतर त्यांनी धारण केले आहेत, म्हणून दत्तात्रेय महामुनीप्रमाणे 'महातेजा'ही आहेत. त्यांच्या केवळ स्मरणाने जपी साधक सर्व पापांपासून निःशेष मुक्त होतो. अर्थात् सर्व पापांपासून मुक्त होण्याकरता सतत दत्तात्रेयांचे स्मरण करून देणाऱ्या या मंत्राचा सतत जप करावा.

## श्लोक आठवा मंत्र सातवा

**नमस्ते भगवन् देव दत्तात्रेय जगत्प्रभो ।**

**सर्व बाधाप्रशमनं कुरु शान्तिं प्रयच्छ मे ॥८॥ मंत्र ७॥**

**अर्थ :** हे जगत्प्रभो अनंतकोटि ब्रह्मांडनायक हे दत्तात्रेय, हे भगवन् म्हणजे संपूर्ण ऐश्वर्य मालकी - संपूर्ण धर्म- संपूर्ण यशकीर्ती, संपूर्ण लक्ष्मी, संपूर्ण वैराग्य व संपूर्ण मुक्ती सर्वदा ज्यांना सोडून जात नाहीत. अशा परमपुरुषा ! स्वयंप्रकाशरूप देवा ! तुला आमचा नमस्कार असो. एका नमस्काराशिवाय आम्हाला तुझी कोणतीच भक्ती करता येत नाही व तोही नमस्कार सर्व जगत् भगवद्रूप आहे असे समजून होत नाही. कसाही असो, आमचा नमस्कार तुला पावो. आमच्या सर्व म्हणजे अनंत बाधा म्हणजे पीडा, क्लेश यांचे प्रशमन म्हणजे समूल उच्चाटन कर व आम्हाला परमशांती दे. ज्या शांतीची प्राप्ती झाली असतां मानव कृतकृत्य होतो.

## श्लोक ९ व १० व मंत्र आठवा

**अनसूयासुत श्रीश जनपातकनाशन ।**

**दिगंबर नमोनित्यं तुभ्यं मे वरदो भव ॥९॥**

**श्रीविष्णोरवतारोऽयं दत्तात्रेयो दिगंबरः ।**

**मालाकमण्डलूच्छूलडमरुशंखचक्रधृक् ॥१०॥**

**अर्थ :** हे अनसूयासुता, हे लक्ष्मीशा, हे जनपातकनाशना, हे दिगंबरा, तुला नित्य नमस्कार असो. तू मला वरद हो म्हणजे इष्टवर देणारा हो.

महाराज म्हणतात - ब्रह्मा, विष्णु व शंकर अशा तीन मुखाला व सहा हाताला धारण करणारा व्यापक विराट् ब्रह्माचा त्रिमूर्ती दत्तात्रेय दिगंबर हा पहिला अवतार आहे. याच्या सहा हातांपैकी खालच्या, मधल्या व वरच्या उजव्या व डाव्या

हातात क्रमाने खालच्यात माला व कमंडलू आहे. मधल्या हातात डमरू व त्रिशूल आहे व वरच्या हातात शंख व चक्र आहे. हा अवतार सर्व देवांचे वस्तुतः ऐक्य निदर्शक आहे. भेद काल्पनिक आहे; म्हणून परस्परांचे ऐक्य दाखवून जगाला शांति देण्याकरिता प्रगट झाला आहे. याच्या उपासनेने मनुष्य कृतकृत्य होतो.

**श्लोक अकरावा व मंत्र नववा**

**नमस्ते शारदे देवि सरस्वति मतिप्रदे ।**
**वस त्वं मम जिह्वाग्रे सर्व विद्याप्रदा भव ॥११॥ मंत्र ९॥**

**अर्थ :** हे शारदे, हे देवी, हे मतिप्रदे, हे सरस्वती, माझ्या जिह्वाग्रावर तुझे निरंतर वास्तव्य असो. तू मला सर्वविद्या देणारी अशी हो. या मंत्राच्या अखंड जपाने अध्ययनाशिवाय सर्वविद्या प्राप्त होतात. वेदान्तातील अत्यंत कठीण 'खंडनखंड-खाद्य' नावाचा ग्रंथ करणारे व पंचकाव्यांमध्ये उत्तम प्रतीचे नैषधकाव्य व इतरही ग्रंथ करणारे 'श्रीहर्ष' कवी सरस्वतीच्या मंत्रोपासनाने जगद्विख्यात पंडित व ब्रह्मसाक्षात्कारी असे झाले, हे सर्वत्र विद्वज्जनामध्ये प्रसिद्ध आहे. सरस्वतीचा प्रसाद झाल्यास अध्ययनाशिवाय सर्व विद्या येतात. या मंत्रजपानेही, सर्व विद्या आपोआप प्राप्त होतात. परंतु दृढविश्वासाने जप करीत राहिले पाहिजे. श्रद्धा नसल्यास अनुष्ठान करण्याकडे प्रवृत्तीच होत नाही. असे मोठे विघ्न 'अश्रद्धा' रूप येथे ठेवले आहे. श्रुती 'श्रद्धत्स्व' असे वारंवार बजावीत असते. श्रीकृपे सर्वांना श्रद्धा देऊन दत्तमहाराजांनी सर्वांचे कल्याण करावे अशी त्यांचे चरणी प्रार्थना आहे.

**श्लोक बारावा व मंत्र दहावा**

**दत्तात्रेयं प्रपद्ये शरणमनुदिनं दीनबंधुं मुकुंदम् ।**
**नैर्गुण्ये संनिविष्टं पथि परमपदं बोधयंतं मुनीनाम् ॥**
**भस्माभ्यंगं जटाभिःसुललितमुकुटं दिक्पटं दिव्यरूपम्**
**सह्याद्रौ नित्यावासं प्रमुदितममलं सद्गुरुं चारुशीलम् ॥१२॥**

**अर्थ :** दीनदुबळ्यांवर बंधूप्रमाणे प्रेम करणाऱ्या दीनबंधूला, सर्व जीवांना बंधातून मुक्त करणाऱ्या मुकुंदाला, सत्त्व, रज व तम या तिनी गुणांना उल्लंघन करणाऱ्या म्हणजे त्रिगुणातीत अशा मार्गावर स्वतः राहून, भक्तांनाही त्या मार्गावर पोचविणाऱ्या ''नैर्गुण्ये पंथिसंनिविष्ट'' असणाऱ्याला मनन हेच ज्यांचे शील आहे

अशा मुनींना परमपदाचा बोध उपदेश देणाऱ्या नैर्गुण्यमार्गोपदेशकाला, सर्वांगाला भस्माचे लेपन करणाऱ्या, भस्माभ्यंगाला आपल्या जटेनेच सुंदर मुकुट करून तिन्ही मस्तकांवर धारण करणाऱ्या, सुललितमुकुटधारकाला, दिशा हेच ज्याचे वस्त्र आहे अर्थात् अवधूतस्वरूपधारक दिगंबराला, सह्याद्रिपर्वतावर नित्य वास्तव्य करणाऱ्या, सह्याद्रौ नित्यवास्तव्यशीलाला, सदा ब्रह्मानंदामध्ये मग्न असणाऱ्या प्रमुदिताला, अविद्यादिमलरहिताला अमलाला ,सर्वांची अविद्यानाश करण्याकरताच अवतरलेल्या सद्गुरूला, ज्याचे शील अत्यंत सुंदर आहे अशा चारुशीलाला, अत्रिपुत्र दत्तात्रेयाला, मी रोजच्या रोज शरण आलो आहे. माझे सर्वातोपरी रक्षण करा असे अनन्य भावाने म्हणणे म्हणजे शरण जाणे अशा शरणाला 'श्रीदत्तात्रेयरूप वरील सर्व विशेषणांनी युक्त महापुरुषाला मी शरण आलो आहे. शरणागताचे रक्षण करणे हे आपले ब्रीद आहे. तरी मला आपल्या पदरात घेऊन कृतार्थ करा व माझ्या मानवदेहाचे सार्थक करा, अशी नम्र प्रार्थना आपले चरणी आहे. ।।

।।श्रीमद्वासुदेवानंदसरस्वती विरचित मंत्रात्मक श्लोकविवरण संपूर्ण ।।

❖❖❖

# (१३७) श्रीदत्तात्रेयापराधक्षमापनस्तोत्रम् ॥

रसज्ञा वशा तारकं स्वादु लभ्यं गृहीतं कदाचिन्न ते नाम दत्त
क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त ॥१॥
वियोन्यंतरे दैवदार्ढ्याद्विभो प्राग्गृहीतं कदाचिन्न ते नाम दत्त
क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त ॥२॥
मया मातृगर्भस्थितिप्राप्तकष्टाद्गृहीतं कदाचिन्न ते नाम दत्त
क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त ॥३॥
मया जातमात्रेण संमोहितेन गृहीतं कदाचिन्न ते नाम दत्त
क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त ॥४॥
मया क्रीडनासक्तचित्तेन बाल्ये गृहीतं कदाचिन्न ते नाम दत्त
क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त ॥५॥
मया यौवनेऽज्ञानतो भोगतोषाद्गृहीतं कदाचिन्न ते नाम दत्त
क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त ॥६॥
मया स्थाविरेऽनिघ्नसर्वेंद्रियेण गृहीतं कदाचिन्न ते नाम दत्त
क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त ॥७॥
हृषीकेश मे वाङ्मनःकायजातं हरेऽज्ञानतो ज्ञानतो विश्वसाक्षिन्
क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त ॥८॥
स्मृतोध्यात आवाहितोस्यर्चितो नो न गीतः स्तुतो वंदितो नो न जप्तः
क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त ॥९॥
दयाब्धिर्भवादृङ् न सागाश्च मादृग्भवत्याप्तमंतोर्भवान्मे शरण्यः
यथाऽआलंबनं भूर्हि भूनिःसृतांघ्रेरिति प्रार्थितं दत्तशिष्येण सारं ॥१०॥

**इति श्री प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वतीविरचितं**
**श्रीदत्तात्रेयापराधक्षमापनस्तोत्रं संपूर्णम् ॥**

✿ ✿ ✿

# अपराधक्षमापन स्तुतिः

## लेखक - कै. ब्रह्मश्री पंडित आत्मारामशास्त्री जेरे, ठाणे

**प्रस्तावना :**

प्रातःस्मरणीय, परमपूज्य, कलियुगातील योगिराजरूप, दत्तात्रेयांच्या तृतीय अवताररूप, परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंदसरस्वती स्वामिचरणांनी श्रीगुरुनृसिंहसरस्वती स्वामीमहाराजांच्या आज्ञेने द्विसाहस्री नावाचे संस्कृत गुरुचरित्र केले आहे. तत्पूर्वी वक्त्या श्रोत्यांचे मंगल व्हावे म्हणून ११२ श्लोकांनी महाराजांनी 'गुरुस्तुती' प्रकरण लिहिले आहे. नंतर गुरुचरित्रास प्रारंभ केला आहे. या गुरुचरित्राचे ज्ञानकांड, कर्मकांड व उपासना किंवा भक्तिकांड असे तीन भाग क्रमाने लिहले आहेत. त्यात तेरा अध्याय ज्ञानकांड आहे. चौदाव्या अध्यायापासून अठराव्या अध्यायापर्यंत कर्मकांड व एकोणीस अध्यायापासून तेवीस अध्यायापर्यंत उपासना किंवा भक्तिकांड लिहिले आहे. ज्ञान हे कर्म व भक्ती या योगानेच साध्य आहे म्हणून प्रथम आपणास साध्य काय करायचे आहे ते दाखवून मग साधन कोणते व कसे करावे हे सांगितले आहे. पुढील दोन प्रकरणांत योगाचे रहस्य व ज्ञानाचे रहस्य म्हणजे त्यातील गुप्त गोष्टींचे निरूपण केले आहे. असा हा सर्वोत्तम ग्रंथ 'गुरुचरितम्' या नावाचा महाराजांनी निर्माण केला आहे व त्यावर आपण स्वतः टीकाही केली आहे. हा ग्रंथ श्रीवासुदेव निवासात परमपूज्य योगिराज गुळवणी महाराजांनी छापविलाही आहे. पूजनीय गुळवणी महाराज हा ग्रंथ सोवळ्यात वाचीत असतात.

हा ग्रंथ स्वामीमहाराजांनी केल्यावर श्लोकांची संख्या दोन हजारापेक्षा कमी भरली व द्विसाहस्री कर अशी दत्तमहाराजांची तर आज्ञा ! आता कसे करावे ? असा विचार महाराजांच्या मनात आल्याबरोबर स्वप्नात दत्तमहाराजांनी सप्तशतीच्या संख्येत जशी उवाच ही अक्षरे अंतर्भूत होतात तशी येथे धरली म्हणजे बरोबर दोन हजार अशा अनुष्टुपवृत्तात ग्रंथसंख्या दोन हजार भरते असे सांगितल्यावर महाराजांचे समाधान झाले. असा हा ग्रंथ अमोलिक आहे व दत्तमहाराजांना फार प्रिय आहे.

अशा दिव्य ग्रंथातील गुरुस्तुतीच्या अंतर्गत असणारे हे स्तोत्रादिसंग्रहातील १३७ वे अपराधक्षमापन स्तोत्र आहे. ते नृसिंहवाडीत सकाळी काकडआरतीचे वेळी जेवढे होईल तेवढे व श्रीवासुदेव निवासात रात्रीचे आरतीचे वेळी संपूर्ण म्हटले जाते. या स्तोत्रात जन्माला आल्यापासून मरेपर्यंत या मनुष्य देहात मी आपले नाम ग्रहण केले नाही, या अपराधाची क्षमा करा, अशी वारंवार प्रार्थना केली आहे. मनुष्यांनी रोज मानसपूजा करावी व ती कशी करावी हे महाराजांनी प्रथम सांगितले आहे व मानसपूजा झाल्यावर या स्तोत्राचा पाठ दिला आहे. हे स्तोत्र रोज पूजेनंतर किंवा जेव्हा सवड होईल तेव्हा एकदा तरी म्हणावे म्हणजे स्तोत्रजप करणाऱ्यांचे दत्तमहाराज कल्याण ऐहलौकिक व पारलौकिक असे दोन्ही प्रकारचे करून त्याला परमानंदात ठेवतात असे याचे महत्त्व आहे. स्तोत्र संस्कृतात असले तरी ते सुलभ आहे. परंतु अक्षरशः अर्थ कळल्याने स्तोत्र म्हणणाऱ्याला अधिक आनंद होईल व म्हणणारा मोठ्या प्रेमाने ते म्हणेल. म्हणून यथामती महाराष्ट्रभाषेत याचे भाषांतर केले आहे. याचा उपयोग महाराष्ट्रभाषा जाणणाऱ्यास होऊन स्तोत्र म्हणताना त्याला जर आनंद झाला तर श्री दत्तमहाराजांना व स्वामीमहाराजांनाच तो आनंद झाला असे समजून मला कृतार्थता वाटेल.

## श्लोक पहिला

**रसज्ञावशा तारकं स्वादुलभ्यं गृहीतं कदाचिन्न ते नाम दत्त ।**
**क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त ॥१॥**

**अन्वय :** हे आर्द्रचित्त-दत्त-प्रभो रसज्ञावशा (अस्ति) ते नाम तारकं स्वादुलभ्यं (अस्ति) (तथापि) ते नाम कदाचित् (मया) न गृहीतम् (इमम्) अपराधं (कायिकं वाचिकं मानसिकं च) क्षमस्व ॥१॥

**विवरण :** हे दत्तगुरो आपण दयासागर आहा. सागर म्हटल्याबरोबर आम्हा जंबूद्वीपस्थांना लवणसागराशिवाय दुसरे सागर प्रत्यक्ष माहीत नसल्याने दयासागर सुद्धा खारट असेल अशीच कल्पना येते. परंतु अमर्याद लांबीरुंदी व खोली या दृष्टीने आम्ही आपल्या दयेला येथे सागर असे म्हटले आहे. दुग्धसागर, दधिसागर, इक्षुरससागर, घृतसागर व स्वादुजलसागर हे सर्व सागर सगर राजाने आणले नसून सुद्धा आमच्या शास्त्रकारांनी यांना सागर म्हटले आहे. ते लांबी, रुंदी व खोली यांच्या अमर्यादतेनेच म्हटले आहे. 'तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते' या न्यायाने आपल्या

दयेला आम्ही सागर म्हणत आहो. दयेत खारटपणा बिलकूल नसतो. अशा अत्यंत गोड अशा दयेच्या सागराने म्हणजे सागरासारख्या अमर्याद दयेने आपले चित्त भिजलेले आहे. ते कधी शुष्क होतच नाही. म्हणजे कितीही अपराध जरी आमच्याकडून झाले तरी आपल्या चित्तात दयेच्या विरुद्ध असणारा क्रोध कधीही निर्माण होत नाही. मग आमचे कायिक, वाचिक व मानसिक कितीही अपराध जरी असले तरी आपण आमच्यावर क्षमाच करणार असे ठाम समजून आम्ही आपल्या क्षमेची याचना करीत आहोत. आमची याचना आपल्याजवळ सफल होणारच. ''कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति'' पुत्र दुष्ट होऊ शकतो पण माता कधीच दुष्ट होत नाही. ''पिताहमस्यजगतोमाता धाता पितामहः''असे आपणच गीतेत म्हटले आहे. तेव्हा सर्व जगाची माता - केवळ माताच नव्हे तर पिता-पितामह व धाता असे सर्वच आहा. दान देणारा मनुष्य आपल्या मालकीच्या कोणत्याही वस्तू याचकाला देईल. आपले शरीर, मन इत्यादीही देईल. आपल्या स्वतःचेच दान आजपर्यंत आपल्याहून इतराने कोणीच केलेले नाही. ते आपले दान आपण अनसूया, अत्री व इतर सर्व सत्पात्रांना केले; ही केवढी आश्चर्याची गोष्ट आहे ! यावरून आपले हृदय किती दयार्द्र आहे याची साधारण का होईना, कल्पना येणे शक्य आहे. म्हणूनच आपले नाव दत्त असे पडले आहे. दरिद्री माणूस किती जरी दयार्द्र असला, तरी त्याच्याजवळ जो जे मागेल ते देण्याचे पदार्थच नसल्याने तो दयार्द्र असूनही काही देऊ शकत नाही. परंतु आपण दयार्द्र असूनही 'प्रभु' उपपदरहित प्रभु म्हणजेअनंत कोटी ब्रह्मांडनायक म्हणजे सर्वप्रभु असे आहात. म्हणजे भुक्ती, मुक्ती व परमार्थ हे सर्व आपण देऊ शकता. आपला शिष्य सहस्त्रार्जुन याने मागितलेल्या पदार्थांची केवढी मोठी यादी आपल्यापुढे टाकली व ती सर्व मागणी आपण पूर्ण केली. तो यादी करतानाच मायेमुळे फसला. त्यामुळे त्याला पश्चात्ताप झाला व पुनः आपल्याजवळ मागणेच बंद होईल अशी वस्तु मागण्यास आला व नंतर तीही ज्ञानरूपवस्तु त्याला दिली. असे आपण 'प्रभू' आहात. असा प्रभू जगात दुसरा कोणीही नाही. आपण जसे अद्वितीय प्रभू आहात तसे आम्ही सुद्धा अद्वितीय अपराधी आहोत. म्हणजे आमच्यासारखे अपराधी जगात दुसरे कोणीही नाहीत. म्हणून आम्ही अद्वितीय अपराधी. अशा अद्वितीयांनी याचना करण्याची असल्यास, अद्वितीयांकडेच करावी. कारण ती याचना करण्याला लायक असा दाता आपल्याहून द्वितीय कोणीच नाही. मग याचक होऊन दुसरीकडे कोठे जावे ?

असा अद्वितीय म्हणजे सर्व अपराधांपेक्षा विलक्षण-म्हणजे सर्वात मोठा-ज्यापेक्षा मोठा अपराध जगात कोणताही नाही, असा अपराध आम्ही केला आहे. तो अपराध म्हणजे आपले अमृतालाही फिके करणारे व नामग्राहकाला अमृतरूप करणारे असे आपले अमृतमय नाम आम्ही केव्हाही घेतले नाही. याहून जगात दुसरा मोठा अपराधच नाही. त्याबद्दल क्षमा करणारा हा आपल्याशिवाय जगात दुसरा कोणी नाही; अशी वस्तुस्थिती आहे. बंगाल्यातील अपरकृष्णावतार असलेले पदवाक्यप्रमाण पारावारीणदिग्गजपंडित व साधुश्रेष्ठ गौरांगप्रभु भगवंताला एकदा असे म्हणाले, नाम्नामकारि बहुता निजसर्वशक्तिस्तत्रार्पिता नियमितस्मरणे न कालः । एतादृशीतव कृपा भगवन् ममापि दुर्दैवमीदृशमिहाजनि नानुरागः ।। हे देवदेवा भगवन् ! आपल्या कृपेला काही सीमा नाही. ती कशी म्हणाल, तर सांगतो. ऐका. 'भिन्नरुचिर्हि लोकः' प्रत्येक माणसाची रुची म्हणजे आवड वेगवेगळी असते. प्रपंचातही भिन्न व परमार्थातही भिन्न असते. परमार्थातील आवड पूर्ण झाली म्हणजेच प्रपंचातील आवड शिल्लकच राहात नाही. म्हणून येथे प्रपंचाच्या आवडीचा विचार न करता परमार्थाच्या आवडीचाच विचार केला तर कोणाला देवीचे, कोणाला विष्णूचे, कोणाला शंकराचे, कोणाला गणपतीचे व कोणाला सूर्याचे असे नाव आवडते. हे पाच देव प्रसिद्ध म्हणून नमुन्याकरता घेतले आहेत. कोणाही माणसाला कोणत्याही देवाच्या नावाची रुची होईल म्हणून आपण सर्व देवस्वरूप होऊन त्या रूपास अनुसरून अनेक नामे निर्माण केली व ती प्रिय मानली. देवीसहस्रनाम, विष्णु सहस्रनाम, इत्यादी सर्व आपलीच नामे आहेत व ती आपणच ठेवून घेतली आहेत. कारण आपणास नाम ठेवणारे आईबापच कोणी नाहीत. म्हणून सर्व नामे आपल्या आवडीनेच आपण ठेवली असल्याने आपणास प्रिय आहेत. 'नाम्नामकारिबहुता' इतकेच नव्हे तर आपली जी शक्ती आहे, जीवाला ब्रह्म करणे, ऐहलौकिक व पारलौकिक सर्व सुख देणे, त्रिविध दुःखांचा नाश करणे इत्यादि सर्व शक्ती आपण आपल्या कोणत्याही नावात ठेवली आहे. 'निजसर्वशक्तिस्तत्रार्पिता' मागणाराच शहाणा पाहिजे. देणारा खंबीर आहे. बरे काल-देश-अवस्था इत्यादिकांचा काहीच नियम या नामग्रहणात ठेवला नाही. नामाहून इतर मंत्राला देशकाल अवस्था जाती इत्यादिकांचे बंधन आहे. ते न पाळले तर आपणच त्याचे विपरीत फल सांगितले आहे. सर्वांत श्रेष्ठ मंत्र म्हणजे वेद. त्याबद्दल किती नियम आपण घातले आहेत ? वैदिक मंत्रप्रयोगाने विवाहित झालेल्या ब्राह्मण क्षत्रिय वैश्य मातापितरांपासून ज्यांचा जन्म आहे अशा जन्मतः

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य मुलांच्या त्या त्या काळी झालेल्या मौजीबंधन संस्काराने तर त्या त्या वेदाचे अध्ययन करणे, यजुर्वेदी किंवा सामवेदी यांना ऋवेद म्हणणे झाल्यास प्रथम आपला वेद म्हणून पुनः दुसऱ्या म्हणजे ऋग्वेदाच्या अध्ययनाची इच्छा झाल्यास पुनः त्या वेदाध्यनाकरिता दुसरे उपनयन पुनः शुद्धस्थळी व शुद्धकाली, अनध्याय वगैरे वर्ज्य करून अशौचादिकनिषेध पाळून मोठ्या कष्टाने वेदाध्ययन करून त्याने आपले कल्याण साधावे लागते. परंतु देवा दयानिधे ! नामस्मरणाला हे काही नियम लागू नाहीत. कुठेही, केव्हाही, कोणीही कसाही नाममंत्र म्हणू शकतो. 'नियमितः स्मरणे न कालः' 'एतादृशी तवकृपा ।' अशी तुझी मोठी कृपा आहे. परंतु माझे दुर्दैव सुद्धा इतके खडतर आहे की, असे असूनसुद्धा माझी प्रीती या नावावर व नामजपावर होत नाही. 'भगवन् ममापि दुर्दैवमीदृशमिहाजनि नानुरागः' याचप्रमाणे महाराज म्हणतात प्रभो ! ही 'रसज्ञा' म्हणजे रस जाणण्यात निपुण असणारी माझी जीभ माझ्या ताब्यात आहे म्हणजे वश आहे. अर्धांगाचा झटका वगैरे येऊन परस्वाधीन झाली नाही. 'रसज्ञावशा' तुझे नाव 'तारक' म्हणजे संसारसमुद्रातून परतीराला ब्रह्मभावाला पोचविणारे आहे. कारण तुमच्या नावातच तुम्ही सर्व आपली शक्ती ठेवली आहे. बरे, ते नाम कडुलिंबाच्या रसासारखे कडूही नाही, अमृताहून गोड आहे, स्वादु आहे; असे नामामृत चाखणारे संत अनुभवाने सांगतात. बरे, ते दुर्लभ आहे असेही नाही. चंद्रामध्ये किंवा स्वर्गामध्ये अमृत आहे पण ते फार दुर्लभ, दुःखानीही मिळण्यास कठीण आहे; तसे हे नामामृत नाही. 'लभ्य' म्हणजे मिळण्यास सुलभ आहे. वेद म्हणायचा झाला किंवा इतर स्तोत्रे म्हणायची झाली तर प्रथम कठीण आहेत ती चांगली पाठ केली पाहिजेत. काही दिवस न म्हटली तर विसरतात. ओळीने श्लोकांची आठवण होत नाही वगैरे. पुनः, संचार म्हणजे इकडचे तिकडे, तिकडचे इकडे असे होते. या नामात हे काही नाही. विसरायची किंवा संचाराची भीती नाही. अत्यंत सुलभ व फलश्रुती तर लौकिक, पारमार्थिक, जे पाहिजे ते सर्व, नामापासून मिळते; असे असून ते नाम मी केव्हाच घेतले नाही. तेव्हा मी केवढे मोठे हे तीन - म्हणजे वाचिक, कायिक व मानसिक - वाचिक नामोच्चार, कायिक हात जोडणे व मानसिक अर्थाचे ध्यान न करणे, असे अपराध केले आहेत. हे दयासागरा दत्तात्रेय प्रभो, या सर्व अपराधांची क्षमा आपण करा ।।१।।

## श्लोक दुसरा

**वियोन्यन्तरे दैवदार्ढ्याद्विभो प्राक् गृहीतं कदाचिन्न ते नाम दत्त ।**
**क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं प्रभोक्लिन्नचित्त ।।२।।**

**अन्वय :** हे विभो, वियोन्यन्तरे दैवदार्ढ्यात् प्राक् (मया) कदाचित् ते नाम न गृहीतम्, हे क्लिन्नचित्त दत्त प्रभो (इमं) अपराधं क्षमस्व, क्षमस्व क्षमस्व ।।२।।

**विवरण :** हे दयासागरा दत्त प्रभो आपण 'विभु' म्हणजे सर्व व्यापक आहात. वि-म्हणजे विविध रूपाने भू-म्हणजे प्रकट होणारे असे आहात. न्यायशास्त्राच्या मताने 'सर्वमूर्तसंयोगित्वंविभुत्वं' असे विभुत्वाचे लक्षण आहे. म्हणजे जेवढे मूर्त म्हणजे सक्रिय पदार्थ आहेत, म्हणजे पृथ्वी, आप, तेज, वायू व त्यांचे परमाणू आणि मन यांच्याशी जो संयुक्त तो विभू असे न्यायशास्त्रकार म्हणतात. परंतु या लक्षणाच्या दृष्टीने आपणास आम्ही विभू म्हणत नाही. वेदान्तशास्त्राच्या दृष्टीने आम्हास विभुत्वाचे लक्षण करण्याचे आहे. वेदान्तशास्त्र हे अलौकिक पदार्थ दर्शविणारे इतर प्रमाणांनी सिद्ध नसलेले प्रमेयसांगणरे शास्त्र आहे. म्हणूनच ते अज्ञातपदार्थज्ञापक म्हणजे इतर प्रमाणांनी अज्ञात असे आपले विभुत्व दाखविणारे आहे. म्हणजे आध्यसिकतादात्म्याने स्वेतर संबंधित्व म्हणजे सर्व दृश्यपदार्थाशी मिथ्या तादात्म्याने संबंधित्व हे आपले विभुत्व आहे. आपण कल्पित तादात्म्याने सर्व दृश्याशी संबंधी आहा. म्हणून सर्वज्ञ आहा. म्हणजे अज्ञान व तत्कार्य यांच्याशी सर्वदा संबंधी आहा. म्हणून आपण सर्वज्ञ आहा. हे विभो, म्हणजे सर्वज्ञा दत्तगुरो, मी हल्ली मनुष्यशरीर धारण करून मनुष्यत्वाला प्राप्त झालो आहे. पुण्य व पाप समान प्रमाणात जमा करून आपण मनुष्यजन्म जीवाला देता. पुण्य अधिक झाले तर देवादिजन्म व पाप अधिकअसेल तर पश्वादिस्थावरान्त अधोगती जीवाला देता. चौऱ्यैंशी योनींत मनुष्य जन्म श्रेष्ठ आहे. मनुष्यालाच शास्त्राधिकार असल्याने त्याला स्वतःचा उत्कर्ष करण्यास सवड आहे. देवादिक जन्म व पश्वादिक जन्म हे भोगयोनीच असल्याने तेथे कर्माधिकार नसल्याने आपला उत्कर्ष करता येण्यासारखा नाही. म्हणून देवसुद्धा मनुष्य जन्म व्हावा व तो भारतवर्षात व्हावा अशी इच्छा करतात; असे भागवतादिशास्त्रांत वर्णिले आहे. अर्थात् 'वियोन्यंतरे' म्हणजे मनुष्यजन्माहून इतर सर्व जन्मांत दैववशात् म्हणजे दुर्दैवाच्या प्रभावाने किंवा 'अदैव' असे पद येथे मानल्यास, अदैव म्हणजे दुर्दैव असाच अर्थ करून, दृढ दुर्दैवाच्या तडाख्यात सापडून मनुष्यजन्मापूर्वी म्हणजे

'प्राक्' आपले नाव केव्हाही घेतले नाही. ज्या वेळेस मला उत्कृष्ट अशी देवादि योनी प्राप्त होती, त्यावेळी हवे ते विषय हवे त्यावेळी प्राप्त होण्याचा योग असल्याने - म्हणजे विषयभोगात काही प्रतिबंध नसल्याने - मी विषयासक्त होऊन आपले नामस्मरण केले नाही व पश्वादि नीच योनींत काहीच पारमार्थिक ज्ञान होण्याचा संभव नव्हता म्हणजे घनदाट अज्ञानांधकार असल्याने - त्याही योनीत आपले नामग्रहण माझ्याकडून झाले नाही हे मला आता कळते. कारण तसे नामग्रहण मला घडले असते तर कोणताही जन्मच मला आला नसता. ज्या अर्थी मला मनुष्यजन्म आला आहे त्या अर्थी मी आपले नामग्रहण किंवा नामस्मरण पूर्वी केव्हाही केले नाही. त्या अपराधाची क्षमा म्हणजे कायिक, वाचिक, मानसिक अशा त्रिविध प्रकारानेही नामस्मरण न करणे या अपराधाची क्षमा आपण करावी. आपण सर्वज्ञ असल्याने वियोन्यंतरात मी नामस्मरण केले नाही; हे आपण जाणत आहा व आपण दयासागर आहा म्हणून आपण क्षमा करा असे मी मागतो ।।२।।

## श्लोक तिसरा

**मया मातृगर्भस्थितिप्राप्तकष्टाद्गृहीतं कदाचिन्न ते नाम दत्त ।।**
**क्षमास्वापराधं क्षमास्वापराधं क्षमास्वापराधं प्रभोक्लिन्नचित्त ।।३।।**

**अन्वय :** हे क्लिन्नचित्त, दत्तप्रभो, मातृगर्भस्थितिप्राप्तकष्टात् कदाचित ते नाम मया न गृहितं (इमं) अपराधं क्षमस्व, क्षमस्व, क्षमस्व ।।३।।

**विवरण :** हे दयासागर दत्तप्रभो, आजपर्यंत अनेक मातांच्या गर्भामध्ये माझे वास्तव्य झाले. त्या नऊ महिन्यांच्या किंवा क्वचित् अधिकही महिन्यांच्या काळात जे मला दुःख म्हणजे कष्ट झाले त्यामुळे मला तुझे नाव घेता आले नाही. गर्भावस्थेतील ते कष्ट मी प्रत्यक्ष भोगले आहेत. परंतु व्रणातून जसा एखादा किडा पडावा तसा मी गर्भातून बाहेर पडल्यावर ते सर्व विसरलो आहे. मला त्याची यत्किंचितसुद्धा आठवण नाही. बाहेर पडल्यावर लहानपणाच्या कष्टाची तरी कोठे आता आठवण आहे ? आईबापाने सांगितल्यावर ते खरे आहे असे मानावे लागते; कारण ते यथार्थवक्ते आहेत. मग आईबापापेक्षा हजारो पटीने जीवाचे कल्याण करणारे व हजारो पटीने प्रमाणभूत जे शास्त्र, त्यांने सांगितलेले गर्भातील कष्ट खोटे म्हणण्याचा मला काय अधिकार आहे ? 'आप्तवचनं प्रमाणम्' हेच सत्य आहे. गर्भात असताना मला पूर्वीच्या सर्व जन्मांचे स्मरण होत होते व गर्भावस्थेतील दुःखही प्रत्यक्ष अनुभवाला

येत होते; असे शास्त्र सांगते. त्यावेळी मी 'जीव' या स्वरूपात होतो. त्यामुळे पूर्वीच्या सर्व जन्मांची, त्यांतील सुख दुःखाची व आईबापांची आठवण होत होती. मी त्यावेळी ईश्वराची अनन्यभावाने प्रार्थनाही करीत होतो. त्यावेळी मी म्हणत होतो, दयासागरादेवा ! या यातनेतून मला तू सोडव. तुझे भजन न केल्यामुळे मला या यातना होत आहेत. आता कळत असून सुद्धा या यातनेमुळे येथे तुझे भजन करता येत नाही. मला यातून बाहेर काढ. म्हणजे तुझ्या भजनावाचून मी दुसरे काहीही करणार नाही. हे तुझी शपथ घेऊन मी तुला सांगतो; अशी एकसारखी मी देवाची प्रार्थना करीत होतो. देवदयेने मी या गर्भातून बाहेर पडलो आणि या दैवी मायेने माझ्यावर आपला पाश टाकला. मी माझे जीवस्वरूप विसरून 'सोहं'चा 'कोहं' झालो आणि त्या त्या देहाला 'मी'च असे समजून पढतमूर्ख झालो. गर्भातून बाहेर आल्यावर सुद्धा मायेचा पाश न पडणे, असे एखाद्याच वामदेवादिकांसारख्या महापुरुषालाच लभ्य आहे. येरागबाळाचे ते काम नव्हे. गर्भातील माझे कष्ट व माझ्या प्रार्थना येथे जर मी सांगत बसलो तर संपूर्ण गर्भोपनिषदच येथे मला सांगावे लागेल. हल्ली साधारण दुःखे असताना देखील तुझे नामस्मरण करता येत नाही. मग गर्भातील दुःखाचा अनुभव घेत असताना तुझे नामग्रहण कसे होणार? म्हणून त्यावेळी मी तुझे नाम घेतले नाही. त्याबद्दल हे दयासागरा ! दत्तप्रभो ! माझ्या या अपराधाची क्षमा कर, क्षमा कर, क्षमा कर अशी मी प्रार्थना करतो. ।।३।।

## श्लोक चौथा

**मया जातमात्रेण संमोहितेन गृहीतं कदाचिन्न ते नाम दत्त ।।**
**क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त ।।४।।**

तिसऱ्या श्लोकात, मी आईच्या गर्भात असताना मला सर्व पूर्वजन्मांचे ज्ञान होते म्हणजे मी पूर्वी कोणकोणत्या योनी भोगल्या, माझे आईबाप कोण कोण होते, कोणकोणत्या देशांत जन्म घेतले, कोणकोणत्या काळात जन्म घेतले, तेथे काय काय वर्तन केले, हे सर्व आठवत होते. पूर्वीच्या एवढ्या जन्मांत पुनर्जन्म चुकविणारे ईश्वरभजन मी केले नाही; हेही मला स्मरले. देवा !, आता मातृगर्भातील भयंकर कष्टाने मला तुझे नाम घेता येत नाही. तरी या अपराधाची क्षमा कर. या गर्भातील दुःखापासून मला सोडीव म्हणजे मला येथून बाहेर काढ. म्हणजे मी रात्रंदिवस तुझे भजन व नामस्मरण करून पुनः जन्म न येईल असा वागेन, अशी प्रार्थना करीत

करीत मी नऊ महिने गर्भात काढले. ईश्वराने ही दया करून मला मातेच्या कष्टप्रद गर्भाशयातून बाहेर काढले, परंतु माझे दुर्दैवही असे खडतर आहे, की बाहेर आल्याबरोबर मी 'सोऽहं'चा 'कोऽहं' झालो, म्हणजे नाना योनींत कष्ट भोगणारा नाना देहांहून वेगळा मी आहे हे विसरून, मी कोण आहे हेच मला कळेनासे झाले. असे अज्ञानाचे आवरण माझ्यावर पडले. हे सुद्धा आता मी शास्त्रावर विश्वास ठेवून शास्त्रदृष्टीने बोलत आहे. गर्भात जसे नाना देहांहून मी वेगळा आहे असे प्रत्यक्षमूलकस्मरण होते, तसे हे ज्ञान नाही. शास्त्र सांगते म्हणून मी बोलत आहे. पूर्वीसारखा अनुभव वा स्मरण मला नाही. तो अनुभव किंवा स्मरण या अवस्थेत म्हणजे जन्मल्याबरोबर मला जर असते, तर मी जन्मभर तुझ्या भजनावाचून दुसरे काहीच केले नसते. परंतु जन्मल्याबरोबर मी या अज्ञानाच्या आवरणाने अत्यंत मोहित झाल्यामुळे तुझे नामस्मरण करण्याकडे एकदाही माझी प्रवृत्ती होत नाही. 'नामस्मरण कर म्हणजे तुझे कल्याण होईल' असा साधुसंतांचा उपदेश साक्षात् व परंपरेने माझ्या कानावर आला आहे. परंतु माझी प्रवृत्तीच तिकडे होत नाही व झाली नाही. कोणत्याहि गोष्टींचे स्मरण होणे, निश्चय होणे व विस्मरण होणे, भगवंता ! तुझ्याच हातात आहे. 'मत्तःस्मृतिर्ज्ञानमपोहनंच' असे तूच गीतेत सांगितले आहेस. तेव्हा भगवंता मी पराधीन म्हणजे अदृष्टाधीन आहे. तरी हे दयाघना या अपराधांची क्षमा कर. मी स्वतंत्र असून जर अपराध केला असता, तर क्षमा कर असे म्हणणे अयोग्य झाले असतें. मी अदृष्टाधीन म्हणजे परतंत्र आहे म्हणून या अपराधाची तू क्षमा कर. या अपराधाकडे दुर्लक्ष कर; अशी मी त्रिवार तुझ्या चरणाजवळ प्रार्थना करीत आहे. दयाघना ! तू स्वतंत्र व दयासागर आहेस. यापेक्षा मी अधिक काय बोलू ।।४।।

## श्लोक पाचवा

**मया क्रीडनासक्तचित्तेन बाल्ये गृहीतं कदाचिन्न ते नाम दत्त ।**
**क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त ।।५।।**

हे दयासागर प्रभो तुझ्या कृपेने मातृगर्भातून बाहेर आलो, परंतु गर्भावस्थेतील माझे ज्ञान नष्ट होऊन म्हणजे 'सोऽहं' या ज्ञानाचा लोप होऊन 'कोऽहं' अशी अत्यंत मूढ अवस्था मला प्राप्त झाली. मनुष्याचे आयुष्य असते असे पूर्वश्लोकात वर्णन झाले. 'शतायुर्वैरायुषः' म्हणजे शंभर वर्षे मनुष्याचे आयुष्य असते असे वरील

श्रुतीच्या सिद्धान्ताने गृहीत धरले. गृहीत धरले असे म्हणण्याचे कारण, शंभर वर्षे आयुष्य असणारे लोक या कलिकालात दुर्लभच आहेत. कारण शंभर वर्षे जगणारी माणसे आपल्या पाहाण्यात फार कमी येतात. कदाचित् शंभर वर्षे जगलेल्या माणसाचे मान्य केले तरी त्याचे अर्धे आयुष्य म्हणजे पन्नास वर्षे आयुष्य निद्रा वगैरे कामातच खर्च होते. हे आयुष्य तुझे नाम घेण्यास उपयोगी पडत नाही. उरलेले आयुष्य पन्नास वर्षे आहे. त्यांत बाल्य-तरुण्य व वार्धक्य अशा तीन अवस्था प्रल्हादभक्तांनी कल्पिल्या आहेत. त्यात कौमारावस्थेचा बाल्यावस्थेत अंतर्भाव केला आहे. म्हणजे कौमार व बाल्य मिळून बाल्यअवस्थाच धरावी. ती अवस्था जन्मापासून वीस वर्षांपर्यंत आहे. म्हणजे पन्नासांतील वीस वर्षे बाल्यावस्थेत गेली. उरलेल्या तीस वर्षापैकी वीस वर्षे वार्धक्य म्हणजे म्हातारपणात गेली. बाकी उरलेली दहा वर्षे यौवन म्हणजे तारुण्यावस्थेच्या वाट्याला आली. त्यांपैकी बाल्यावस्थेत म्हणजे जन्मापासून वीस वर्षापर्यंत तुझे नामग्रहण माझ्याकडून झाले नाही. हे या पाचव्या श्लोकात सांगायचे आहे. सहाव्या श्लोकात तारुण्यात व सातव्या श्लोकात वार्धक्यात तुझे नामग्रहण झाले नाही असे सांगायचे आहे. आपणास जे काही ध्येय प्राप्त करून घ्यावयाचे आहे ते जोमदार अशा तारुण्यातच घेणे शक्य आहे. बाल्य व वार्धक्य या दोन्ही अवस्था ध्येय प्राप्त करून घेण्याला अयोग्यच आहेत; असे भगवद्भक्तश्रेष्ठ अशा प्रल्हादाचे मत आहे हे मत परमपूज्य प्रातःस्मरणीय भगवान् नारदांच्या उपदेशाने प्रल्हादाने ठरविले आहे. स्वतः पोरकटपणाने नाही; हेही लक्षात घेण्यासारखे आहे हे विसरता कामा नये. नाहीतर पाचव्या वर्षीच प्रल्हादाला असा उपदेश आपल्या मित्रमंडळींना करणे अशक्य आहे. म्हणूनच गुरूंच्याही आधी प्रल्हादाचे नाव घालून 'प्रल्हादनारदपराशर' अशी परम भागवतांची गणना श्रेष्ठांनी जी केली; ती केली नसती. नारदांच्या वाट्याला न आलेले भाग्य प्रल्हादाच्या वाट्यास आले आहे, हे लक्षात ठेवण्यासारखेच आहे. असो.

'बाल अवस्था खेल गमायो' असा मोठमोठ्या सतांचा सुद्धा सिद्धांत आहे. 'बालस्तावत्क्रीडासक्त' असे भगवत्पूज्यपाद शंकराचार्यांनी म्हटले आहे. बाल क्रीडासक्त, तरुण तरुणीसक्त व वृद्ध चिंतामग्न असतो; असे शहाणे लोक म्हणतात. तिन्ही अवस्थेत भगवद्भक्त किंवा भगवद्भक्तीरत होणे हजारो जन्मांत संपादन केलेल्या पुण्याईशिवाय शक्य नाही. ही पुण्याई पदरी असेल तर भगवद्भक्तांची संगती जन्मापासूनच जीवाला लाभते व त्याच्या तीनही अवस्था पुण्यमय, कल्याणमय व

भगवन्मय होतात. संगतीचा परिणाम फार मोठा आहे. मातीसारखा निर्जीव पदार्थसुद्धा फुलांच्या संगतीने सुगंधी सर्वाभिलाषणीय असा होतो व कांदे वगैरे दुर्गंधी तामस पदार्थांच्या संगीतने, संतांना अग्राह्य व अनादरणीय असा होतो. मग सजीव पदार्थावर सत्संगती किंवा दुष्टसंगती यांचा परिणाम झाल्याशिवाय कसा राहील ? प्रल्हादाचे महद्भाग्य कार्योन्मुख झाल्यामुळे गर्भावस्थेपासूनच त्याला सत्संगती लाभली व त्याच्या जन्माचे सोने झाले. त्यांनी बाल्यावस्थेत क्रीडेत आसक्ती कधीच धरली नाही. 'त्यक्तक्रीडनकोबालः' असे त्याचे वर्णन शुकाचार्यांसारख्या संतश्रेष्ठांनी केले आहे. हे दयासागरा ! देवा ! माझ्या पदरी पुण्याईचा लेशही नसल्याने व पापाचे ढीग असल्याने मला सत्संगती न लाभता दुःसंगतीच मिळाली व त्यामुळे बाल्यावस्थेत मी क्रीडनासक्त झालो व केव्हाही परमपवित्र मंगलमय व कल्याणमय असे तुझे नाम मी घेतले नाही. तरी या कायिक, वाचिक, मानसिक अपराधाची क्षमा तू कर, अशी माझी अनन्यभावाने तुझ्या चरणी प्रार्थना आहे ।।५।।

## श्लोक सहावा ६

**मया यौवनेऽज्ञानतो भोगतोषात् गृहीतं कदाचिन्न ते नाम दत्त ।।**
**क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं प्रभोक्लिन्नचित्त ।।६।।**

यौवन म्हणजे तारुण्य. 'यूनो भावः यौवनं' 'ईश्वरकृपेने लहानपणापासूनच जर प्रल्हादादिकांप्रमाणे संतसंगती लाभली तर बाल्य तारुण्य व वार्धक्य या तिन्ही अवस्था मंगलमय, कल्याणमय व आनंदमय अशा होतात व नराचा नारायण होतो. परंतु महापुरुषसंश्रय अत्यंत दुर्लभ आहे. मनुष्यत्व - मुमुक्षुत्व व महापुरुषसंश्रय हे तीन्ही दुर्लभ आहेत. बाकी सर्व गोष्टी जगात सुलभ आहेत. असे 'त्रयमेवैतत्' असा 'एव' कार घालून भगवत्पूज्यपादांनी विवेकचूडामणी ग्रंथात दाखविले आहे. 'श्वयुवमघोनां' अशा सूत्रात कुत्रा, तरुण व इंद्र हे संतसंगती नसेल तर सारख्याच योग्यतेचे आहेत असे दाखविण्याकरता व्याकरणाचार्य पाणिनी महर्षीने एका सूत्रात त्यांना गोवले आहे. पाण्यात जमीन बुडाली म्हणजे उंच, समान व खोल हा भेद राहात नाही. सर्व सारखेच वाटते. पाणी ओसरल्यावर हा भेद स्पष्ट दिसतो. तद्वत् अज्ञानरूप जलप्रवाहात बुडलेल्या कुत्रा, तरुण व इंद्र यांच्यात भेद दिसत नाही. अज्ञानग्रस्त तरुणाचे, कुत्र्याचे व इंद्राचे चरित्र सारखेच असते. पशु, मनुष्य व देव हे वैलक्षण्य-कनिष्ठ, मध्यम व श्रेष्ठ असे वैलक्षण्य-लुप्त होऊन तिघांचेही वर्तन

सारख्याच प्रकारचे असते, असे त्यांच्या चरित्रवाचकाला माहीतच आहे. म्हणून तारुण्याला गद्धेपंचविशी असे म्हणतात. तरुणपणात तारुण्याला जसा भर असतो तसा अज्ञानालाही भर असतो. हे संतसंगतीरहित तरुणाचे वर्णन आहे. या अज्ञान्यांच्या तारुण्यात भोग-म्हणजे स्त्री इत्यादि विषयभोग काम-व तत्साधन असणारा अर्थ म्हणजे पैसा या दोघांलाच प्राधान्य असते. धर्म व मोक्ष असे जे दोन श्रेष्ठ पुरुषार्थ आहेत ते अज्ञानपुरात बुडून गेलेले असतात. मग ते कसे दिसणार ? अशा राष्ट्राला, देशाला, नगराला किंवा घराला अर्थकामप्रधान असे म्हटले जाते. अर्थकामप्रधान राष्ट्रादिकांचा अधःपात जवळच आला आहे, असे पक्के समजले पाहिजे. अशा अवस्थेतच धर्मग्लानी व अधर्माचे अभ्युत्थान म्हणजे अभिवृद्धी होत असते. अशा प्रसंगी सर्वज्ञ व सर्वशक्तिसंपन्न भगवान् उपदेशाने, संगतीने, पराक्रमाने ही अर्थकामप्रधान प्रवृत्ती दूर करून धर्ममोक्षप्रधान प्रवृत्तीची अभिवृद्धी करीत असतो. त्यामुळे काही काळ का होईना जगात शांती नांदते. पुनः ''येरे माझ्या मागल्या'' या न्यायाने पूर्ववत् अर्थकामप्राधान्य सुरू होते. हा सृष्टीचा क्रमच आहे. कारण जगद्वैचित्र्याप्रमाणे कालवैचित्र्यही सर्वदा आहेच. दोन्ही ईश्वरनिर्मितच आहेत. जगत् हे चाकाप्रमाणे असल्याने एकसारखे सर्वदा राहू शकत नाही. खालीवर होणारच. कधी सत्त्वगुण, कधी रजोगुण, तर कधी तमोगुण असे जगत् असेपर्यंत चालणारच. कारण जगत् त्रिगुणात्मक आहे. निस्त्रैगुण्य झाल्यावरच शांत अवस्था सर्वदा राहणार, त्यावेळी त्रैगुण्य नाही व तत्संबंधी जगतही नाही 'सर्वं खल्विदं ब्रह्म' असेच ते स्वरूप आहे. 'सकलमिदमहंचवासुदेवः' ईश, ईशितव्य व जगत् असे तेथे काहीच नाही. केवळ एक तत्त्वच आहे. हे भावनेशिवाय कळणार नाही. व 'नचाभावयतः शान्तिः' म्हणजे भावना नसेल तर शांतीही नाही. भावना अखंड नामग्रहणाशिवाय नाही. देवा ! दयाघना ! मी अज्ञानाने भरलेल्या या तारुण्यात भोग व तत्साधन पैसा यालाच प्राधान्य देऊन गटारात लोळणाऱ्या डुकराप्रमाणे त्यातच मोठा आनंद किंवा परमानंद मानून अखंड शांती देणारे तुझे नाव एकदासुद्धा घेतले नाही. कारण त्यावेळी मला तुझे नाव घेण्यास सवडच नव्हती. तरी देवा ! आता त्याबद्दल मला पश्चात्ताप होत आहे म्हणून माझ्या या घोर अपराधांबद्दल मला तू क्षमा कर. तू दयासागराप्रमाणे क्षमासागर आहेस, म्हणूनच तुझ्यापाशी मी क्षमा मागत आहे. ।।६।।

## श्लोक सातवा

**मया स्थाविरे ऽ निघ्नसर्वेन्द्रियेण गृहितं कदाचिन्न ते नाम दत्त ।**
**क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त ।।७।।**

**विवरण :** हे दयार्द्रचित्ता दत्तगुरो ! आता मला 'स्थाविर' म्हणजे म्हातारपणा वृद्धापकाळ प्राप्त झाला आहे. या काळात सिंहावलोकन या न्यायाने या जन्मात केलेली सुकृत्ये व कुकृत्ये बरीचशी आठवतात. मी केलेली कुकृत्ये आठवून माझ्या हातून असे का घडले असे वाटून पश्चात्ताप होतो. पश्चात्ताप हे एक मोठे प्रायश्चित्तच आहे; हे जरी खरे असले, तरी त्या कुकृत्याचे परिमार्जन करण्याची शक्ती आता राहिली नाही. ऐकू येत नाही, दिसत नाही, चालताना पाय लटपटतात, दात पडले, नाक वाहाते, अशा अनेक विपत्ती रोज वाढत्या प्रमाणात आहेत. एकही इंद्रिय माझ्या इच्छेप्रमाणे काम करण्यास तयार नाही. म्हणजे 'निघ्न' स्वाधीन नाही. म्हणजे 'अनिघ्न' आहे. पहिल्यापासून अभ्यास नसल्यामुळे तास दोन तास आसन घालून बसता येत नाही. देवा ! तुझी पूजा करता येत नाही. नामस्मरण करता येत नाही. ध्यान व धारणा तर दूरच राहिली. मुलांचे कसे होईल, नातवंडांचे कसे होईल इत्यादी एक ना दोन, अनेक चिंता सारख्या मनात येत आहेत. रात्री झोप पुरी लागत नाही. सर्व माणसे गाढ झोपेत घोरत पडलेली असतात. मी मात्र एकटा त्यावेळी घोर चिंतेत मग्न झालेला असतो. त्यावेळी एकांत असल्याने बाहेरच्या व घरच्या लोकांचा काही उपद्रव नसतो. परंतु पहिल्यापासून नामस्मरणाची सवयच नसल्याने सर्व अनुकूलता असून नामस्मरण करता येत नाही. मी एकट्याने सर्वांची चिंता करून त्यांना सुख कसे लागणार, हे कळत असूनही ते वळत नाही व चिंता काही बंद होत नाही. त्यामुळे प्रकृतीवर परिणाम होतो. ''चिंतासमंनास्ति शरीरशोषणं'' चिंतेसारखे शरीरशोषक दुसरे काही नाही हेही वाटते. परंतु चिंता बंद करणे माझ्या हातात नाही. अशा परिस्थितीत माझी काय अवस्था होत असेल हे सर्वज्ञ देवा, तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणाला कळणार बरे ? माझ्याबद्दल, माझे म्हणून मी ज्यांना समजत होतो, त्यांना माझ्याविषयी यत्किंचितही प्रेम किंवा आदर नाही. कारण तारुण्यात स्वार्थ सोडून त्यांच्या कल्याणाकरिता मी काहीच केले नाही. त्यामुळे त्यांनी तरी माझी सेवा का करावी ? हा म्हातारा केव्हा जाईल अशीच वृत्ती सर्वांची आहे. आता माझी फारच घाण सर्वांना येऊ लागली आहे. परंतु मला त्यांची संगती सोडावी असे वाटत नाही. यांची संगती सोडल्यास माझे कसे होईल असे मला

वाटते. प्रत्येकाचे प्रारब्ध त्यांच्याबरोबर असते व तेच सर्व व्यवस्था करीत असते असा सिद्धांत असला, तरी माझा या शास्त्रसिद्धांतावर बिलकूल विश्वासच पूर्वीपासून नव्हता व आताही तसा खरा विश्वास त्याबद्दल नाही. कलियुगातील वेदान्त्याप्रमाणे उगीचच तो सिद्धांत अर्थशून्यपणे मी म्हणत असतो. ''नामे अनंत तरले तरती अनंत'' हे तत्त्व बाणत नाही. त्यामुळे या वृद्धावस्थेत तुझे नाव मी घेतले नाही. या घोर अपराधाची क्षमा हे दयासागरदेवा ! मला कर. अशी तुझ्या चरणी अनन्य भावाने प्रार्थना आहे. मी या प्रार्थनेशिवाय दुसरे काहीच करू शकत नाही. अपराध क्षमा कर. अपराध क्षमा कर. अपराध क्षमा कर ॥७॥

## श्लोक आठवा

**हृषीकेश मे वाङ्मनःकायजातं । हरेऽज्ञानतोज्ञानतो विश्वसाक्षिन् ।**
**क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त ॥८॥**

**अन्वय :** हे हृषीकेश हे विश्वसाक्षिन् हे क्लिन्नचित्त हे हरे हे प्रभो मे अज्ञानतो ज्ञानतो वाङ्मनःकायजातं अपराधं क्षमस्व ॥८॥

**विवरण :** हृषीकानां ईशः हृषीकेशः । म्हणजे जगात इंद्रिय अशी संज्ञा ज्यांना आहे असे सर्व पदार्थ. पाच ज्ञानेंद्रिये चक्षु वगैरे, पाच कर्मेन्द्रिये वाणी वगैरे व मन अशी अकरा किंवा बुद्धी, अहंकार त्यात धरल्यास तेरा, चित्त व अंतःकरण धरल्यास पंधरा पदार्थांचा मालक हे प्रभो ! तूच आहेस. वास्तविक सर्वच जगाचा ईश्वर तू असून केवळ हृषीकेश असे तुला आम्ही म्हटले याचे कारण शरीर वाणी व मन यापासून झालेल्या अपराधाची क्षमा कर असे तुझ्याजवळ आम्हाला मागायचे असून यत्रिकरणात म्हणजे अपराध करण्यात निपुण असणाऱ्या तीन साधनांत मन व वाणी यांचा समावेश असल्याने त्याची मालकी तुझ्याकडे आहेच आहे. सर्व जगाच्या ईश्वराला अयोध्याधीश, मथुराधीश, द्वारकाधीश व वैकुंठाधीश किंवा कैलासाधीश असे म्हणण्याप्रमाणेच हे आहे. देवा ! त्यात तुझा कमीपणा नसून आमच्या बालबुद्धीचाच तो कमीपणा आहे. देवा ! तू विश्वसाक्षी आहेस. कोणत्याही देशात व कोणत्याही कालात अंधारात व उजेडात केलेले सर्व अपराध तू प्रत्यक्ष जाणणारा आहेस. तुझ्यापुढे आमचे अपराध लपविता येणे शक्यच नाही व आमची शरीरइन्द्रियादि साधने तर आमची इच्छा नसताना सुद्धा अपराध करतात. आम्ही अगदी परतंत्र आहोत. या इन्द्रियांपुढे आमचे काहीच चालत नाही. जे नको असते तेच ती इन्द्रिये

करतात. जन्मजन्मांतरात ती इन्द्रिये तेच करत आली आहेत. बरे, इन्द्रियादिकांचा मालक तू असून तू निष्ठुर आहेस असेही म्हणणे गैर आहे. श्रुती, स्मृती, संत सर्वजण, तू दयासागर आहेस असेच म्हणतात. आमच्या मनाविरुद्ध काही गोष्टी किंवा शिक्षा मालक या नात्याने तू करीत असलास तरीं ते आमच्या कल्याणाकरताच असल्याने तुला निष्ठुर म्हणणे वेडगळपणाचेच होईल. ''आईने मुलाचे दोष जाण्याकरता त्याला शिक्षा केली तर मुलाने तिला निष्ठुर म्हणणे योग्य आहे का ?'' असे विचारले असता योग्य नाही हेच उत्तर बरोबर आहे. दोषी मुलाचे दोष जाण्याकरिता आई जर बाहेरून निष्ठुरपणा न दाखवील तर त्या मुलाची अधोगतीच होईल. तू आता दयेने परिपूर्ण असून नाटकात काम करणाऱ्या नटाप्रमाणे कोप दाखवितोस. आत कोपाला जागाच नाही. दया व कोप दोन्ही एकठिकाणी राहूच शकत नाहीत. कोप खोटा व दया खरी. दोरीवर दिसणारा साप खोटा व दोरी खरी. तरी दिसणाऱ्या कोपाचा लेश खोटा व दयासमुद्र हा खरा. प्रभू ! सर्वसाक्षी व दयासागर म्हणजे सर्व अपराध प्रत्यक्ष जाणून त्या सर्वांची क्षमा करण्यास समर्थ व दयासागर असे तुझे ब्रीद असल्याने माझेकडून शरीर, वाणी व मन इत्यादिकांनी झालेले अनंत अपराध आहेत व तू हरी म्हणजे अज्ञान, पाप अपराध या सर्वांचे हरण म्हणजे नाश करणारा आहेस. माणसाकडून काही पापे किंवा अपराध ज्ञानपूर्वक होतात. इंद्रिये त्याच्या स्वाधीन नसल्याने अमूक गोष्ट केली, म्हणजे अपराध होतो किंवा पाप लागते हे शास्त्रज्ञाकडून जाणले असूनही ती गोष्ट त्याच्याकडून होते. याला जाणून केलेले अपराध म्हणतात. या अपराधाला शिक्षाही अधिक आहे. ज्याप्रमाणे जाणून केलेल्या सत्कर्माचे फळ अधिक आहे, तसे जाणून केलेल्या अपराधाचे फळही अधिक आहे. काही कर्मे त्या कर्माचे फळ न जाणता माणसाकडून होतात. त्याचे फळ थोडे कमी असते. परंतु फळ मिळणारच. 'ज्ञात्वाऽज्ञात्वाच कर्माणि' म्हणजे जाणून किंवा न जाणून कर्मे करतो व त्या योगाने तो कर्मांनी बांधला जातो असे शास्त्र आहे. माझ्याकडून या जन्मात व पूर्वीच्या अनंत जन्मांत जाणून न जाणून अनंत अपराध झालेले आहेत. त्या सर्व अपराधांची क्षमा करणारा तुझ्यावाचून मला दुसरा कोणी नाही. तरी हे दयासागरा ! दत्तगुरो ! माझ्या सर्व अपराधांची तू क्षमा कर. अशी अनन्यभावाने माझी तुझ्या चरणाजवळ प्रार्थना आहे.

## श्लोक नववा

**स्मृतो ध्यात अवाहितोऽस्यर्चितो वा, न गीतः स्तुतो वंदितो वा न जप्तः ।**

**क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त ॥९॥**

**अन्वय :** हे क्लिन्नचित्त प्रभो (त्वं) मया न स्मृतः, न ध्यातः, न आवाहितः, न अर्चितः, न गीतः,न स्तुतः, न वंदितः,न वा जप्तः, (असि, अतस्तं)अपराधं क्षमस्व ॥९॥

**विवरण :** स्वतः सच्चिदानन्दस्वरूप असूनही भक्तांच्या प्रेमासाठी व त्यांच्या उद्धारासाठी शंखचक्रगदापद्मादिकांनीयुक्त दिव्य मेघश्याम मनोहर असे सगुणरूप धारण करणाऱ्या भगवान् विष्णूचे श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य व आत्मनिवेदन इत्यादी नऊ प्रकाराने भजन करून ते भगवंताला अर्पण करणे म्हणजे निष्कामपणे भक्ती करणे याला उत्तम प्रकारचे अध्ययन म्हणतात; असे भागवतोत्तम प्रल्हादाचे सांगणे आहे. प्रल्हादाने स्वतः या नवविधभक्तीचे अनुष्ठान करून या भक्तीचा अनुभव घेऊन हे सांगितले आहे. हे त्याच्या चरित्रावरून उघडच आहे. मनुष्याला प्रपंचात व परमार्थातही उत्तम प्रकारचे सुख पाहिजे असेल तर त्यांनी निष्कामपणे हे भजन करावे म्हणजे आपल्या कल्पनेत सुद्धा नसलेली सुखे परमात्मा देतो व कल्पनेतसुद्धा नसलेल्या दुःखांचा तो परिहार करतो. कारण तोच परमात्मा विष्णू, खरा श्रीमंत व दयासमुद्र आहे. याचक, चातक व मासा, श्रीमंत, मेघ व समुद्र यांच्याजवळ आपल्या क्षुद्र याचनेनेच मागणार. अधिक मागण्याची त्याला सवयच नाही व तो मागू शकत नाही. याकरिता आपण न मागताच त्यांची सेवा करावी म्हणजे देणारा सर्वसमर्थ असल्याने तो आपल्या योग्यतेप्रमाणे देणार म्हणजे आमच्या दृष्टीने अपरिमित देणार, म्हणून निष्काम भजन फार चांगले. त्यात आपला अतिशय फायदा आहे. हे तत्त्व न समजल्याने माणसे कामनिक भजन करतात व क्षुद्र मागण्या करतात. त्यामुळे त्यांचे फार नुकसान होते. ही निष्काम नवविधा भक्ती संपादन करणे म्हणजेच त्याने सर्वांत उत्तम अध्ययन केले असे होते व संत हेच अध्ययन आपल्या संगतीत आलेल्या साधकांना शिकवितात व त्यांना कृतार्थ करतात. पुनः मागण्याचा प्रसंगच येऊ नये. मागणेच बंद व्हावे अशी काही जादू ते करतात. 'रसोऽप्यस्यपरंदृष्टवा निवर्तते' म्हणजे मागण्यास कारण जी वस्तुविषयी गोडी असते तीच ते नाहीशी करतात. असे या निष्काम भजनाचे किंवा

उत्तम अध्ययनाचे फळ आहे. आवड किंवा 'रस' म्हणजे इतर सर्व सोडून त्या ठिकाणीच प्रेम असणे 'बहुत सुकृताची जोडी म्हणुनी विठ्ठली आवडी' असे संत म्हणतात. अनेक जन्मांतील सुकृते फलोन्मुख झाली म्हणजेच परमात्म्याविषयी आवड उत्पन्न होते व मग त्याचे हे सर्वदा नवविधप्रकारांपैकी काही, किंवा अधिकारानुरूप नऊही प्रकारचे भजन त्यांच्याकडून निष्कामपणे होते व तो कृतार्थ होतो. निरिच्छ होतो. अकामहत होतो. असे या भजनाचे महत्त्व आहे. 'प्रजहातियदाकामान् सर्वान् पार्थ मनोगतान्' असे जे स्थितप्रज्ञाचे लक्षण आहे, ते त्याच्या ठिकाणी प्रकट होते. व 'स्वभावोभजनं हरेः' म्हणजे हरीचे भजन करणे हाच त्याचा स्वभाव होतो. हरण झालेला हरिपणा पुनः त्याला मिळतो. एवढे ऐश्वर्य देवा तुझ्या भजनात आहे. परंतु मी या नवविध भजनांपैकी एकसुद्धा भजन केले नाही. देवा ! तुझे स्मरण करणे काही कठीण आहे काय ? द्विभुज, चतुर्भुज, षड्भुज, 'काऽपि' म्हणजे कोणतीही साकार मूर्ती शाईने कागदावर काढलेली, तांब्याची, पितळेची, चांदीची, सोन्याची इत्यादी कोणतीही असली तरी त्यात तू आहेसच. तू सर्वात्मक व सर्व व्यापक आहेस. त्या मूर्तीपुढे बसून डोळे अर्धे उघडे ठेवून किंवा डोळे मिटून कसेही तुझे स्मरण किती सुलभपणे होते. परंतु माझ्याकडून ते झाले नाही. 'न स्मृतः।' तुझे भक्तांनी केलेले स्मरण तुला फार आवडते असे मी ऐकले आहे. तू 'स्मर्तृगामी' म्हणजे स्मरण करणाऱ्याजवळ तात्काळ येणारा व त्याचेजवळ राहणारा असा आहेस. तूच स्मरण करणाऱ्याजवळ जातोस. स्मरण करणाऱ्याला तुझ्याकडे येण्याचे कारण नाही. गजेन्द्र, द्रौपदी, प्रल्हाद इत्यादी भक्तांकडे तू गेलास. त्या भक्तांना तुझ्याकडे यावे लागले नाही. आपले घरदार सोडून स्मरण करणाऱ्या भक्तांकडे सहकुटुंब सहपरिवार जाऊन राहाणाऱ्यास, छापलेली लग्नाची किंवा मुंजीची पत्रिका वाचून सहकुटुंब तेथे जाण्याऱ्या उपाध्यायाप्रमाणे तुला वेडगळ म्हणावे काय ? उपाध्याय बरा. कारण यजमानाकडून पुढे त्याला लाजेने का होईना, काही तरी द्रव्यलाभ होतो परंतु तुला तसा काही लाभ न होताही तू स्मरण करणाऱ्याकडे जातोस व तुला त्याच्याकडून काही अपेक्षाही नसते. कारण तू निरपेक्ष आहेस. देवा मी जर तुझ्यासारखा निरपेक्ष असतो तर त्यांनी कितीही माझे स्मरण केले असते तरी मी त्यांच्याकडे कधीच गेलो नसतो. आपले सुखसमाधान टाकून अशा दरिद्री झोपडीवाल्याच्या झोपडीमध्ये कोण जाईल ? परंतु तू 'स्मर्तृगामी' आहेस. म्हणजे तुला मी काही द्यायला नको. दिले तरी तुला ते नको असते. कारण तू परिपूर्ण आहेस; असे सर्व

मला माहीत असूनही मी एकदाही तुझे स्मरण केले नाही. स्मरण ही फार मोठी भक्ती आहे. प्रपंचात किंवा परमार्थात स्मरणाची फारच आवश्यकता आहे. आपण एखाद्याला कर्ज दिले व दिलेले कर्ज आपण जर विसरलो तर प्रपंचात केवढा घोटाळा होईल बरे ? कदाचित दिलेले कर्ज कागदावर त्याच्या सहीने लिहून ठेवले असेल तर ते कर्ज परत मिळेल परंतु ते कागद कोठे ठेवलेत हे जर आपण विसरलो तर पुनः घोटाळाच. यावरून स्मरण हे प्रपंचात अत्यंत उपयोगी आहे. मग परमार्थ तर स्मरणावरच चालणारा असल्याने स्मरणाची गरज किती आहे, हे सांगण्याचे कारणच नाही. स्मरण ही भक्ती श्रवण, कीर्तन इत्यादी आठ भक्तींचे मूळ कारणच आहे. स्मरणाशिवाय कोणतीही भक्ती होऊ शकत नाही. आम्ही कीर्तन श्रवणास गेलो व हरिदासाने निरूपणास सुरुवात केली. परंतु आम्हाला त्यांच्या शब्दाचा अर्थच जर स्मरला नाही तर श्रवण कसे घडणार ? हरिदासांची भाषा जाणणारा श्रोता व न जाणणारा श्रोता दोघेही एकसारखेच म्हणजे अज्ञानीच राहणार. याप्रमाणे स्मरणाहून इतर जे आठ प्रकार आहेत त्या सर्वांस स्मरणाची गरज आहे. म्हणून स्मरणभक्ती ही आठही भक्तीला व्यापून राहिली आहे. असे या स्मरणाचे महत्त्व आहे. दत्तमाहात्म्यात स्मरणभक्ती ही आठ भक्तीला व्यापून राहिली आहे असे प.पू. महाराजांनी सांगितले आहे. ती स्मरणभक्ती माझ्याकडून झाली नाही. अर्थातच स्मरणाने साध्य होणारे ध्यान-गान म्हणजे आवाहन म्हणजे तुला पूजेकरता बोलावणे, अर्चन म्हणजे तुझी पूजा करणे, तुझ्या स्वरूपाचे गायन करणे, तुझी स्तुती करणे, तुला वंदन करणे, म्हणजे इतर विषय वगळून तुझेच चिंतन करणे. तुझ्या नामाचा वारंवार उच्चार करणे ते मोठ्याने किंवा हळूहळू अथवा मनातच म्हणणे म्हणजे जप करणे यांपैकी माझ्याकडून काहीच घडले नाही. या नऊ प्रकारच्या भक्तींपैकी एक भक्ती जरी साध्य झाली, तरी साधक भगवत्स्वरूप होऊन कृतार्थ होतो. मग नवविधाभक्ती करणारा कृतार्थ होईल यात शंकाच नाही. प्रातःस्मरणीय महाराजांनी दत्तमाहात्म्य ग्रंथातील पहिल्या अध्यायातच याचे विवेचन केले आहे. ते त्यांच्या शब्दातच येथे देत आहे. अधिक जिज्ञासूने महाराजांचा दत्तमाहात्म्य हा प्राकृत ओवीबद्ध ग्रंथ वाचावा म्हणजे सर्व खुलासा होईल. महाराज म्हणतात –

**जरी पाहिजे मुक्ती । तरी आदरावी नवविधाभक्ती ।**
**जिणे येथे मिळेल भुक्ती । अंती मुक्ती अनायासे ॥**

भक्ती म्हणजे या लोकातील व पर म्हणजे स्वर्गादी लोकातील शरीरेन्द्रिय

विषयजन्य सर्व सुखे, ज्या सुखाला अभ्युदय म्हणतात ती सर्व सुखे व मुक्ती म्हणजे आपण मुळातच स्वतः ईश्वरस्वरूप असून अज्ञानाने जीवपणाला प्राप्त झालो आहोत, तो अज्ञानाने आरोपित केलेला जीवपणा ज्ञानाने दूर फेकून देऊन मूळचेच असलेले ईश्वरपण प्राप्त करून घेणे, ज्याला निःश्रेयस असे म्हणतात. या दोन्हीपेक्षा आणखी मागण्याचे काही राहातच नाही. म्हणजे भुक्ती व मुक्ती यामध्ये सर्व पुरुषार्थ आले. या सर्वांचे साधन नवविधाभक्ती आहे. यांपैकी एकेक भक्तीने भुक्ती व मुक्ती मिळविणारे कोण कोण आहेत हे महाराजांनी प्रथमाध्यायातच सांगितले आहे.

''स्मरण आणि वंदन । सख्य-सेवन आणि अर्चन । दास्य-श्रवण कीर्तन । सर्वनिवेदन नवविधाभक्ती ।।१३।। कार्तवीर्ये केली स्मरणभक्ती । अलर्काने वंदनभक्ती । आयुराजाने दास्यभक्ती । सख्यभक्ती परशुरामें ।।१४।। विष्णुदत्तें केले सेवन । यदूने केले अर्चन । वेदधर्मे केले कीर्तन । दीपकें श्रवण श्रीदत्ताचे ।।१५।। सर्व-स्वात्मनिवेदन । कित्येक भक्तांनी करून । श्रीदत्तीं तल्लीन होऊन । निर्वाणस्थान घेतले ।।१६।। भक्ती ज्ञानाची माउली । करी कृपेची साउली । जिणे नामरूपा आणिली । ब्रह्ममूर्ती भली अनायासे ।।१७।। निर्विशेष परब्रह्म । साक्षात्कार करतां श्रम । घडे मंदां त्याचा भ्रम । वारी हे क्रम दाऊनी ।।१८।। सगुणब्रह्मध्यानें मन । शीघ्र होई सावधान । मग निरस्तोपाधिकल्पन । आत्मज्ञान स्फुरतसे ।।१९।।

अधिक जिज्ञासूंनी प.पू. प्रातःस्मरणीय श्रीमद्वासुदेवानंद सरस्वतीकृत प्राकृत दत्तमाहात्म्य वारंवार वाचावे म्हणजे चित्ताचे समाधान होईल. दयाघन दत्तादेवा ! हे सर्व मला कळत असूनही माझ्या दुर्दैवामुळे मला तुझी एकही भक्ती घडली नाही. तरी या घोर अपराधाची क्षमा कर व माझ्या हातून इतर भक्तांप्रमाणे एखादी तरी भक्ती घडावी अशी माझी कळवळून प्रार्थना आहे ।।९।।

## श्लोक दहावा

**दयाब्धिर्भवादृक् न सागाश्च मादृक् भवत्याप्तमंतोर्भवान् मे शरण्यः ।**
**यथालम्बनं भूर्हि भूनिःसृतांघ्रेरितिप्रार्थितं दत्तशिष्येण सारम् ।।१०।।**
**।। इत्यपराधक्षमापनस्तोत्रं संपूर्णम् ।।**

**अन्वय :** हे प्रभो दत्तगुरो, 'भवादृक् दयाब्धिर्न मादृक् सागाश्च न, (अतः) भवत्याप्तमंतोर्मे भवान् शरण्यः (अस्ति) भूनिःसृतांघ्रेः हि भूः यथाऽऽलंबनं भवति (तया) इति दत्तशिष्येण सारं प्रार्थितम् ।।१०।।

**विवरण :** शेवटी प्रार्थनेच्या उपसंहारात परमपूज्य प्रातःस्मरणीय महाराज

म्हणतात, हे प्रभो ! जगदीश दत्तगुरो ! या अनंतकोटी ब्रह्मांडात आपल्यासारखा दयासागर दुसरा कोणी नाही. सागरातील पाणी कितीही घेतले तरी सागर कोरडा होत नाही. तद्वतच तुम्ही असंख्य भक्तांवर जरी दया केली तरी आपल्या जवळची दया संपतच नाही. म्हणून आपल्या दयेला सागराची उपमा दिली आहे. सागरातील पाणी घेऊनच नद्या, तलाव, विहिरी वगैरे जलयुक्त होतात व पुनः तेच पाणी सागरात जाऊन मिळते. त्यामुळे सागर हा सर्वदा परिपूर्ण असतो. त्याप्रमाणे आपल्यापासून दया घेऊन लोकांवर दया करणारे साधुसंत आपल्याच स्वरूपात ऐक्याने प्रवेश करणारे असल्याने आपण सर्वदा परिपूर्ण दयासमुद्र आहात. म्हणूनच आपल्यासारखा दयासागर अनंतकोटिब्रह्माण्डात दुसरा कोणी नाही. जगातील सर्व पाणी समुद्रातच असते. म्हणूनच सागराला 'अब्धि' म्हणजे जलाचा साठा असे म्हटले आहे. जगात जे दयावान् लोक आहेत ते आपल्यापासून दया घेऊनच दयावान् झाले आहेत. म्हणूनच आपण दयासागर आहात. आपण जसे दयासागर आहात तसेच माझ्यासारखा अपराधी म्हणजे (सागा म्हणजे अपराधयुक्त) या अनंतकोटिब्रह्माण्डात दुसरा कोणी नाही. म्हणजे आपण जसे अद्वितीय दयासागर आहात, तसा मीही अद्वितीय अपराधयुक्त आहे. आपण दयेविषयी अद्वितीय व मीही अपराध करण्याविषयी अद्वितीय म्हणून अद्वितीयपणात माझे व आपले साम्य आहे; म्हणजे साजात्य आहे. सजातीयाने सजातीयावर उपकार करावा असा अनादि कालापासून नियम चालत आला असल्याने आपण माझ्यावर दया करणे हे न्यायानेच प्राप्त आहे. आपण न्यायप्रिय असल्याने न्याय टाकणार नाही अशी माझी खात्री आहे. आपण नवविध भक्तीचा धडा घालून दिला व त्याची सर्व साधनेही खुली करून दिली, असे असताही मी त्यातील एकही साधन केले नाही. सर्वांत सुलभ असे 'नामस्मरण'ही मी केले नाही. हा आपला मोठा अपराध मी केला आहे. जमिनीवर अनवधानाने पाय घसरून पडणाऱ्याला आधार शेवटी जमीनच असते. तसे आपल्याविषयी अपराध करून अधोगतीला जाणाऱ्याला सुद्धा आधार आपणच आहात. अधोगती, ऊर्ध्वगती व तिर्यग्गती हे सर्व आपलेच स्वरूप आहे. 'सकलमिदमहंचवासुदेवः' म्हणजे हे सर्व जगत् व मी, सर्व आपले वासुदेव स्वरूपच आहे असे आपणच म्हणता. 'गतिस्त्वं गतिस्त्वं त्वमेका भवानि' असे पूज्यपाद भगवान् शंकराचार्यचरणांनी मातृरूपाने आपले वर्णन केले आहे. ते अगदी त्रिवार सत्य आहे. म्हणून नऊश्लोकरूप सर्व शास्त्राचे साररूप हे अपराधक्षमापन स्तोत्र आपल्या आज्ञाधारक शिष्याने म्हणजे आपली आज्ञा पालन

करण्यास योग्य झालेल्या वासुदेवानंदसरस्वतीने केले आहे. तरी ते ऐकून त्याप्रमाणे माझ्यावर व इतरांवरही कृपाप्रेमाचा वर्षाव करून आम्हा सर्वांना आपल्या स्वरूपाची असणारी अखंड शान्ती आमच्या सर्व अपराधाची क्षमा करून आपण द्यावी अशी अनन्यभावाने आपल्या चरणी आम्हा सर्वांची प्रार्थना आहे. आपण परम उदार दयासागर आहात. इति शिवम् ॥

**॥अपराधक्षमापन स्तोत्रं संपूर्णम् ॥**

❖❖❖

# (१४२) श्रीदत्तात्रेयकवचम् ॥

श्रीपादः पातु मे पादावूरू सिद्धासनस्थितः ॥
पायाद्दिगंबरो गुह्यं नृहरिः पातु मे कटिं ॥१॥
नाभिं पातु जगत्स्रष्टोदरं पातु दलोदरः ॥
कृपालुः पातु हृदयं षड्भुजः पातु मे भुजौ ॥२॥
स्रक्कुंडीशूलडमरुशंखचक्रधरः करान् ॥
पातु कंठं कंबुकंठः सुमुखः पातु मे मुखम् ॥३॥
जिह्वां मे वेदवाक्पातु नेत्रे मे पातु दिव्यदृक् ॥
नासिकां पातु गंधात्मा पातु पुण्यश्रवाः श्रुती ॥४॥
ललाटं पातु हंसात्मा शिरः पातु जटाधरः ॥
कर्मेंद्रियाणि पात्वीशः पातु ज्ञानेंद्रियाण्यजः ॥५॥
सर्वांतरोंतःकरणं प्राणान्मे पातु योगिराट् ॥
उपरिष्टादधस्ताच्च पृष्ठतः पार्श्वतोऽग्रजः ॥६॥
अंतर्बहिश्च मां नित्यं नानारूपधरोऽवतु ॥
वर्जितं कवचेनाव्यात्स्थानं मे दिव्यदर्शनः ॥७॥
राजतः शत्रुतो हिंस्राद् दुष्प्रयोगादितोघतः ॥
आधिव्याधिभयार्तिभ्यो दत्तात्रेयः सदावतु ॥८॥
धनधान्यगृहक्षेत्रस्त्रीपुत्रपशुकिंकरान् ॥
ज्ञातींश्च पातु नित्यं मेऽनसूयानंदवर्धनः ॥९॥
बालोन्मत्तपिशाचाभोद्युनिट्संधिषु पातु मां ॥
भूतभौतिकमृत्युभ्यो हरिः पातु दिगंबरः ॥१०॥

य एतद्दत्तकवचं संनह्याद्भक्तिभावितः ।।
सर्वानर्थविनिर्मुक्तो ग्रहपीडाविवर्जितः ।।११।।

भूतप्रेतपिशाचाद्यैर्देवैरप्यपराजितः ।।
भुक्त्वात्र दिव्यभोगान्स देहांते तत्पदं व्रजेत् ।१२।।

**इति श्री प.प. श्रीवासुदेवानंदसरस्वतीविरचितं**
**श्रीदत्तात्रेयकवचं संपूर्णम् ।।**

✿ ✿ ✿

# सार्थ श्रीदत्तात्रेय-कवचम्

**विवेचक - कै. ब्रह्मश्री पंडित आत्मारामशास्त्री जेरे, ठाणे**

**प्रस्तावना :** प्रातःस्मरणीय परमपूज्य श्रीदत्तावतार प.प. श्रीमद्वासुदेवानंद सरस्वती श्रीचरणांच्या स्तोत्रादि संग्रहातील 'श्रीदत्तात्रेयकवच' हे १४२ वे स्तोत्र आहे. स्तोत्र फार प्रभावशाली आहे. मी अमळनेरास असताना तेथील एका भाविक मराठ्याला स्वप्नात कोणी तरी दत्तकवचाचे अनुष्ठान कर असा आदेश दिला. जेरेशास्त्री नरसोबाचे वाडीस दत्तमहाराजांच्या पुजाऱ्यांपैकी आहेत, त्यांना विचारले असता दत्तकवचाची माहिती मिळेल व अनुष्ठान करता येईल, असे गृहस्थांना वाटून दुसरे दिवशी माझ्याकडे ते आले व मला म्हणाले, "माझी परिस्थिती खालावली आहे. मी चिंताग्रस्त आहे. अशा अवस्थेत मला स्वप्नात दत्तकवच अनुष्ठानाचा आदेश झाला आहे. तरी मला हे कवच मिळाल्यास मी त्याचे अनुष्ठान करीन." प.पू. महाराजांच्या स्तोत्रसंग्रह-द्वितीय पुष्पात नित्योपासना क्रमात हे कवच आहे हे मला माहीत असल्याने त्यांना मी ते लिहून दिले. त्यांनीही मोठ्या भक्तीने औदुंबराच्या वृक्षाखाली बसून या कवचाचा जप सुरू केला. थोड्याच दिवसांत त्यांची परिस्थिती सुधारून ते आनंदी झाले व माझ्याकडे पुनः येऊन कवचानुष्ठानाने माझे फार कल्याण झाले, आता हे अनुष्ठान मी निरंतर करीतच राहणार, असे म्हणाले. उत्तरोत्तर त्यांचा आनंद वाढतच गेला व अद्यापि ते गृहस्थ कवचाचे अनुष्ठान करीत

आहेत व सुखी आहेत.

हे दत्तकवच जो धारण करील व त्याचे अनुष्ठान करील तो सर्व अनर्थांपासून मुक्त होईल. शनिमंगळ इत्यादी ग्रहांची पीडा त्याला होणार नाही. भूत-प्रेत-पिशाच व देवसुद्धा त्याला पीडा करू शकणार नाहीत किंवा त्याचा पराजय करू शकणार नाहीत. या भूलोकात सुद्धा कवच धारण करणाऱ्याला म्हणजे अनुष्ठान करणाऱ्याला स्वर्गातील भोगासारखे उत्तम भोग मिळतील व मरणानंतर दत्तपदाला म्हणजे मुक्तीला तो प्राप्त होईल, असे फल या कवचाचे महाराजांनी सांगितले आहे. भावभक्तीने अनुष्ठान करणाऱ्याला मिळालेले येथील फळ मी प्रत्यक्ष पाहिलेले वर लिहिलेच आहे. प्रपंच व परमार्थ दोन्हीही गोष्टी उत्तम प्रकारे होण्याचे हे अपूर्व साधन टेंबेस्वामीमहाराजांनी म्हणजे दत्तमहाराजांनीच आपणा सर्वांना दिले आहे. महाराजांची वाणी अमोघ आहे. तरी विश्वास ठेवून ऐहलौकिक व पारलौकिक म्हणजे अभ्युदय व निःश्रेयस दोन्हीही प्राप्त करून घ्यावे. नुसत्या मंत्रानुष्ठानापेक्षा अर्थ समजून केलेल्या अनुष्ठानाचे फार फळ आहे व संस्कृत न जाणणाऱ्यांनाही सार्थ अनुष्ठान करता यावे म्हणून त्याचे भाषांतरही येथे दिले आहे. तरी त्याचा फायदा प्रपंच व परमार्थ दोन्ही साधण्याची इच्छा असणाऱ्याने करून घ्यावा व दुसऱ्यालाही तो द्यावा अशी प्रार्थना आहे. माणसाने स्वार्थ व परार्थातही तत्पर असावे म्हणजे दत्तमहाराज त्याचे परम कल्याण करतात.

यथाधिकार स्नान, आचमन, प्राणायाम इत्यादी करून 'ममसर्वानर्थनिरसनपूर्वक परमकल्याणसिध्यर्थं श्रीदत्तात्रेयप्रीत्यर्थं दत्तकवचजपमहं करिष्ये'असा संकल्प करून शुचिर्भूतपणे एकांतात आसनावर बसून जप करावा. औदुंबराच्या झाडाखाली जागा मिळाल्यास फारच चांगले. कारण औदुंबराखाली श्रीदत्तमहाराजांचे वास्तव्य असते. औदुंबराला 'तू कल्पवृक्ष हो' असा आशीर्वाद नृसिंह अवतारात दत्तमहाराजांनी दिला आहे. अनुभव घेऊन पहावे.

श्रीदत्तात्रेयकवचाच्या प्रत्येक श्लोकात वेगवेगळ्या नावाने वेगवेगळ्या शरीराच्या अवयवांचे रक्षण करण्याविषयी दत्तात्रेयांची प्रार्थना आहे. पायापासून मस्तकापर्यंत सतरा अवयवांच्या रक्षणाकरिता साडेचार श्लोकांनी प्रार्थना केली आहे. साडेचारपासून सात श्लोकांपर्यंत कर्मेंद्रिये- ज्ञानेंद्रिये, अन्तःकरण, पाच किंवा दहा प्राणापानादिवायू वरती व खालती, पाठीमागे व पुढे, आत व बाहेर कवचात न आलेले शरीराचे भाग

व घराच्या आत व बाहेर असलेली स्थाने यांच्यापासून माझे रक्षण व्हावे अशी प्रार्थना आहे. नंतरच्या दहा पर्यंतच्या श्लोकांत राजा, हिंस्त्रप्राणी, दुष्टांनी केलेले जारणमारणादी प्रयोग, पाप, आधी, व्याधी, भय व पीडा यांच्यापासून दत्तात्रेय माझे रक्षण करो असे आठव्या श्लोकात म्हटले आहे. नवव्या श्लोकात धन-धान्य-घर-शेत-स्त्री-पुत्र-पशु-सेवक व कुटुंबातील इतर लोक यांचे दत्त भगवान् रक्षण करो असे म्हटले आहे. दहाव्या श्लोकात दिवसा, रात्री व संधिकाली पंचमहाभूते (आकाशादि) व त्यांच्यापासून निर्माण झालेले पदार्थ यांच्यापासून व मृत्यूपासून भगवान् दत्तात्रेय आमचे रक्षण करो असे म्हटले आहे. पुढच्या १२ पर्यंत दोन श्लोकांत कवच जप करणाऱ्याला काय लाभ होतो ते दाखविले आहे. असे हे बारा श्लोकांचे दत्तकवच आहे. युद्धात कवच घातले जसे म्हणजे शत्रूपासून, त्याच्या अंगाला शस्त्रांची पीडा होत नाही, तसेच हे कवच निरंतर धारण करणाऱ्याला कोणापासूनही पीडा होत नाही. इतकेच नव्हे तर इहलौकिक विद्यमान स्थळी व विद्यमान कालात स्वर्गातील भोगाप्रमाणे भोग व मरणानंतर दत्तपदप्राप्ती म्हणजे मोक्षही मिळतो असे वर्णन केले आहे. महाराजांचे वाक्य त्रिकाली खरे होणारे असते. कारण ते स्वतः दत्तरूप आहेत. प्रत्येकाच्या सर्व कामना या कवच-जपाने होतात. यापेक्षा अधिक काय सांगावे ? असा एकंदरीत मथितार्थ आहे. आता श्लोकाचा त्रोटक अर्थ प्रत्येक श्लोक देऊन करू.

**श्रीदत्तकवच विवरण प्रारंभ –**

**श्रीपादः पातु मे पादावूरू सिद्धासनास्थित ।**
**पायाद्दिगंबरो गुह्यं नृहरिः पातु मे कटिम् ॥१॥**

**अर्थ :** श्री म्हणजे लक्ष्मी ज्याच्या पायाचा आश्रय निरन्तर करून रहाते तो श्रीपाद-दत्तात्रेय माझ्या पायाचे रक्षण करो. सिद्धासन घालून बसलेला दत्तात्रेय माझ्या मांड्यांचे रक्षण करो. दिगंबर म्हणजे दिशा हेच ज्याचे वस्त्र आहे असा म्हणजे नग्न, अवधूतवेष धारण करणारा दत्तात्रेय माझे गुह्य म्हणजे विसर्जन करणारे गुद व जननेंद्रिय यांचे रक्षण करो. माझ्या कंबरेचे रक्षण नृहरि-दत्तात्रेय करो.

**नाभिं पातु जगत्स्रष्टोऽदरं पातु दलोदरः ।**
**कृपालुः पातु हृदयं षड्भुजः पातु मे भुजौ ॥२॥**

**अर्थ :** सर्व जगाला निर्माण करणारा म्हणजे ब्रह्मदेव हे रूप धारण करणारा दत्तात्रेय माझ्या नाभीचे म्हणजे बेंबीचे रक्षण करो. ब्रह्मदेव नाभीपासून उत्पन्न झालेले

असल्याने तेच नाभीचे रक्षण करोत. पिंपळाच्या पानाप्रमाणे पातळ उदर म्हणजे पोट असणारे दलोदर-दत्तात्रेय माझ्या उदराचे रक्षण करोत. कृपालु म्हणजे कृपाशील दत्तात्रेय माझ्या हृदयाचे रक्षण करोत. सहा हात असणारे षड्भुज दत्तात्रेय माझ्या भुजांचे रक्षण करोत. षड्भुजाला दोन भुजांचे रक्षण करणे सहज शक्य आहे.

**स्रक्कुंडी-शूल डमरू-शंख-चक्र-धरः करान् ।**

**पातु कंठं कंबुकंठः सुमुखः पातु मे मुखम् ॥३॥**

**अर्थ :** सहा हातांनी माला-कमंडलू-त्रिशूल-डमरू-शंख व चक्र धारण करणारे दत्तात्रेय माझ्या हाताचे रक्षण करोत. कंबू म्हणजे शंख. त्या शंखाप्रमाणे ज्यांचा कंठ आहे ते दत्तात्रेय माझ्या कंठाचे म्हणजे गळ्याचे रक्षण करोत. सुंदर मुख असणारे दत्तात्रेय माझ्या मुखाचे रक्षण करोत. या श्लोकात 'करान्' पातु म्हणजे अनेक हातांचे रक्षण करोत असे बहुवचन घातले आहे. माणसाला दोनच हात असताना बहुवचन का घातले अशी शंका येते. परंतु सहस्रार्जुनाला हजार हात होते इतर कोणास अधिक हात असल्यास बहुवचन सार्थक होते. शिवाय लग्न झाल्यानंतर पुरुषाला चतुर्भुज झाला असे म्हणतात. पती व पत्नी एकरूपच असतात. तेव्हा पुरुषाला पत्नीचे दोन हात घेऊन चार हात होतात व पत्नीलाही पतीचे दोन हात घेऊन चार हात होतात. याप्रमाणे बहुवचनाची संगती लागते. 'करौ' असा पाठ मूळ प्रतीत असल्यास प्रश्नच नाही. ॥३॥

**जिव्हां मे वेदवाक् पातु नेत्रे मे पातु दिव्यदृक् ।**

**नासिकां पातु गंधात्मा पातु पुण्यश्रवाः श्रुती ॥४॥**

**अर्थ :** सर्व वेद ज्या विराटस्वरूप दत्तात्रेयाचे वागिंद्रिय आहे तो माझ्या जिभेचे रक्षण करो. ज्याची दृष्टी दिव्य म्हणजे भूत, वर्तमान भविष्य सर्व कालातील सर्व पदार्थांना प्रत्यक्ष पाहाणारी आहे, असा सर्वदर्शी दत्तात्रेय माझ्या दोन्ही डोळ्यांचे रक्षण करो. ज्याचे शरीर सर्वदा व स्वभावतःच सुगंधी आहे व जो गंधरूप आहे, असा दत्त माझ्या नाकाचे रक्षण करो. ज्याच्या स्वरूपाचे व गुणांचे श्रवण पुण्यकारक आहे तो दत्त माझ्या दोन्ही कानांचे रक्षण करो. ॥४॥

**ललाटं पातु हंसात्मा शिरः पातु जटाधरः ।**

**कर्मेन्द्रियाणि पात्वीशः पातु ज्ञानेन्द्रियाण्यजः ॥५॥**

**अर्थ :** विषयात चित्त गुंतलेले असते व चित्तात विषय भरलेले असतात,

तरी विषयातून चित्त व चित्तापासून विषय कसे काढावे, असा प्रश्न ब्रह्मदेवाला पुढे करून सनत्कुमारादि चौघा सिद्धांनी केला असता; माझ्या निरंतर चिंतनाने जीव मत्स्वरूप झाला म्हणजेच चित्तातून विषय व विषयातून चित्त बाजूला होईल; असे ब्रह्मदेवाला सुद्धा न सुचणारे उत्तर हंसावतारात दत्तात्रेयांनी देऊन सनत्कुमारादि सिद्धांना समाधान दिले. तो हंसरूप-दत्तात्रेय माझ्या ललाटाचे रक्षण करो. जटा धारण करणारा दत्तात्रेय, माझ्या मस्तकावर जटा नसल्या तरी जटाधारित्वाच्या योगाने माझ्या मस्तकाचे रक्षण करो. सर्वांचा ईश म्हणजे मालक असणारा दत्तात्रेय वाणी, जननेन्द्रिय, गुद, हात व पाय अशा पाच कर्मेंद्रियांचे रक्षण करो. अज म्हणजे जन्मरहित असणारा अर्थात् जन्मानंतरचेही विकार नसणारा दत्त डोळे, नाक, कान, जीभ व त्वगिंद्रिय-म्हणजे स्पर्श जाणणारे इंद्रिय-अशा पाच ज्ञानेंद्रियांचे रक्षण करो.।।५।।

**सर्वांतरोतःकरणं प्राणान्मे पातु योगिराट् ।**
**उपरिष्टादधस्ताच्च पृष्टतः पार्श्वतोऽग्रतः ।।६।।**

**अर्थ :** सर्वांच्या आत राहणारा-म्हणजे सर्वान्तर-ज्याच्याहून आत दुसरा कोणी नाही असा. सर्वांतरदत्त माझ्या अन्तःकरणाचे रक्षण करो. सर्व योग्यांचा राजा दत्तात्रेय माझ्या प्राणापानादि दशवायूंचे रक्षण करो. वरती, खाली, पाठीमागे डाव्या-उजव्या दोन्ही बाजूला व पुढच्या बाजूला माझे रक्षण करो. ।।६।।

**अन्तर्बहिश्च मां नित्यं नानारूपधरोऽवतु ।**
**वर्जितं कवचेनाऽव्यात्स्थानं मे दिव्यदर्शनः ।।७।।**

**अर्थ :** नानारूप धारण करणारा दत्त आत बाहेर म्हणजे घराच्या किंवा शरीराच्या आत व बाहेर माझे रक्षण करो. ज्या स्थानाला कवच लागले नाही त्या स्थानाचेही दिव्यदृष्टी असणारा दत्तात्रेय रक्षण करो. ।।७।।

**राजतः शत्रुतो हिंस्राद्दुष्प्रयोगादितोऽघतः ।**
**आधि-व्याधि-भयार्तिभ्यो दत्तात्रेयः सदाऽवतु ।।८।।**

**अर्थ :** राजापासून, शत्रूपासून, हिंसा करणे ज्यांचा स्वभाव आहे अशा सिंह व्याघ्रादिकापासून, जारणमारणादि दुष्ट प्रयोगापासून 'अघ' म्हणजे पाप त्यापासून 'आधि' म्हणजे मानसीव्यथा, तिच्यापासून व्याधी म्हणजे शरीरव्यथा तिच्यापासून, भय म्हणजे इतर जी भये त्यांपासून, आर्ति म्हणजे पीडा तिच्यापासून, दत्तात्रेयगुरू

सर्वदा माझे रक्षण करोत. ॥८॥

**धन-धान्य-गृह-क्षेत्र-स्त्री-पुत्र-पशु-किंकरान् ।**
**ज्ञातींश्च पातु नित्यं मेऽनसूयानंदवर्धनः ॥९॥**

**अर्थ :** माझ्या पैशाचे, धान्याचे, घराचे, शेताचे, स्त्रीचे, मुलांचे, पशूंचे, सेवकांचे व इतर सर्व कुटुंबाचे अनसूयेच्या आनंदाला वाढविणारा दत्तात्रेय रक्षण करो ॥९॥

**बालोन्मत्तपिशाचाभो द्युनिट्संधिषु पातु माम् ।**
**भूत-भौतिक-मृत्युभ्यो हरिः पातु दिगंबरः ॥१०॥**

**अर्थ :** केव्हा केव्हा लहान मुलासारखा वागणारा, केव्हा केव्हा उन्मत्त म्हणजे वेड्यासारखा वागणारा, केव्हा केव्हा पिशाचासारखा दिसणारा, दिगंबर व हरिरूप असा दत्तात्रेय दिवसा, रात्री व दिवसरात्रीच्या संधीत म्हणजे दिवसरात्रीच्या मधल्या वेळेत, पंचमहाभूते व पंचमहाभूतांपासून झालेल्या पदार्थांपासून आणि मृत्यूपासून माझे रक्षण करो. आत्मा अमर आहे परंतु त्याने देहादिकांशी संगती केली, म्हणून त्याचे मरण मला आहे असे तो समजतो. अर्थात् देहादिक मी नाही किंबहुना त्याहून मी अत्यंत वेगळा आहे असे साक्षात्काराने जाणले म्हणजे तो मृत्यूपासून सुटतो. तेव्हा दत्तमहाराज माझे मृत्यूपासून रक्षण करोत म्हणजे मला आत्मतत्त्वज्ञान देऊन माझ्यावर आरोपित केलेल्या देहादिकांच्या मरणापासून माझे रक्षण करोत; असा अर्थ येथे घ्यायचा आहे. पहिल्या श्लोकापासून 'रक्षण करो, रक्षण करो' अशीच प्रार्थना कवचात केली आहे. कवच अंगात घातले म्हणजे शत्रूंच्या बाणादिकांची काही पीडा न होता आपले शरीर कवचामुळे सुरक्षित राहाते; त्याप्रमाणे पाय वगैरे अवयव नाटक-सिनेमा इत्यादि गलिच्छ कार्याकडे न वळता तीर्थयात्रादि उत्तम कार्याकडे वळणे, यालाच त्याचे रक्षण करणे असे म्हटले जाते. अर्थात् माझ्या अवयवाकडून होणाऱ्या अधःपात करणाऱ्या कोणत्याही क्रिया न होता उत्तम गतीला पोचविणाऱ्याच क्रिया होवो, असे रक्षण या कवचात देवापाशी मागितले आहे. या कवचाचा पाठ करताना हे तत्त्व लक्षात घेऊन पाठ केल्यास ऐहिक व पारमार्थिक असे दोन्ही प्रकारचे कल्याण कवच-जापकाचे म्हणजे जप करणाराचे दत्तमहाराज करणार आहेत, यात शंका नाही. दत्त हे सर्व देवांचे देव, ब्रह्मस्वरूप असल्याने त्यांना अशक्य काहीच नाही. मनात दत्तमहाराजांची मूर्ती आठवून हे मागणे करावे- म्हणजे कवचपाठ

करावा, म्हणजे पुढील दोन श्लोकांत सांगितलेले फळ कवचपाठकाला निश्चयाने मिळेल ।।१०।।

**य एतद्दत्तकवचं संनह्याद् भक्तिभावितः ।**
**सर्वानर्थविनिर्मुक्तो ग्रहपीडाविवर्जितः ।।११।।**
**भूत-प्रेत-पिशाचाद्यैर्देवैरप्यपराजितः ।**
**भुक्त्वात्र दिव्यभोगान् स देहांते तत्पदंव्रजेत् ।।१२।।**

**अर्थ :** हे दत्तकवच जो कोणी भक्तीने युक्त होऊन आपल्या अंगावर चढवील (नह्यात् नह - धातू बांधणे अशा अर्थाचा आहे. बांधणे म्हणजे अंगावर चढविणे असा होतो. येथे जो कोणी असे 'यः' या पदाने म्हटले आहे. येथे जातीपातीचा प्रश्न येत नाही. ज्याला सर्वात्मना कल्याणाची इच्छा असेल तो कोणीही या कवचजपाचा अधिकारी आहे असे महाराज म्हणतात.) म्हणजे जो कोणी हे कवच जपेल व पाठ करील तो सर्व अनर्थातून मुक्त होईल. शनीमंगळादिकांपासून होणाऱ्या ग्रहांच्या पीडेपासून मुक्त होईल. भूत,प्रेत व पिशाच्च यांचे कवचधारकापुढे काही चालणार नाही. देवसुद्धा याला पराजित करणार नाहीत. अर्थात् देवांचेही याच्यापुढे काही चालणार नाही. इतकेच नव्हे, तर या लोकात, स्वर्गात असणाऱ्या सुखाप्रमाणे याला सर्व सुखे प्राप्त होतील. दुःखे तर मुळीच होणार नाहीत व या लोकातील आयुर्मर्यादा संपल्यावर, म्हणजेच देहान्ती, कवचजापक दत्तस्वरूपाला प्राप्त होईल. याहून जास्ती काय सांगावे व याहून जास्ती मागणे तरी काय असणार ? परमपूजनीय गुळवणी महाराज रोज रात्री या कवचाचा पाठ करीत असतात. त्यांच्या दिनचर्येकडे व ऐहिकव्यवहाराकडे पाहून महाराजांचे म्हणणे किती यथार्थ आहे, हे कळल्याशिवाय राहणार नाही. तरी इतर सर्व भरवसा सोडून कल्याणेच्छू साधकांने हे कार्य अवश्यमेव करावे व अशी बुद्धी भगवान् दत्तात्रेय सर्वांना देऊन त्यांचे कल्याण करो; अशी माझी दत्तराजांचे चरणी प्रार्थना आहे. ।।११।।१२।।

**सार्थ श्रीदत्तकवच संपूर्ण झाले.**

**सर्वेऽत्र सुखिनःसंतु सर्वे सन्तु निरामयाः ।**
**सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिदुःखमाप्नयात् ।।**

अशी प्रार्थना करून हे लेखन श्रीदत्तमहाराजांचे चरणी अर्पण करतो. ।।१।।

❖❖❖